ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक



# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद १९३८
जुलै-सप्टेंबर २०१६ / खंड ४० अंक २



मानवी हक्क आणि सहकारी [illegible]
बंदरांच्या विकासाचे बळी
डॉ.अमर्त्य सेन यांचे आर्थिक विचार
एकच कर - वस्तू व सेवा कर
ठाणे जिल्ह्यातील बचतगटांचा प्रभाव
नाशिक जिल्ह्यातील साखर उद्योग
गरीब कुटुंबातील बालकांच्या समस्या
जलयुक्त शिवार अभियान: सिंचन धोरण
वस्तू आणि सेवा करांचे स्वरुप
दारिद्र्य आणि सर्वसमावेशक वृद्धी
राष्ट्रीय फलोत्पादन अभियान कार्यप्रणाली
शेतकऱ्यांची आत्महत्या: एक समस्या
मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या
डॉ.आंबेडकरांचे शेती विषयक विचार

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक **अर्थसंवाद**

जुलै-सप्टेंबर २०१६ / खंड ४० अंक २

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

**अविनाश रामलाल निकम**

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१५-१८)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा

संपादकीय संवाद : जल प्रकल्पाचं अर्थकारण.........१११

नारायण टाक, नसरापूर

मानवी हक्क आणि सहकारी चळवळ .................११३

अविनाश कुलकर्णी, पुणे

बंदरांच्या विकासाचे बळी..........................१२०

भिमराव उगले, बीड

डॉ.अमर्त्य सेन यांचे आर्थिक सामाजिक विचार.......१२७

सुरेश पाटील, जळगाव

एकच कर - वस्तू व सेवा कर.......................१३३

श्रीराम जोशी, जळगाव, स्नेहल देशमुख, मुंबई

ठाणे जिल्ह्यातील बचतगटांचा प्रभाव.................१३९

साधना पाटील, नाशिक

नाशिक जिल्ह्यातील साखर उद्योगाची रोजगार निर्मिती १४४

जयवंत इंगळे, विटा

भारतातील गरीब कुटुंबातील बालकांच्या समस्या......१५०

साहेबराव माळोदे, पिंपळगाव (ब.)

जलयुक्त शिवार अभियान:शाश्वत सिंचन धोरण.......१६४

सीमा चव्हाण, श्रीरामपूर

वस्तू आणि सेवा कराचे स्वरुप व परिणाम............१७०

हिरालाल चव्हाण,जळगाव, मुरलीधर गायकवाड,मुरुडजंजिरा

दारिद्र्य आणि सर्वसमावेशक वृद्धी ...................१७५

मधुकर अनंतकवळस, सातारा

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची कार्यप्रणाली.........१८२

जयश्री भंगाळे, भुसावळ

शेतकऱ्यांची आत्महत्या: एक समस्या.................१९१

सुरेश घुमटकर, बीड

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची

कारणे व उपाय........................................१९८

दीपक शेलार, चिंचणी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार..२०४

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१६-१७**

**अध्यक्ष**

शिवाजी मुरलीधर भोसले (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

रामदास बापुराव भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)
बालाजी शिंदे (परभणी)

**सदस्य**

सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिनकर मोरे (इस्लामपूर)
जीवन सोळंके (नाशिक)
वामन सावंत (रत्नागिरी)
राहूल म्होपरे (कोल्हापूर)
सुरेश ढाके (भुसावळ)
सुरेश पाटील (चांदवड)


**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)


मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

# संपादकीय संवाद...

## जल प्रकल्पाचं अर्थकारण.....

माझ्या बालपणीचा हा किस्सा आहे..........

तेव्हा मी जळगावला शाळेत शिकत होतो. इयत्ता सातवीपासून वर्गात आम्ही फक्त मुलंच होतो. मुलगी एकदेखील नव्हती. त्यामुळे वर्गात आम्ही बिनधास्त बोलू शकत होतोच. पण शिक्षकदेखील आमच्या वर्गात आल्यावर मोकळेपणानं बोलत असत. शिक्षक वर्गात कोणावर रागावले तरी कोणीच तसलं काही मनावर घेऊ नये हे जणू आमच्यात ठरलेलच होतं. तेव्हा मी आठवीत होतो. तो तास गणिताचा होता. सरांनी एक उदाहरण विचारलं.....''एक हौद २० हजार लिटर क्षमतेचा आहे. तो हौद भरताना ५ हजार लिटर एका तासात भरतो, त्याच वेळी त्या हौदातून एक तासात २ हजार लिटर पाणी बाहेर पडतं. तर तो हौद भरण्यास किती तास लागतील?'' वर्गात मी खूप हुशार विद्यार्थी वगैरे मुळीच नव्हतो. तसा साधारणच होतो. त्या दिवशी कसा काय बोलायचा मूड होता ते कळत नाही. मोठ्या हिमतीनं मी सरांना विचारलं, ''एका तासात २ हजार लिटर पाणी त्या हौदातून बाहेर का पडतं?'' तर सरांनी सांगितलं, ''तो हौद गळका आहे''. यावर सरांना मी प्रतिप्रश्न केला, ''हौद गळका आहे तर तो गळूच नये यासाठी उपाय का करत नाही?'' माझ्या प्रश्नानं सर संतापले, म्हणाले- ''तो हौद गळका असेल तर असू दे, अशा स्थितीत तो किती तासात भरेल याचं उत्तर तूच दे.'' मी देखील माझी बाजू सहजासहजी सोडण्यास तयार नव्हतो म्हणून म्हणालो, ''सर, जर तो हौद गळका आहे तर त्यात पाणी भरायचंच कशाला?'' आता मात्र सरांना संताप अनावर झाला. त्यानंतर सरांनी लगेच..... सांगायलाच हवं का?...... तर खरं ते सांगतो.....दोन-चार छड्या माझ्या हातावर दिल्या. सहज आठवलं म्हणून हे लिहिलं. हा किस्सा आठवण्याचं कारण हे संपादकीय जल प्रकल्पाचं अर्थकारण या विषयावर लिहितोय् हे नाही.

हिंदीमध्ये एक प्रसिध्द म्हण आहे, ''जल है तो कल है''. पाणी हे व्यक्ती, शेती, उद्योग, पर्यावरण अन् अर्थव्यवस्था या सर्वांसाठी अमूल्य आहे. २०१६ या वर्षात महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटक, आंध्र, मध्य प्रदेश यासह इतर पाच राज्यांतील २५६ जिल्ह्यात पाण्याचं दुर्भिक्ष्य होतं. त्यामुळे तब्बल ३३ कोटी लोकांचे पाण्यावाचून हाल झाले. सिमला, चेन्नई, बेंगलोर इतकेच नव्हे तर दिल्ली शहरात देखिल पाणी वापरावर बंधने घालण्यात आली. इस्त्राईलमध्ये केवळ ४०० मिमी सरासरी पर्जन्यमान असलं तरी उत्तम जलव्यवस्थापनामुळे तिथं पाणी टंचाई नाही. दुसरीकडे भारतात चेरापुंजी इथं सरासरी ११००० मिमी इतकी प्रचंड जलवृष्टी होत असली तरी हा परिसर मान्सूनपूर्वी दोन तीन महिने पाणी प्रश्नाला तोंड देतो. केवढा हा विरोधाभास? आपल्या देशात पाणी टंचाई पाण्याच्या कमतरतेमुळे नसून चुकीच्या जल व्यवस्थापनामुळे आहे, असं अनेक जलतज्ज्ञांचं मत आहे.

पाणी टंचाई अन् महापुरामुळे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतात. आपल्या देशातील धरणांची पाणी साठवण क्षमता मर्यादित आहे. महाराष्ट्रात जलसिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण होऊच शकत नाहीत की काय अशी स्थिती दिसते. उजनी प्रकल्पाची मूळ किंमत (१९६२-६३) रु.४०.९१ कोटी होती त्याची सुधारित किंमत (२०१०-११) रु.११९२.७८ कोटी इतकी वाढली. कृष्णा प्रकल्पाची १९६७ मधील मूळ किंमत रु.२७.६५ कोटी होती त्याची सुधारित किंमत सन २०११-१२ मध्ये रु.९९२.२२ कोटी झाली. १९६७ मध्ये वारणा प्रकल्पाची रु.३१.८४ कोटी इतकी असलेली मूळ किंमत अलिकडच्या काळात रु.२१४९.९५ कोटी रुपयांवर पोहोचली. सिंचन प्रकल्पांच्या संदर्भात विविध महामंडळे प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात झाला. कृष्णा खोऱ्यातील ५४ प्रकल्पांची रु.४६५१ कोटी असलेली मूळ किंमत सुधारित रु.२८११३ कोटी इतकी झाली. मूळ ते सुधारित किमतीतील ही वाढ सहा पट आहे. २५ प्रकल्प असलेल्या गोदावरी खोरे सिंचनाची मूळ किंमत रु. २८५७ कोटी होती हीच सुधारित किंमत रु.२४५४८ कोटींवर पोहोचली. गोदावरी प्रकल्पाची किमतीतील ही

वाढ ८.६ पट आहे. तापी खोऱ्यातील २९ प्रकल्पांच्या किमतीची वाढ सर्वाधिक १४ पट आहे. तापी प्रकल्पांची मूळ किंमत रु.२९०१ कोटी होती हीच रक्कम १२२१२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. कोकण महामंडळातील १९ प्रकल्पांची मूळ किंमत रु.५०७ कोटी होती. याच प्रकल्पांची सुधारित किंमत रु.७३४६ कोटींपर्यंत पोहोचली. सुधारित किमतीतील ही वाढ मूळ किमतीच्या १४ पटीनं आहे. विदर्भातील ५७ प्रकल्पांची असलेली रु.५९९४ कोटी ही मूळ किंमत सुधारित रु.४०५३६ कोटींवर पोहोचली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या जलसिंचन प्रकल्पांचं नियोजन योग्य झालं, असं म्हणता येणार नाही. या प्रकल्पांना अपेक्षेपेक्षा अधिक वर्षे लागल्याने त्यांचे फायदे उशिरा मिळाले. त्याचबरोबर पैसा देखील शासनाला प्रचंड ओतावा लागला. विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवाल २०११-१२ यातील आकडेवारीनुसार २००१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्रात रु.६८००० कोटी खर्च केलेले आहेत तरीदेखील राज्याच्या सिंचनक्षेत्रात केवळ ०.१ टक्का वाढ झाली आहे, हे किती आश्चर्यकारक आहे?

विविध धरणांच्या निर्मितीसाठी भारतात चांगले प्रयत्न झाले. दामोदर व बरकार नदीवर पाटबंधारे, उर्जानिर्मिती व पूरनियंत्रणासाठी चार धरणे बांधण्यात आली. तापी नदीवर उकाई धरण बांधल्यानं सुरत शहराचा पुराचा धोका काहीसा कमी झाला. सतलज नदीवर भाक्रा धरण पूर नियंत्रणाच्या प्रमुख हेतूनं बांधलं तरी जलसिंचनासाठी त्याचा फायदा झाला. या धरणाचं ६४ टक्के पाणलोट क्षेत्र तिबेटमध्ये आहे. उत्तराखंडमध्ये भागीरथी नदीवर अलिकडच्या काळात टिहरी जलविद्युत प्रकल्प उभारल्यानं जलसाठा तर झालाच परंतु हरिद्वार-ऋषिकेश परिसराचा पुराचा धोका कमी झाला. सरदार सरोवर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचं भूमिपूजन पंडित नेहरुजींच्या काळात झालं. नर्मदा नदीवर असलेल्या या प्रकल्पाचं बांधकाम करण्याचं १९८६-८७ मध्ये ठरलं. त्यावेळी रु.६४०६ कोटी अपेक्षित खर्च होता. परंतु कामाचा कालावधी लांबल्याने सन २०१२ मध्ये याच प्रकल्पाची अंतिम किंमत रु.७२००० कोटी इतकी मोजावी लागली . सरदार सरोवर प्रकल्पामुळे १.१७ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली गेली. प्रकल्पाची वीज निर्मितीक्षमता १४५० मेगावॅट आहे. या प्रकल्पाचं बॅक वॉटर तब्बल २१४ किमी लांबीपर्यंत आहे तर धरणाची उंची १२१.९ मिटर आहे. ७५ टक्के गुजरात राज्यातील जनतेची तहान हा प्रकल्प भागवू शकतो, इतकी त्याची क्षमता आहे. तरी देखिल या प्रकल्पामुळे निर्वासित झालेल्या महाराष्ट्र व गुजरातमधील असंख्य आदिवासी बांधवांचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. निर्वासितांचे पुनर्वसन झाल्याशिवाय हा प्रकल्प पूर्ण झाला आहे असे म्हणणे अयोग्य ठरेल, नाही का? याहूनही भव्य 'थ्री गॉर्जेस' हा प्रकल्प चीनने यागत्से नदीवर बांधला आहे. जून १९९४ मध्ये प्रकल्पाच्या बांधकामास सुरुवात केल्यानंतर निर्धारित वेळेअगोदर जून २००६ मध्येच हा जगातील एक भव्य प्रकल्प पूर्ण झाला. २५ मिलियन ते ६० मिलियन डॉलर्स या रेंजमध्ये अपेक्षित खर्चात हा प्रकल्प पूर्ण करण्यात चीनला यश आलं. या धरणाची उंची २०० मिटर तर बॅक वॉटर ६०० किमी आहे. यातून १ लाख ५६ हजार एकर जमीन ओलिताखाली आली. सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे या नदीच्या पुरामुळे दरवर्षी होणारं नुकसान टळलं. शेती, वीजनिर्मिती व पर्यटनासाठी थ्री गॉर्जेस या प्रकल्पाचा उत्तम उपयोग होत आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या या वर्षी प्रकाशित ग्लोबल रिस्क रिपोर्टमध्ये भयंकर परिणामकारक ठरणाऱ्या दहा जागतिक समस्यांमध्ये पाणी समस्येला तिसऱ्या क्रमांकाची गंभीर समस्या मानली आहे. जगात प्रतिवर्षी सरासरी ८४० मिमी तर भारतात ११५० मिमी पाऊस पडतो. भारतातील प्रतिवर्षी तब्बल ६५ टक्के समुद्रास जाऊन मिळणाऱ्या पाण्यापैकी बहुतांश पाण्याचा वापर विकासासाठी करता येईल का, याचा विचार करणं ही काळाची गरज आहे.

स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. एच. जैन, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील यांनी अर्थसंवादसाठी जाहिरात उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. अर्थसंवादच्या या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. या अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

दिपावलीनिमित्त सर्व वाचकांना मनःपुर्वक शुभेच्छा..!

अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# मानवी हक्क आणि सहकारी चळवळ

**नारायण भिकोबा टाक**, नसरापूर,
प्राचार्य, शंकरराव भेलके महाविद्यालय, ता. भोर, जिल्हा पुणे
भ्रमणध्वनी: ९९२२५५८०२६

मानवाच्या वैचारिक विकासाबरोबरच मानवी हक्कांचे महत्त्व वाढत आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी मानवी हक्क आवश्यक असतात हे आता सर्वमान्य झाले आहे. देशाच्या राज्यघटनेने हक्कांना संरक्षण दिले पाहिजे हा विचार जगभर मांडला जात आहे. विचारवंतांच्या मते मानवी हक्क समाजाने किंवा राज्याने निर्माण केलेले नाहीत ते मानवाला निसर्गाने बहाल केलेले आहेत. राज्य व्यवस्थेने मानवी हक्कांना सण दिले पाहिजे. भारतात भारतीय राज्यघटनेने मानवी हक्कांना संरक्षण दिलेले आहे. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. १० डिसेंबर *मानवी हक्क दिन* म्हणून जगभर साजरा केला जातो. मानवी हक्क वैश्विक स्वरुपाचे असल्याचे आता सर्वमान्य झाले आहे. प्रा. लास्की यांनी व्यक्तीला आपल्या कुवतीनुसार सर्वांगिण विकास घडवून आणण्याची परिस्थिती निर्माण करण्याला मानवी हक्कांमध्ये विशेष महत्त्व दिले. सर्वांगिण प्रगती यामध्ये सामाजिक, आर्थिक प्रगती अभिप्रेत आहे. मानवी हक्कांचा जाहीरनामा जगाने १८४८ मध्ये स्वीकारला असला तरी मानवी हक्कांना महत्त्व देणारी सामाजिक आर्थिक स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न मानवाने त्यापूर्वीच केलेला आहे. या प्रयत्नामध्ये सहकारी चळवळीला विशेष महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची सनद स्वीकारण्यापूर्वी जवळजवळ १०० वर्षे अगोदर मानवाच्या सामाजिक, आर्थिक हक्कांच्या संरक्षणासाठी सहकारी चळवळीची निर्मिती झाली आहे. जगभर पसरलेल्या सहकारी चळवळीचा मानवी हक्क प्रस्थापनेत महत्त्वाचा वाटा आहे. शोषणमुक्त सर्वांगीण विकास साध्य करणारी समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी सहकाराचा उदय झाला आहे. इंग्लंड, जर्मनी, भारत अशा विविध देशांमध्ये मानवी हक्कांची जपणूक करण्याचा प्रयत्न सहकाराने केला आहे. मानवी हक्क हाच सहकारी तत्त्वांचा आत्मा आहे. इंग्लंड, जर्मनी मधून सुरुवात झालेली सहकारी चळवळ जगभर पसरली आहे.

### इंग्लंडमध्ये सहकाराचा उदय:

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. क्रांतीचे आर्थिक, सामाजिक दुष्परिणाम झाले त्यातूनच सहकारी चळवळीचा उदय झाला. इंग्लंडचा मुख्य व्यवसाय शेतीच होता. औद्योगिक क्रांतीने कारखाने निर्माण झाले. कारखान्यात काम करणारा कामगार वर्ग तयार झाला. कारखान्याचे मालक आणि कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. आधुनिक तंत्राच्या खरेदीसाठी भांडवलाची गरज होती. त्यामुळे भांडवलाला महत्त्व आले. मानवी श्रमाचे महत्त्व दुय्यम झाले. भांडवलाचे मालक असलेला, नफा मिळविणारा मालक वर्ग निर्माण झाला. कामगारांना तुटपुंजे वेतन मिळू लागले. कमी वेतन जास्त काम करावे लागत होते. आवश्यक वस्तूंची खरेदी करण्याइतका पगार मिळत नव्हता. कामगारांची स्थिती असहाय्य, दयनीय अशीच होती. कुटुंबाचे संगोपन व मुलांचे शिक्षण अशक्य झाले होते. अशा काळात रॉबर्ट ओवेन हा उदारमतवादी, मानवतावादी उद्योगपती होता. तो कामगारांच्या कल्याणासाठी काही प्रयोग करत होता. त्यातूनच १८४४ मध्ये रॉशडेल येथील २८ विणकर एकत्र आले. त्यांनी आपल्या मर्यादित उत्पन्नात आवश्यक असलेल्या वस्तू स्वच्छ, निर्भळ व स्वस्त दरात कशा मिळतील याबाबत विचार केला. पहिली सहकारी संस्था ग्राहक भांडार होते. संस्थेच्या सामुहिक खरेदीमुळे सर्वांना कमी किंमतीत वस्तू मिळत होत्या. दुर्बल घटकांनी भांडलवदारांशी संघर्ष न करता चांगले जीवन जगण्यासाठी रास्त मार्ग स्वीकारला होता. म्हणूनच एडवीन जी नॉर्स यांनी *भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या अन्यायामुळेच सहकार निर्माण झाला* असे म्हटले आहे. इंग्लंडमध्ये निर्माण झालेली सहकारी चळवळ नंतर जगभर पसरली. शोषण मुक्त समाज निर्मितीचा प्रयत्न करु लागली.

### जर्मनीमधील सहकार:

जर्मनीमध्ये पूर्वी व्यापार प्रामुख्याने ज्यु व्यापाऱ्यांच्या ताब्यात होता. ज्यु व्यापारी सावकारी करत होते. शेतकरी त्यांच्याकडून कर्ज घेत होते. शेतमालही त्यांनाच विकत होते. व्यापाऱ्यांच्या अयोग्य धोरणामुळे शेतकऱ्यांना योग्य उत्पन्न मिळत नव्हते. सतत पडणारे दुष्काळ, व्यापारी व सावकार यांच्याकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकऱ्यांचे जीवन हलाखीचे झाले होते. शेतकरी दुर्बल, असहाय्य झाले होते. ज्यु सावकारांच्या शोषणातून मुक्त होण्यासाठीच जर्मनीत सहकारी कर्जपुरवठा संस्था अस्तित्वात आल्या होत्या. रफायझन यांचे पुढाकाराने पाव निर्माण करणारी सहकारी संस्था स्थापन झाली.

जर्मनीमध्ये ग्रामीण व शहरी भागात सहकारी बँकांची स्थापना झाली. शहरी भागातील औद्योगिक कामगारांनी सहकारी बँका निर्माण केल्या. जर्मनीत सहकार निर्माण करण्याचे कार्य प्रथम रफायझन आणि शुल्झे यांनी केले. शोषण करणाऱ्या सामाजिक, आर्थिक व्यवस्थेतून मुक्त होण्यासाठीच जर्मनीमध्ये सहकाराची निर्मिती झाली.

### भारतातील सहकारी चळवळ:

शेती हेच भारतीयांचे उपजिविकेचे मुख्य साधन होते. अनेक आक्रमक भारतावर सतत आक्रमण करत होते. परिणामी भारतातील शेतीचे, शेतकऱ्यांचे सतत नुकसान होत होते. उभी पिके कापणे, साठवलेला शेतमाल लुटून नेणे, शेतकऱ्यांवर अत्याचार करणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक, शोषण करणे ही नित्याचीच बाब

झाली होती. देशातील राज्यकर्त्यांनी काही ठराविक लोकांना महत्त्व दिले होते. त्यातून सरदार, जमीनदार, सावकार यांचा उदय झाला होता. समाज रचना विषम झाली होती. धनिकांचा मोठा वर्ग सामान्य शेतकऱ्यांचे शोषण करत होता. ही विषम व्यवस्था जातीव्यवस्थेने अधिक घट्ट केली होती. वारंवार पडणारे दुष्काळ आणि राज्यकर्त्यांकडून, उमरावांकडून होणारे अत्याचार, शोषण यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली होती. जनतेच्या स्वातंत्र्याचा, समाधानाचा विचार करुन राज्य केले जावे अशी जनतेची अपेक्षा होती. मराठी मुलखात शिवाजी महाराजांनी वतनदारी बंद करुन सामान्य माणसाला राज्यव्यवस्थेत बरोबर घेऊन शोषण कमी करण्याचा व जनतेला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करत स्वराज्याची स्थापना केली. शिवाजी महाराजांचे राज्य मराठी मुलखापुरतेच मर्यादित होते. शिवाजी महाराजांच्या नंतर काही वर्षांनी आलेली राजवट अन्याय करणारीच ठरली. त्याकाळात जनता दबलेली, आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेली, खचलेली होती. शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होते. शेतीशिवाय अन्य उत्पन्नाचे मार्ग नव्हते. त्यामुळे अडचणीच्या वेळी उपजीविकेसाठी आणि शेती पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज घेतल्याशिवाय पर्यायच नव्हता. कर्ज देणारे अनेक सावकार निर्माण झाले होते. सावकारांकडून अयोग्य व्याजदर आकारुन अयोग्य हिशोब ठेवून फसवणूक होत होती. पिळवणूक आणि शोषण ही विषम व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती. शेतकऱ्यांना मदत करणारा, त्यांचे दु:ख दूर करणारा कुणीही वाली नव्हता. अशा काळात महाराष्ट्रातील पुणे परिसरात महात्मा फुले यांनी मानव मुक्तीचा लढा उभारला. शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडली. लोकशिक्षणाची, स्त्रीशिक्षणाची चळवळ सुरु केली. पुणे परिसरात सावकारांचा प्रभाव वाढला होता. शेतकरी सावकारांना कंटाळले होते. महात्मा फुले यांच्या कार्यातून, विचारांतून प्रभावित झालेल्या काही शेतकऱ्यांनी पुणे, नगर परिसरात सावकारी विरोधात बंड केले. अन्यायकारक सावकारकीला विरोध केला. यासारखाच उठाव मद्रास प्रांतातही झाला. त्यातूनच सावकारांना पर्याय निर्माण करणारी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. १८७९ मध्ये खाजगी कर्जातील फसवणूक कमी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने डेक्कन अॅग्रीकल्चरिस्ट लोन अॅक्ट मंजूर केला पण या कायद्याचा उपयोग झाला नाही. इंग्लंड, फ्रान्समध्ये सुरु झालेल्या सहकारी चळवळीची ओळख भारतातील काही सामाजिक कार्यकर्त्यांना झालेली होती. त्यातूनच पंजाबमध्ये शेतीसाठी सहकारी संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न झाला. म्हैसुरमध्ये कृषी बँक स्थापन करण्याचा प्रयत्न झाला. सावकारांच्या त्रासातून मुक्त करण्यासाठी न्यायमूर्ती रानडे प्रयत्नशील होते. सर विलीयम वेटरबर्न आणि न्यायमुर्ती म. गो. रानडे यांनी शेती बँक स्थापन करण्याचा प्रयत्न केला. पण ही बँक अस्तित्वात आली नाही. ब्रिटीश सरकारने शेतकऱ्यांना उत्पादन कार्यासाठी सरकारने कर्ज द्यावे यासाठी कायदा केला. पण सरकारचे कर्ज अपुरे होते. शेतकऱ्यांना सरकारी कर्जाचा विशेष उपयोग झाला नाही. शेतकऱ्यांची स्थिती जास्तच खालावलेली होती. वारंवार दुष्काळ पडत होता, सावकार फसवणूक करत होते, शेती व्यवसाय सर्व बाजूंनी अडचणीत आला होता, शेतकऱ्यांचे जगण्याचे स्वातंत्र्यच नष्ट होत होते. विचारवंत,

सामाजिक कार्यकर्ते आणि सरकार प्रयत्नशील होते, पण यश येत नव्हते. मद्रास सरकारने पुढाकार घेऊन विशेष निर्णय घेतला. शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्जपुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल यासाठी निकोलसन यांची नियुक्ती केली. १८८२ मध्ये सर फ्रेडरिक निकोलसन यांनी जर्मनीला भेट दिली. निकोलसन यांनी जर्मनी येथील रफायझन सहकारी संस्थांचा अभ्यास केला. या धर्तीवर भारतातही सहकारी संस्थांची स्थापना करावी अशी सरकारला शिफारस केली. भारतातील सहकारी चळवळीला सरकारच्या पुढाकारातून सुरुवात झाली. देशात ठिकठिकाणी शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांची निर्मिती होऊ लागली. १९०१ मध्ये ब्रिटीश सरकारने समिती नेमली. शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी सहकारी संस्थांचे स्वरुप कसे असावे याबाबत समितीने अभ्यास केला. समितीचे प्रमुख एडवर्ड ला होते. जर्मनीतील रफायझन धर्तीवर सहकारी संस्था स्थापन करण्यात यावी अशी शिफारस समितीने केली. या सर्व प्रयत्नांचा परिणाम झाला. भारतात १९०४ मध्ये पहिला सहकारी कायदा अस्तित्वात आला. या कायद्याचे वर्णन हेन्री वुल्फ यांनी आर्थिक आणि सामाजिक इतिहासाला वळण लावणारा कायदा असे केले. डॅनियल हॅमिल्टन यांनी हा कायदा दारिद्र्याकडून समृध्दीकडे नेणारा महत्त्वाचा मार्ग असल्याचे सांगितले. ब्रिटीश अधिकाऱ्यांचे, विचारवंतांचे म्हणणे योग्यच होते.

इंग्लंड, जर्मनी, भारत व जगातील इतर देशात निर्माण झालेली सहकारी चळवळ शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठीच होती. आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य हा मानवाचा नैसर्गिक हक्कच आहे. मानवी स्वातंत्र्याची जपणूक हा सहकाराचा आत्मा आहे. आर्थिक, सामाजिक समता व विकासाची सर्वांना संधी सहकारातून निर्माण होते. दुर्बल घटकांनी एकमेकांना सहाय्य करुन स्व उत्क्रांतीचा मार्ग शोधण्यासाठीच सहकाराची निर्मिती झाली. सहकाराची तत्त्वे मानवाच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण करतात. सहकाराच्या विकासाबरोबर सहकारी तत्त्वांचाही विकास होत गेला. मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी सहकाराला विशेष महत्त्व दिले पाहिजे.

**सहकारामध्ये तत्त्वांना महत्व:**

मानवाचे काही मूलभूत हक्क आहेत. काही हक्क मानवाला उपजत मिळालेले आहेत. म्हणजेच ते नैसर्गिक आहेत. जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता गुलामगिरीपासून मुक्तता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत या हक्कांचे प्रतिबिंब सर्व सहकारी तत्त्वांमध्ये आहेत. सहकारी तत्त्वे मानवतेवर आधारित आहेत. सहकाराच्या वाढीबरोबर सहकारी तत्त्वांचा विकास झाला. सहकार केवळ अर्थप्रणाली नसून जीवन प्रणाली आहे. स्वातंत्र्य व समतेवर आधारलेल्या समाजाची निर्मिती करणारी सहकाराची तत्वे हा सहकाराचा मूलभूत गाभा आहे. भारतातील सहकार विषयक ९७ व्या घटना दुरुस्तीने सहकारी संस्था म्हणजे काय हे स्पष्ट केले आहे. संयुक्त मालकी आणि लोकशाही नियंत्रण असलेल्या उपक्रमांद्वारे आपल्या सामाईक गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि सहकारी तत्वांचे आणि मुल्यांचे अनुसरण करण्यासाठी स्वच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींचा स्वायत्त अधिसंघ असलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

१७ व्या घटना दुरुस्तीने सहकारी तत्वांनाच प्राधान्य दिले आहे. इंग्लंड मधील रॉशडेल सहकार पध्दती व जर्मनीतील रफायझन सहकार पध्दती यांची निर्मिती वेगवेगळ्या देशांमध्ये झाली पण त्यांच्यात काही समान वैशिष्ट्ये होती. रॉबर्ट ओवेन आणि चार्लस फॉरिये यांनी सहकारी तत्वांची प्रथम मांडणी केली. रॉशडेलची तत्त्वे पुढे जगभर सहकाराची तत्त्वे म्हणून स्वीकारली गेली. सहकारी तत्त्वांचे बाबत अनेक विचारवंतांनी आपले विचार मांडले. १९३७ व १९६९ मध्ये व १९९५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदांमध्ये सहकारी तत्त्वांची चर्चा झाली व तत्त्वांची मांडणी करण्यात आली काही तत्त्वांचा नव्याने समावेश करण्यात आला. सहकारी तत्त्वांचा पाया मानवाच्या परस्पर सहकार्यातून विकास हाच आहे. भारतीय राज्य घटनेने व्यक्तीला संपूर्ण विकासाची संधी दिली. विकास हा मानवाचा हक्क आहे हे गृहित धरुन काही मूलभूत हक्कांचा समावेश राज्यघटनेत केला. सहकाराची पुढील तत्त्वे या मूलभूत हक्कांचा पुरस्कार करणारीच आहेत.

### १)ऐच्छिक व खुले सभासदत्व:

सहकारी संस्था स्वच्छेने निर्माण केलेले संघटन आहे. कोणतीही व्यक्ती, स्वत:च्या इच्छेनुसार संस्थेचे सभासदत्व स्वीकारु शकते. संस्थेतून बाहेर पडू शकते. या तत्त्वामध्ये व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीपुढे कृत्रिम, धार्मिक किंवा राजकीय अडथळे येऊ नयेत यासाठी या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. रंग, रुप, वंश, जात, धर्म, पंथ, भाषा अशा कोणत्याही कारणास्तव सभादसत्व नाकारले जात नाही. या तत्त्वामध्ये भेदाभेद करणारे सर्व अडथळे नाकारले आहेत. सर्व माणसे समान आहेत त्यांना समान अधिकार दिला पाहिजे हा उदात्त हेतू या तत्त्वामागे आहे. हे तत्त्व मानवाच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण करते.

### २) लोकशाही नियंत्रण:

लोकशाही तत्त्वानुसार सर्वांना समान अधिकार मिळतात. संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने निवडलेले सभासद करतात. कारभारी निवडताना एक व्यक्ती, एक मत या तत्त्वानुसार प्रत्येकाला समान अधिकार दिला जातो. संस्थेमध्ये कितीही भांडवल गुंतवले तरी एका सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. संस्थेतील गरीब व श्रीमंतांना समान अधिकार असतो. संपत्तीच्या मालकीवरुन कोणालाही विशेष अधिकार दिला जात नाही. कोणाचा अधिकार काढून घेतला जात नाही. संस्थेच्या कायद्याला महत्त्व असते, कोणा विशिष्ट व्यक्तीला नाही. सर्व सभासदांच्या सर्वसाधारण सभेचे अधिकार सर्वोच्च असतात. भारतासारख्या विविधता असलेल्या देशात लोकशाही राज्यप्रणाली यशस्वी होण्यासाठी देशातील संघटना लोकशाही तत्त्वांवर असल्याच पाहिजेत. लोकशाहीची मुलभूत तत्त्वे सर्व जनतेपर्यंत जाण्याची गरज आहे ही गरज सहकारी संस्थाच पूर्ण करु शकतात. सहकारामुळे लोकशाही जीवनप्रणाली होते. लोकशाहीत लोक मिळालेल्या अधिकारांचा योग्य उपयोग करु शकतात. अशा लोकशाहीतच मानवी हक्क सुरक्षित असतात.

### भांडवलावर मर्यादित व्याज:

भांडवलशाही राष्ट्रात सर्वाधिक महत्त्व भांडवलाच्या मालकालाच दिले जाते त्यातूनच

शोषण, अन्याय, विषमता या वाईट बाबींची निर्मिती होते. त्यामुळे मानवी हक्क सुरक्षित रहात नाहीत. सहकारात भांडवलाला, मालकाला विशेष अधिकार मिळत नाहीत. भांडवल जमा करण्यासाठी आवश्यक असलेले व्याज सहकारात दिले जाते पण केवळ नफ्याला महत्त्व देऊन भांडवलावर जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याच्या विचारांना सहकारात स्थान नाही. भांडवलाचे मालक भांडवलाच्या सहाय्याने सहकारी संस्थांवर आपली मालकी प्रस्थापित करु शकत नाहीत. कमी भांडवल असणाऱ्या सभासदांचे समानता, स्वातंत्र्य या बाबतचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठीच भांडवलावर मर्यादित व्याज दिले जाते.

**सहकारांतर्गत सहकार:**

आंतरराष्ट्रीय सहकार संघटन समिती तज्ज्ञांनी १९६६ मध्ये या तत्त्वाचा स्वीकार केला. बदलत्या तंत्रज्ञानानुसार जग जवळ येत आहे. आर्थिक विकासाची गती वाढत आहे. म्हणून सर्व सामान्यांनी सुध्दा एकमेकांना सहकार्य केले पाहिजे ही गरज ओळखून सहकारांतर्गत सहकार तत्त्वाचा स्वीकार केलेला आहे. आजच्या स्पर्धात्मक, व्यापारी जगतात भांडवलावर आधारित शक्तीशाली आर्थिक संघटनांचा विकास होत आहे. या संघटनांचे परस्परांना होणारे सहकार्य वाढत आहे अनेक राष्ट्रीय सरकारे सुध्दा या संघटनांना मदत करत असतात. या स्थितीत सामान्य माणसे बाजूला पडत आहेत. त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत आहे. विषमतेची दरी वाढून मानवी मूल्यांची हेळसांड होत आहे. अशा परिस्थितीत सामान्य माणसांनी सहकारी संस्था निर्माण करुन सर्व संस्थांनी एकमेकांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य केल्यास सामान्यांचा विकास होईल व त्यांच्या मानवी हक्कांचे संवर्धन होईल.

**राजकीय आणि धार्मिक तटस्थता:**

राजकारणात विचारांपेक्षा सत्ता आणि संपत्तीचा प्रभाव वाढत आहे. श्रीमंत लोक सत्तेसाठी स्पर्धा करत आहेत. स्पर्धेतून सामान्य माणसांच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत. म्हणून सहकारात राजकीय तटस्थतेचे तत्त्व अवलंबले आहे. राजकीय अलिप्तता या तत्त्वामुळे वेगवेगळ्या राजकीय विचारांचे लोक एकमेकांना सहाय्य करुन सहकाराच्या माध्यमातून आपला विकास साध्य करु शकतात. समाजाची धारणा करतो तो धर्म अशी महाभारतात धर्माची व्याख्या सांगितली आहे. पण प्रत्यक्षात धर्मामुळे समाजात दुही निर्माण होत आहे. परिणामी व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होत आहे अशा परिस्थितीत धर्मापासून अलिप्त राहणाऱ्या आर्थिक संघटनांची गरज आहे. त्यामुळे एकमेकांच्या धार्मिक विचारांचा लोक आदर करु शकतील. धर्माच्या पलिकडे जाऊन मानवतेचा विचार करु शकतील. सहकाराचे हे तत्त्व जगभर वाढणाऱ्या धार्मिक हिंसाचाराच्या वातावरणात महत्त्वाचे आहे. कोणत्याही धर्मापेक्षा मानवीमुल्ये श्रेष्ठ आहेत याला महत्त्व देणारे आहे.

सहकारातील सेवातत्त्व, समतेचे तत्त्व, एकता व बंधुत्वाचे तत्त्व, स्वावलंबनाचे तत्त्व ही सर्वच तत्त्वे उच्च मानवी मूल्यांची समाजात निर्मिती करणारी आहेत. सहकारामध्ये कोणत्याही व्यक्तीमध्ये वंश, लिंग, धर्म, पंथ, संपत्ती या कारणांवरुन भेद केला जात नाही. सर्वांना विकासाची समान संधी दिली जाते. म्हणून बदलणाऱ्या भांडवलशाहीमध्ये वाटचाल

करणाऱ्या जगात सहकारी संघटनांची व सहकारी तत्त्वांच्या अंमलबजावणीची जास्त गरज आहे. त्यातूनच निसर्गाने मानवाला दिलेल्या मुलभूत हक्कांचे संरक्षण होईल. भारतासारख्या देशात राज्यघटनेने संरक्षण दिलेल्या मानवी हक्कांचे समाजात संवर्धन होईल.

मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न सहकाराने केला आहे. सहकार आर्थिक विकासाबरोबरच मानवी हक्कांचे संरक्षण करणारा आहे. म्हणून सहकाराचा विकास झाला पाहिजे, सहकारी चळवळ वाढली पाहिजे.

**संदर्भग्रंथ सूची:**


1) Hajela T. N. (1987), *Principal & Practice of the Co-Operation*, Shivlal Agarawala and Co. Agra.

2) Report of the I. C. A. Commission on Co-operation Principals (Suptember 1966), Vienna.

३) भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय (२००८) *भारतीय संविधान,* महाराष्ट्र शासन मुद्रण व लेखन सामुग्री मुद्रित, मुंबई.

४) भा. ल. भोळे (२००३) *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण,* पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

५) चौगुले व्ही. टी. व पठाण के. जी. (२००७), *सहकारी मुलतत्त्वे,* कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - ३६.

६) दुभाषी प. रा. (१९९९), *सहकारी मूल्ये* , सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे.


---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### अर्थसंवादसाठी अनुदान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून २०१६-१७ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.४५,०००/- अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचा ऋणी आहे.

- डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद

# बंदरांच्या विकासाचे बळी

**अविनाश कुलकर्णी, पुणे,**
कृष्णा रेसिडेन्सी, सुस रोड,
पाषाण-४११०२१
भ्रमणध्वनी: ९८२२२०३१८७

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्या दृष्टिकोनातून बंदरांच्या विकासाला असाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. सागरी वाहतुकीच्या क्षेत्रात भारताचा वाटा विकसित देशांच्या तुलनेत अत्यल्प असल्याने सागरी वाहतुकीला प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यामुळे सरकारने देशातील बंदरांच्या विकासाला चालना दिली आहे. वाहतूक आणि व्यापार यांच्या बरोबरीनेच देशात जलमार्गाने प्रवासी वाहतूक आणि पर्यटन यालासुद्धा चालना देण्याच्या सरकारच्या धोरणाची अंमलबजावणी आता सुरू झाली आहे. त्यामुळे सागरी वाहतुकीच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देताना आर्थिक लाभ दृष्टीक्षेपात असले तरी त्याचा सागरी पर्यावरणावर व परिस्थितीकीवर (Ecology) होणारा परिणाम याचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे आर्थिक विकासाचे पर्यावरणीय परिणाम या दृष्टिकोनातून या शोधनिबंधाचा उद्देश व महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश व महत्त्व:**

स्वातंत्र्यपूर्व काळात युरोप व प्रामुख्याने ब्रिटिश राजवटीच्या परिणामामुळे इंग्लंड बरोबरील व्यापारासाठी मुंबई बंदराचा विकास करण्यात आला. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई शहराची वाढती लोकसंख्या आणि बंदरापर्यंतची रस्ते व रेल्वे वाहतूक यावर मोठ्या प्रमाणात ताण पडू लागला. तसेच कंटेनर वाहतूक करणारी महाकाय जहाजे व बंदराची क्षमता यामुळे मुंबई बंदरातील वाहतुकीला पर्याय निर्माण करण्याची गरज भासू लागली आणि मुंबईच्या आजुबाजूच्या परिसरात जागतिक व्यापाराच्या दृष्टिने उपयुक्त असणाऱ्या सोयी-सुविधा निर्माण करत नाव्हाशेवा येथे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे प्रमुख बंदर विकसित करण्यात आले. मुंबई व परिसरातील बंदरांच्या विकासाबरोबरच देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने आणि देशाच्या प्रादेशिक समतोल विकासाच्या दृष्टिने सुद्धा पश्चिम आणि

पूर्व किनाऱ्यावरील बंदरांच्या विकासाला सरकारने चालना देण्याचे धोरण आखले आहे. देशातील या बंदरांचा विकास करत असताना त्या-त्या परिसरातील नैसर्गिक परिस्थितीकीमध्ये लक्षणीय बदल घडून येत असल्याने नैसर्गिक घटकांचा किंवा परिस्थितीकीचा जो अवक्षय (Depletion) होत आहे किंवा होणार आहे त्याचा आढावा घेण्याच्या प्रमुख उद्दिष्टाने हा शोधनिबंध महत्त्वपूर्ण आहे. या शोधनिबंधासाठी पुढील सैद्धांतिक वा संकल्पनात्मक पार्श्वभूमीचा उपयोग करण्यात आला आहे.

### संकल्पनात्मक पार्श्वभूमी:

देशातील व्यापार, सागरी वाहतूक आणि पर्यटन याद्वारे देशाच्या आर्थिक विकासाचे उद्दिष्ट्य साध्य होत असले तरी बंदरांच्या विकासामुळे पर्यावरणाचा जो ऱ्हास अथवा अवक्षय होत आहे किंवा होणार आहे त्याचा आढावा घेण्यासाठी प्रामुख्याने या शोधनिबंधात पर्यावरणाचे अर्थशास्त्र यातील व्यय-लाभ विश्लेषण (Cost-Benefit Analysis) या संकल्पनेच्या पार्श्वभूमीचा आधार प्रामुख्याने घेण्यात आला आहे. तसेच पर्यावरणशास्त्र व पर्यावरणाचे अर्थशास्त्र यातील जैव-विविधतेचा ऱ्हास (Loss of Bio-Diversity) ह्या संकल्पनेच्या पार्श्वभूमीचासुद्धा आधार घेण्यात आला आहे. विकासाच्या धोरणांचा पर्यावरणावरील परिणाम याचा अभ्यास करताना पर्यावरणात्मक परिणामाचे मूल्यमापन (Environment Impact Assessment) या संकल्पनेचा सुद्धा या शोधनिबंधासाठी उपयोग करण्यात आला आहे. परंतु या शोधनिबंधाची व्याप्ती आणि मर्यादा पुढीलप्रमाणे आहे.

### अभ्यासपद्धती व मर्यादा:

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच या शोधनिबंधामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असणाऱ्या भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदरांचा म्हणजेच मुंबई बंदर आणि मुंबईच्या आजुबाजूच्या परिसरातील बंदरांचा विकास आणि त्याचे पर्यावरणीय परिणाम यांचा आढावा घेण्यात आला आहे. ही या शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये बंदरांचा विकास आणि त्याचे पर्यावरणीय परिणाम याचा अभ्यास करत असताना सर्वप्रथम देशातील मुंबई बंदरांच्या विकासाची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहू.

### मुंबई बंदराच्या विकासाची पार्श्वभूमी:

मुंबई बंदर विकसित होण्याआधी सन १६६१ पर्यंत मुंबईची लांबी सुमारे एक मेट्रिक आणि रुंदी अर्धा मेट्रिक होती. डॉक्टर जॉन फ्रेयर हे युरोपहून पर्यटनासाठी आले असता त्यांनी मुंबईचे वर्णन असे केली की, *या बेटाचा बहुतेक भाग म्हणजे सुमारे ४००००बिघे जमीन समुद्राच्या पाण्याने भरून वाहत असते. आणि सरासरी १००००बिघे जमीन म्हणजे मुंबईची पाच लहान बेटे आहेत. त्यात खाऱ्या पाण्याच्या खाड्या असून त्या चिखलाने भरल्या आहेत. ओहोटीच्या वेळी ही बेटे पाच दिसतात. परंतु भरती आली की जिकडेतिकडे पाणी भरले की, कुलाबा, माझगाव, ओल्ड वुमेन बेट, वडाळा, माहीम, परेल, सायन, माटुंगा अशी ही सात बेटे होतात.* अशाप्रकारे बंदर विकासाआधी मुंबई वेगवेगळ्या बेटांचा समूह होती. परंतु विकासाचा ध्यास घेतलेल्या माणसांकडून

समुद्रात भराव टाकून अथवा समुद्राला मागे हटवून मुंबई सुपीक आणि माणसांना राहण्यायोग्य प्रशस्त आणि निरोगी करण्यासाठी पोर्तुगीज आणि त्यानंतर इंग्रजांच्या काळात अनेक प्रयत्न झाले. केवळ मच्छीमारीसाठी उपयुक्त असणाऱ्या मुंबईचे रूप पालटण्यास सन १६६० मध्ये सुरुवात झाली. ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून मुंबई एक सशक्त बंदर बनविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

सन १६६१ साली ब्रिटिशांनी मुंबईचा ताबा पोर्तुगिजांकडून मिळविला त्यावेळी मुंबई बंदर हे सर्वात मोठे आणि सर्वात सुरक्षित होते. इथे अनेक मोठी जहाजे बिनदिक्कतपणे उतरू शकत. किल्ल्याच्या (फोर्ट) उत्तरेकडे ४०० टन वजनाची जहाजे दुरुस्त करण्यात येत. ही जहाजे १५ फूट खोल पाण्यात उभी रहात. मुंबई बंदराचा विकास होत असताना मुंबई बेटाचे महसूल ७०,००० झेराफिन्स (तत्कालीन चलन) होते. पोर्तुगीज मुंबई, माझगाव, परळ आणि कोळीवाडा येथे मच्छीमारी करण्याचा हक्क सांगत. अशा तऱ्हेने बंदरांचा विकास होत असताना. मुंबईमध्ये १८ बाजारपेठा निर्माण झाल्या मुंबईची लोकसंख्या ५ लाखांपेक्षा जास्त झाली. म्हणजेच बंदरांच्या विकासाबरोबर नागरी विकास झपाट्याने झाला. समुद्रमार्गे दळणवळणाच्या सोयींमध्ये १८३० पासून सुधारणा करण्यात आली. त्यासाठी लाल समुद्र व भूमध्य सागर यांची पाहणी करण्यात आली. तसेच प्रत्येक महिन्याला मुंबई-लंडन प्रवास करणाऱ्या प्रवासी जहाजांची १८३८ मध्ये सुरुवात करण्यात आली. समुद्रमार्गे दळणवळणाच्या अद्ययावत सोयींमुळे मुंबई पाश्चिमात्य जगताशी जोडली गेली. त्यामुळे भारतीय लोकांच्या मनात प्रवासाची उमेद जागृत झाली आणि वाणी-बनीया समाजाचे लोक व्यापारासाठी इंग्लंडला जाऊ लागले. त्यानंतर १८७० साली बॉम्बे पोर्ट ट्रस्टची स्थापना करण्यात आली.

तत्पूर्वी सन १६९० साली समुद्रात चाचेगिरी चालू असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे व्यापारात अडथळे येत होते. डॅनिश, इंग्रज, अरब, कोटी, मलबार इ. अनेक ठिकाणचे चाचे किनारपट्टीवर लूट करत होते. त्यानंतर अठराव्या शतकात मराठ्यांची वाढती ताकद, डच आणि फ्रेंच लोकांकडून भविष्यात होऊ शकणारा हल्ला. तसेच युरोपात फ्रान्स व स्पेनविरुद्ध युद्ध या कारणांमुळे इंग्रजांनी मुंबईची सुरक्षा वाढवली. फोर्टजवळच्या १२० यार्ड परिसरातील सगळी झाडे तोडून टाकली. त्यानंतर १७२८ मध्ये दळणवळणाच्या दृष्टिने महालक्ष्मीतील समुद्रात भराव टाकण्यात आला. मुंबई बंदराच्या विकासाबरोबरच मुंबई शहराचा विकास होत होता. भायखळा आणि बॅकबेला खाडीत भराव टाकण्याचे काम जोरात सुरू झाले. बोरी बंदरावरून माझगावला जायला निघाल्यास एकसारखी एकास एक लागून थोड्या अंतरावर कर्नाटक बंदर, क्लेरबंदर, मशीद बंदर, चिंचबंदर, एल्फिन्स्टन बंदर आणि वाडीबंदर अशी बंदरे लागतात. ही बंदरे भाऊचा धक्का या नावाने प्रसिद्ध होती. म्हणजेच औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात व्यापाराच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मुंबई बंदराचा व मुंबई शहराचा विकास करण्यात आला. त्यामुळे मुंबईचे नैसर्गिक स्वरूप बदलून एक प्रगत व्यापारी केंद्र आणि बंदराचे शहर अशी जागतिक ओळख निर्माण करण्यात आली. परंतु हा विकास करत

असताना मुंबई बेटांवर उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक पर्यावरणीय घटकांमध्ये अनेक बदल घडवून आणण्यात आले. त्यामुळे तेथील खाडी व दलदलीत असणारे अनेक सूक्ष्मजीव नाहीसे झाले. ज्यांनी फोर्ट बांधले त्यांनी खाडी खूप खराब केली. त्यांनी खाडीवरचे दगड फोडले. खरे तर ते समुद्राच्या लाटांपासून संरक्षण करत. तिथे भराव टाकला गेला. अपोलो बंदर येथे १८५५ मध्ये उतरलेल्या मॅकलिन या प्रवाशाने असे म्हटले की, पूर्वेकडे भयानक असा फोर्ट ते शिवडी किनारा होता. अपोलो बंदरापासून कुलाबा आणि बॅकबेकडे जाणारा किनारी भाग पश्चिमेकडे होता. संपूर्ण मुंबई बेट हे दुर्गंधीयुक्त मलकुंड होते. गटाराचे पाणीसुद्धा समुद्रकिनारी वाळूत येऊन मिसळत होते. मलबार हिलपासून बॅकबेच्या टोकापर्यंत चालत गेल्यास भयानक वास येत होता. तिथल्या रस्त्याजवळच गटाराचे तोंड होते. रेल्वेने बोरीबंदर ते भायखळा जाणे म्हणजे शौचकुपात जाण्यासारखे होते.

अशा तऱ्हेने या विकासाच्या प्रक्रियेत समुद्रावर अनेक अतिक्रमणे झाली. समुद्राचे नैसर्गिक रूप बदलवून समुद्रामध्ये भराव टाकण्यात आले. विकासाला अडथळा ठरणारी झाडे तोडण्यात आली. शहराचे सांडपाणी, मैलायुक्त पाणी समुद्रात सोडल्याने सागरी प्रदूषणात वाढ झाली. १८६० ते १८७० या दशकात मुंबईत रोगांचा सुळसुळाट झाला होता, ही गोष्ट दुर्लक्षित करून चालणार नाही. मुंबई बंदराचा विकास झाल्यामुळे नागरीकरण वाढले परिणामी प्रदुषण व पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या.

**आधुनिक बंदर विकासाचे धोरण व परिणाम:**

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या व विकसित झालेल्या मुंबई बंदरांचा स्वातंत्र्योत्तर काळातही विकास झाला. परंतु वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार, वाढत्या तंत्रज्ञानाच्या सोयींमुळे जहाज निर्मितीतील बदल आणि जहाजांचे आकारमान, मुंबईतील नागरी समस्या आणि वाहतूक समस्या यांसारख्या अनेक कारणांमुळे मुंबई बंदराच्या जवळ अद्ययावत असे बंदर विकसित करण्याची गरज भासू लागली. मुंबईसारखे बंदर एक ना एक दिवस नैसर्गिकरित्या मृत्यू पावेल, ही अटकळ बांधूनच हालचाली सुरू होत्या. स्व. इंदिरा गांधींच्या अखेरच्या काळात मुंबई बंदराचे सॅटेलाइट बंदर म्हणून न्हावाशेवा येथील जवाहरलाल नेहरू बंदराची कल्पना पुढे आली. त्यामुळे मुंबई जवळच्या परिसरात न्हावाशेवा (ता. उरण जि. रायगड) येथे जवाहरलाल नेहरू पोर्टची (जेएनपीटी) स्थापना करून एक अद्ययावत व मोठे बंदर विकसित करण्यात आले.

साध्या मालवाहू जहाजांच्या जागी आलेल्या अवाढव्य कंटेनर्स वाहून नेणाऱ्या शिप्समुळे, अतिप्रचंड यांत्रिक क्रेन्समुळे बंदरांचे आकारमान, उपयोगिता बदलली आहे. कंटेनर वाहतुकीसाठी मोठ-मोठे मल्टीअॅक्सल ट्रक्स यांची गर्दी आता या बंदर परिसरात होऊ लागली असल्याने वाहतुक कोंडीची समस्या वाढली आहे. त्याचप्रमाणे या वाहतुकीसाठी येणारे-जाणारे ट्रक चालक, व सहाय्यक यांच्या राहण्याची, स्वच्छतेची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे या बंदर परिसरातील भागातही नागरी समस्या निर्माण होऊन प्रदुषण वाढले आहे. या बंदरांच्या विकासामुळे व्यापारामध्ये निश्चितच वृद्धी झाल्याने आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. परंतु त्याबरोबरच प्रदूषणाच्या ज्या समस्या

निर्माण झाल्या आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही यासंदर्भातून राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचा एक ऐतिहासिक निर्णय झाला त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

जेएनपीटी प्रकल्पाच्या कक्षा सातत्याने वाढविण्यात आल्या. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांच्या उरनिर्वाहाच्या साधनांवर मर्यादा आल्या. त्यामुळे एकूण १६३० मच्छिमार परिवारांना ९५ कोटी १९ लाख ३० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा आदेश सिडको, जेएनपीटी आणि ओनजीसी यांना दिला आहे. इतरही अनेक ठिकाणी विकासाची व्याप्ती वाढविण्यात येत असल्याने पर्यावरण व पारंपरिक अर्थार्जनाच्या साधनांवर आक्रमण होत आहे. असे निरिक्षण राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने नोंदविले. मुंबईच्या वाढत्या विकासाच्या वेगामुळे कुलाबा, डोंगरी, माझगाव, माहीम, वरळी, परळ येथील खाडीदेखील अशाच आक्रमणाला तोंड देत आहे. खाडी बुजविण्याच्या या अट्टहासाने गंभीर पर्यावरणीय समस्या उभ्या राहण्याचा धोका आहे, असा इशारा न्यायाधिकारणाने दिला आहे.

**बंदर विकासाचे नवे धोरण:**

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या ७२० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीवर दोन मोठी बंदरे आणि ४८ लहान बंदरांचा व्यवसायाभिमुख विकास करण्यासाठी २०१५ च्या नवीन बंदर विकास धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने २५ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. राज्याच्या या नवीन बंदर विकासाच्या धोरणाचाच एक भाग म्हणजे मुंबई व नवीमुंबईच्या दरम्यान असलेल्या मानखुर्द येथील खाडीत आणखी एक बंदर विकसित करण्यात येत आहे त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

डिसेंबर २०१५ च्या पहिल्या आठवड्यात मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावर मानखुर्द येथे योगायतन समूहातर्फे उभारण्यात येणाऱ्या मध्यम आकाराच्या खासगी बंदर प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. ठाणे खाडीच्या मुखाशी मानखुर्द-वाशी रेल्वे ब्रिजपासून शंभर मीटरवर आणि नव्या मुंबईतील जेएनपीटीपासून दहा सागरी मैलांवर हे बंदर उभारलं जातंय. सागरी मालवाहतुकीच्या क्षेत्रात ज्याला कार्गो म्हणतात असा वेगवेगळ्या प्रकारचा माल (किरकोळ, घाऊक, सुट्टा माल) उतरवून घेऊन जमिनीवरून वाहून नेण्यासाठी, जहाजबांधणी व शास्त्रशुद्ध जहाजदुरुस्तीसाठी आणि अर्थातच मुंबईसारख्या प्रमुख बंदरावरील भार हलका करण्यासाठी योगायतनसारख्या मध्यम आकाराच्या बंदराचा उपयोग व्हावा हा हेतू आहे. टाटा पॉवरसाठी मुंबई बंदरात येणारा कोळसा उतरवून घेण्यावर योगायतन बंदराचा अधिक भार असेल. मुंबई बंदरात जिथे हा कोळसा उतरवला व हाताळला जातो त्यापासून योगायतन बंदर फार तर २० कि.मी. एवढंच दूर आहे. खाडीच्या दोन्ही बाजूस म्हणजे मानखुर्द आणि वाशी येथे कांदळवन असल्याचे आजही स्पष्टपणे दिसून येते.

मुंबई, न्हावाशेवा या बंदरांच्या मर्यादा लक्षात घेऊन मुंबई जवळील ठाणे जिल्ह्यातील डहाणूजवळील बंदरासाठीसुद्धा सरकार प्रयत्नशील आहे त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

डहाणूपासून २० कि.मी. अंतरावर असलेल्या वाढवण परिसरात बंदर उभारण्याची योजना आहे. किनारपट्टीच्या जवळ समुद्राची खोली २० मीटर असून एवढी खोली कोणत्याच किनारपट्टीजवळ नाही. २० मीटर खोली असल्याने

मोठी जहाजे किनारपट्टीवर येऊ शकतात. अन्यथा मोठी जहाजे समुद्रात लांबवर उभी करावी लागतात. त्यामुळेच वाढवण बंदर उभारण्याकरिता केंद्र व राज्यसरकारची योजना आहे. तसेच १९९६ मध्ये शिवसेना व भाजप युतीच्या सरकारनेही या बंदराची योजना आखली होती.

परंतु या महाकाय बंदरास वाढवणसह आसपासच्या गावातील नागरिकांनी तीव्र विरोध केला होता. बंदराच्या विरोधात हिंसक आंदोलन झाले होते. डहाणू तालुका हा सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील म्हणून जाहीर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच पर्यावरणविषयक मंजुरीसाठी प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. वाढवण बंदरामुळे डहाणू तालुक्यातील पर्यावरणाचा ऱ्हास होईल या मुद्यावर डहाणू प्राधिकरणाने बंदराला परवानगी नाकारली होती. आता या बंदर उभारणीसाठी पुन्हा पुढाकार घेण्यात आला आहे.

अशा प्रकारे आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी बंदरांच्या विकासाचे नवे धोरण आखण्यात आले असून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. याबंदरांच्या विकासाच्या धोरणातून आर्थिक विकासाचा लाभ होणार असला तरी पर्यावरणाच्या दृष्टीने व्यय होणार असल्याचे दिसून येऊ लागले आहे. त्या दृष्टीकोनातून या शोधनिबंधाचे निष्कर्ष व मूल्यमापन पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:**

मुंबई बंदराचा विकास करताना समुद्राला हटविण्यात आले. समुद्रामध्ये वा खाडीमध्ये भराव टाकण्यात आला. झाडे तोडण्यात आली. त्यामुळे पर्यावरणीय घटकात बदल घडून आले व परिणामी जैवविविधतेचे नुकसान झाले. हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष या शोधनिबंधातून दृष्टोत्पत्तीस येतो.

त्याचप्रमाणे मुंबई जवळील न्हावाशेवा येथील जेएनपीटी या बंदराच्या विकासामुळे तेथील पारंपरिक मच्छिमारीचा उद्योग बंद झाला. त्यामुळे मच्छिमारीसारख्या पारंपरिक उद्योगावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचे आर्थिक नुकसान झाले, त्यांच्या विकासाला खीळ बसली. तसेच या बंदराच्या विकासामुळे समुद्रातील जैवविविधतेस नुकसान झाले असल्याचा निष्कर्षही दृष्टीस येतो.

त्यानंतर मुंबई बंदरापासून फक्त २० कि.मी. अंतरावर असणाऱ्या मानखुर्द येथे बंदर विकसित करण्यात येत आहे. मानखुर्द येथील खाडीच्या दोन्ही बाजूस म्हणजेच मानखुर्द आणि वाशी येथे कांदळवन आहे. हे कांदळवन मुंबई-पुणे महामार्गावरून जाताना आजही स्पष्टपणे दिसते. या बंदराच्या विकासाचा परिणाम या परिसरातील वनक्षेत्रावर निश्चितच होणार आहे. त्यामुळे तेथेसुद्धा जैवविविधतेस धोका आहे.

या बंदरांच्या विकासाच्या धोरणामध्ये मुंबई जवळील डहाणूयेथील वाढवण येथेसुद्धा बंदर विकासाचे धोरण आहे. परंतु तेथील पर्यावरणीय संवेदनशीलतेमुळे सर्वोच्च न्यायालयाने व प्राधिकरणाने बंदर विकासाला १९९६ मध्ये परवानगी नाकारली होती. त्यामुळे येथे महाकाय बंदराची उभारणी झाल्यास पर्यावरणाचा ऱ्हास होणार असल्याचा निष्कर्ष आढळून येतो.

**मूल्यमापन:**

आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्यासाठी आवश्यक बंदरांचा विकास अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला

चालना मिळते. पर्यायाने देशातील नागरिकांचाही विकास होतो. विकासाच्या या प्रक्रियेत देशातील काही समस्या वा बंदी असलेल्या उद्योगांबाबत या आंतरराष्ट्रीय वाहतुकीचा आणि बंदरांचा लाभ होत असल्याचे आढळून येते.

उदा. महाराष्ट्रात वाळू उपशावर बंदी असल्याने परदेशातून वाळू आणावी लागत आहे. आयात केलेली ५० हजार टन वाळू घेऊन येणारे जहाज फिलिपिन्समधून मुंबई बंदरात ऑक्टोबर २०१५ दाखल झाले. म्हणजेच पर्यावरणीय दृष्टीकोनातून बंदी घातलेल्या वाळू सारख्या वस्तूची गरज भागविण्यासाठी आणि आयात व वाहतुकीसाठी मुंबई सारख्या महत्त्वपूर्ण बंदरांमुळे निश्चितच लाभ होतो.

परंतु बंदरांच्या विकासाच्या धोरणामुळे आर्थिक विकासाला चालना मिळत असली तरी नैसर्गिक पर्यावरणात बदल घडवून आणण्यात येतो. बंदरांच्या विकासामुळे नागरीकरणात वाढ होते. त्यामुळे प्रदूषणात वाढ होऊन पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होतात. जैवविविधतेचे नुकसान होते. यांसारख्या पर्यावरणीय घटकांचा व्यय होत आहे वा बळी जात आहे. त्यामुळे या व्यय-लाभ विश्लेषणाच्या दृष्टीकोनातून बंदर-विकासाच्या नव्या धोरणामध्ये बंदरांच्या जवळच जैवविविधतेचा विकास करण्याचे धोरण आखणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


1) *Environmental Economics*, by Dr. Vijay H. Nagre, Chandralok Prakashan, Kanpur, 2012
2) *Environmental Status and Policy in India*, by V.S. Ganesamurthy, New Century Publication, New Delhi, 2001
३) *मुंबई शहर गॅझेटिअर*, ले. जयराज साळगावकर, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे (प.), एप्रिल २०१५
४) दै. महाराष्ट्र टाइम्स - ९ मार्च २०१५, १७ ऑक्टो.२०१५, २३ जाने. २०१६, २६ जाने. २०१६
५) दै. लोकसत्ता - २ जून २०१५, २०डिसें. २०१५.

# डॉ. अमर्त्य सेन यांचे आर्थिक सामाजिक विचार

**भिमराव पांडुरंग उगले, बीड,**
बलभिम महाविद्यालय,
भ्रमणध्वनी:९४०५०३०४२७
ई-मेल: bhimrao.beed@gmail.com

अमर्त्य सेन यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९३३ साली पश्चिम बंगाल राज्यात शांति-निकेतन येथे झाला. अमर्त्य सेन यांचे वडील रसायन शास्त्राचे प्राध्यापक होते, तर आई अनिता सेन उच्चशिक्षित कवयित्री व साहित्यिक आणि रविंद्रनाथ टागोरांची हुशार विद्यार्थिनी होती. अशा घराण्यात अमर्त्य सेन यांचा जन्म झाला असला तरी समाजात असणाऱ्या आर्थिक व सामाजिक समस्यांवर त्यांनी आपले विचार मांडून देशातील सर्वसामान्य व्यक्तीचे कल्याण कसे साधता येईल हीच दूरदृष्टी ठेवून विचार मांडले. लहानपणापासूनच खुप बुध्दीमान असणारे अमर्त्य सेन यांनी सातवीच्या वर्गात असताना संथाल या आदिवासी जमातीच्या निरीक्षणावरून लेख लिहिला होता. अशा नावीन्यपूर्ण करणाऱ्या व काही तरी करण्याची जिद्द उराशी बाळणाऱ्या अमर्त्य सेन बद्दल रविंद्रनाथ टागोर म्हणतात की, हा मुलगा ज्ञात जगाच्या पलिकडे जाईल आणि एक दिवस असामान्य माणूस म्हणून नावारूपास येईल. लहानपणापासून काहीतरी करण्याची धडपड असणाऱ्या अमर्त्य सेन यांनी पदवीचे शिक्षण प्रेसिडेन्सी महाविद्यालयात आणि नंतर इंग्लंडमध्ये पुढील शिक्षणासाठी १९५३ केंब्रिजमधील ट्रिनिटी महाविद्यालयात प्रवेश घेऊन १९५५ साली त्यांनी पीएच्.डी. साठी थेट केंब्रिज विद्यापीठात नाव नोंदणी केली. १९५९ साली केंब्रिज विद्यापीठातून श्रीमती जोन रॉबिन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्.डी ही पदवी संपादन केली. *The Choice of Technique* या संशोधन विषयावर प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मॉरीस जॉब यांचे सहकार्य त्यांना मिळाले. अशा जगविख्यात नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या अमर्त्य सेन यांनी समाजातील लोकांना सामाजिक क्षमतांचा विकास, आरोग्य, शिक्षण, आहार, दुष्काळ, दारिद्र्य, आर्थिक विषमता वर सखोल विचार मांडून मोलाचे कार्य केले आहे.

### आर्थिक विचार:

अमर्त्य सेन यांनी आपल्या विचारामध्ये दुष्काळ, दारिद्र्य, उपासमार, आर्थिक विषमता, आरोग्य, शिक्षण, स्त्री-समानता, लोकशाही राज्यव्यवस्था आणि वाढती लोकसंख्या आदिंना आर्थिक विकासामध्ये स्थान दिले. कल्याणकारी अर्थशास्त्रात त्यांनी मौलिक योगदान देऊन, देशामध्ये लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्था असल्यास कल्याणकारी धोरण व्यवस्थितपणे राबविता येणे शक्य आहे, असे अमर्त्य सेन यांना वाटते. म्हणूनच त्यांनी लोकशाही, लोकांचे स्वातंत्र्य या बाबींना महत्व दिले. दारिद्र्य, दुष्काळ, बेकारी यासारख्या समस्या सोडविण्यासाठी खाजगी क्षेत्र फारसा पुढाकार घेत नाहीत. म्हणून सार्वजनिक उपाययोजना महत्वाच्या ठरतात. वास्तविक सेन यांच्या विचारांचे महत्व म्हणजे त्यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राला नवीन दिशा दिली. देशातील समाज रचनेतील अगदी तळाच्या व्यक्तीच्या गरिबीच्या समस्येचा त्यांनी अत्यंत मार्मिकपणे उहापोह केला. म्हणूनच देशातील सर्वसामान्य व्यक्तीचे कल्याण कसे साधता येईल, या बाबत त्यांनी मांडलेले विचार सर्वसामान्यांसाठी महत्वाचे असून शासनास आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी प्रेरक आहे असे म्हणता येईल.

१९७० च्या दशकाच्या मध्यावर सेन यांनी दुष्काळ विषयी संशोधन अभ्यासातून *पॉव्हर्टी अँड फॅमिन्स* हे पुस्तक त्यांनी लिहिले. याच पुस्तकामध्ये त्यांनी असे म्हटले की १९४३ च्या बंगालच्या दुष्काळाची भयाण परिस्थिती होती म्हणून अर्थशास्त्र हे गरीब, पीडित लोकांच्या विषयी भाष्य करते, म्हणूनच मला ते जवळचे वाटतात. सेन यांच्या मते, सर्वच दुष्काळ हे नैसर्गिक आपत्तीने निर्माण होत नाहीत, तर हे दुष्काळ मानवनिर्मित आहेत. कारण त्यांच्या मते, धान्याच्या गतिक्षमतेचा अभाव संकटकाळी धान्याचा अभाव, गरिबांकडील क्रयशक्तीचा अभाव, गरिबांच्या रोजगार संधीचा अभाव, दुष्काळाच्या प्रारंभीच्या काळातील सरकारची उदासीनता, व्यापाऱ्यांमार्फत होणारी साठेबाजी, धान्याच्या काळा बाजाराचा सुळसुळाट, दुष्काळ मदतीचे अयोग्य व्यवस्थापन, साक्षरता, शिक्षण आणि पुरेशा आरोग्य काळजीचा अभाव असल्याकारणाने दुष्काळी स्थितीमुळे प्रामुख्याने गरीब मुले, वृद्ध व महिला आणि इतरांचे नुकसान होते. म्हणूनच ते म्हणतात की, दुष्काळाच्या काळात धान्याची टंचाई नसते, तर वरील उपाययोजनांचा अभाव असल्यामुळे गरिबांना क्रयशक्ती अभावी धान्याची खरेदी करता येत नाही, थोडक्यात असे म्हणता येईल, सरकारने याचे समतोल नियोजन व व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

अमर्त्य सेन यांच्यावर पीटर बॉरच्या विचारसरणीचा खूप प्रभाव पडला. सेन यांना १९९८ साली त्यांच्या वेल्फेअर इकॉनॉमिक्स, दुष्काळ आणि मानवी विकास कामाबद्दल नोबेल परितोषिक मिळाले. अर्थात नोबेल पारितोषिक मिळायला पार्श्वभूमीही बरीच होती. १९७० साली *कलेक्टिव्ह चॉईस अँड सोशल वेल्फेअर* या सेन यांच्या पुस्तकामुळे ते विद्यार्थ्यांत खूपच लोकप्रिय झाले होते. १० वर्षे अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठामध्ये शिकविल्यामुळे त्यांचे नाव ग्रॅलवेथ, पॉल सॅम्युअल्सन आणि रॉबर्ट सोलोव्ह यांच्या बरोबर घेतले जाते. १९९६ साली सेन हे

अमेरिकन इकॉनॉमिक्स असोसिएशन चे पहिलेच नॉन अमेरिकन अध्यक्ष बनले होते. इंग्लंड आणि अमेरिका येथील बुध्दिवंतांच्या वर्तुळात सेन यांचे नाव खूप आदराने घेतले जाते. १९९८ साली इंटरनेटवर घेतलेल्या एका मनचाचणीमध्ये अमर्त्य सेन लोकप्रिय होतेच त्याबरोबर एक सखोल महान आर्थिक विचारवंत आहेत. १९७२ साली केनेथ ॲरोला *वेल्फेअर इकॉनॉमिक्स* यासाठी नोबेल पारितोषिक मिळाले असले तरी मी सेन यांच्याकडून खूप शिकलो असे ॲरो म्हणतात. तर एस.आय.टी चे नोबेल पारितोषिक लॉरेट सोलोव्ह हा तर सेन यांना *दी कॉन्शन्स ऑफ इकॉनॉमिक्स* असे म्हणत असत.

अमर्त्य सेन यांनी आर्थिक विषमतेवर लिखाण मांडत असतांना त्यांनी आर्थिक विषमतेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरणातील तफावत लक्षात घेतली असून दारिद्र्य व आर्थिक विषमता या दोन्ही बाबी एकमेकांशी संबंधित आहेत. आर्थिक विषमता वाढल्यास दारिद्र्यांची समस्या गंभीर बनते म्हणून सेन यांनी उत्पन्न वितरणातील विषमता लक्षात घेणारी दारिद्र्याची संकल्पना मांडली. भारतातील गरिबी व आर्थिक विषमतेवर सेन यांनी संशोधनातून किमान वास्तव दरडोई उत्पन्न साध्य करणाच्या ध्येयाबाबत अधिष्ठान दृष्टीकोन १९६०-६१ मध्ये स्वीकारण्यात आला. अमर्त्य सेन म्हणतात की, दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या उत्पन्नाचे आणि उपभोगाचे वितरण ही लक्षात घेणे आवश्यक आहे. दारिद्र्य रेषेखालील प्रारंभीचे वितरण थोड्या बहुत फरकाने कायम राहते. जर हे वितरण दारिद्र्य रेषेच्या बाजूने अधिक झुकले असेल तर सेन तफावत (Sen Gap) अधिक राहील. सेन यांनी दारिद्र्य मापनावर आर्थिक विषमतेवर पुढील सूत्र मांडले आहे.

$$P = [I + (1 - I) G] H$$

P = दारिद्र्य निर्देशांक, I = वितरणाचे परिणाम, G = गिनीचा सहगुणांक, H = दारिद्र्य रेषेखालील लोकांचे दरडोई मापन.

सेन यांच्या मते, गरिबाच्या उपभोगातील वस्तूंचा किंमत निर्देशांक घटल्यास दारिद्र्य निर्देशांक घटतो तर याउलट अशा वस्तूंचा किंमत निर्देशांक वाढल्यास दारिद्र्य निर्देशांकात वाढ होईल. गरिबांच्या संख्येत वाढ झाल्यास सरासरीमध्ये उपभोग घटेल. याच बरोबर वेतन वस्तूंच्या उत्पादनात घटत्या फलाची प्रचिती येत असेल तर दारिद्र्य रेषा वर सरकते. थोडक्यात, वरील परिणाम हे दारिद्र्य रेषा गटातील वितरणातील बदलांचे मापदंड, वेतन - वस्तूंच्या किंमत निर्देशांकातील बदल, उत्पादकतेतील बदलाने वेतन वस्तूंच्या साजेशा किंमतीतील बदल यांच्याशी संवेदनशील आहे.

दारिद्र्य विषयावर अमर्त्य सेन म्हणतात की, दारिद्र्य निर्मुलनासाठी दारिद्र्याचे अचूक मापन करणे आवश्यक आहे. तेव्हा दारिद्र्यात घट किंवा वाढ झाली की नाही कळेल. दारिद्र्याचे मापन ठरविण्यासाठी विशिष्ट उत्पन्न पातळी किंवा विशिष्ट उष्मांक पातळी ठरविली जाते. व्यक्तीला किमान गरजा भागविता येण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न प्राप्त होत नसेल तर त्या व्यक्तीचा समावेश दारिद्र्य रेषेमध्ये केला जातो. पण ही संकल्पना डॉ. सेन यांना मान्य नाही अमर्त्य सेन यांचे असे मत आहे की, केवळ मोठे कारखाने उभारून अविकसित देशांचा विकास साधता येणार नाही. त्यासाठी मानवी संसाधनांमध्ये मोठी गुंतवणूक करणे आवश्यक ठरते. आयूर्मान, प्रौढ

साक्षरता, शिक्षण, आरोग्य, आदि बाबींचा समावेश यात होतो. दारिद्र्य दूर करण्यासाठी लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून वेतन ही किमान गरजा भागविण्यावर असणे जरूरीचे आहे. तेव्हा त्याच बरोबर त्यांची खरेदी शक्ती वाढल्याशिवाय दारिद्र्य दूर होणार नाही. यामुळे अमर्त्य सेन यांच्या मते, खरेदी शक्ती वाढल्यास दुष्काळ व उपासमारीच्या संकटावरही मात करता येईल.

**सामाजिक विचार:**

अमर्त्य सेन यांनी सामाजिक विचारामध्ये सामाजिक क्षमतांचा विकास शिक्षणातील कार्य व महत्व, समाजातील आरोग्य आणि आहारा विषयी त्यांचे योगदान आहे. अमर्त्य सेन म्हणतात की, सामाजिक क्षमतांना प्रमुख चल किंवा समानतेसाठीचा वाव आहे. क्षमता ही कोणत्याही व्यक्तीची योग्य जगण्याशी निगडीत व दिशा आहे. सामाजिक क्षमतांचा विकास झाल्यास व्यक्तीला इच्छेप्रमाणे योग्य जीवन जगण्याचे स्वातंत्र्य कळेल म्हणून व्यक्तीच्या जीवनाच्या गुणवत्तेवरून त्याचे योग्य जगणे लक्षात येते. यामुळे व्यक्तीला मिळणारा आनंद, स्वाभिमान, सामुदायिक जीवनातील सहभाग इत्यादीद्वारे व्यक्तीची यशप्राप्ती पाहता येते. म्हणून सेन म्हणतात की, व्यक्ती साध्य करू शकणाऱ्या कार्यांचे विविध संयोग म्हणजे *क्षमता* होय. प्रत्येक व्यक्ती मधील क्षमता भिन्न-भिन्न असल्यामुळे जो-तो आपल्या क्षमतेनुसार सामाजिक क्षमतांचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करतो. म्हणून व्यक्तीच्या विकासात समानता आढळत नाही. अशामुळे त्यांच्याकडील क्षमतांचा विकास साधण्यासाठी त्यांना समान संधी प्राप्त होत नाही, त्यामुळे त्यांना समान संधी प्राप्त करून देण्यासाठी सरकारची भूमिका महत्वाची असते. म्हणून सेन यांच्या मते, लोकांच्या सामाजिक क्षमतांचा विकास साधण्यासाठी सरकारचा हस्तक्षेप आवश्यक आहे. तेव्हाच सामाजिक क्षमतांचा विकासामध्ये समानता निर्माण होऊन सर्वांना समान संधी प्राप्त करता येते. अमर्त्य सेन यांनी सामाजिक कल्याणाचे विश्लेषण करतांना आरोग्य हा घटक लक्षात घेतला आहे. सेन यांच्या मते, जनतेला आरोग्याच्या पुरेशा सोयी उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यातूनच रोगराई आणि शारीरिक दुर्बलतेपासून समाजाला मुक्ती मिळेल. जर आरोग्य विषयक सोयी समाजाला प्राप्त नाही झाल्या तर लोकांमध्ये अनेक प्रकाराच्या रोगराईचे साम्राज्य निर्माण होऊन आर्थिक विकासाला मार्ग ठरते. म्हणून कुपोषण व अनारोग्यामुळे मानवाची कार्यक्षमता घटते व मृत्युदर प्रमाणात वाढ होऊन लोकसंख्या वाढीचा वेग मंदावतो. म्हणून सेन म्हणतात की, उत्तम आरोग्यामुळे मानवी संसाधनांची गुणवत्ता व उत्पादकता वाढते. याच बरोबर समाजाला सक्षम व सुदृढ बनविण्याकरिता सरकारला आरोग्य सोयींसाठी पुरेसा खर्च करणे आवश्यक आहे. आरोग्य चांगल्या प्रकारे राहण्यासाठी आहाराची आवश्यकता असते. पण सुदृढ आरोग्य होण्यासाठी मानवाच्या आहारामध्ये सकल आहार असणे आवश्यक असते. म्हणून सेन म्हणतात की, आर्थिक व्यवहारातून कल्याणाची निर्मिती होते. पण अविकसित देशातील लोकांचे उत्पन्न अल्प प्रमाणात असल्याने त्यांची क्रयशक्ती कमी असते. तर दुष्काळाच्या स्थितीत तर त्यांच्या परिस्थितीमध्ये दैन्य अवस्था निर्माण झाल्यामुळे अशा लोकांना

अर्धपोटी व कुपोषित रहावे लागते. याचाच परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो व त्यांची कार्यक्षमता घटते. म्हणून अशा अविकसित देशातील लोकांच्या आहारातील पोषक घटकांची कमतरता भरून काढण्याच्या उपायांना सेन महत्व देतात. सर्व सामान्यांच्या आरोग्य सोयीकडे लक्ष पुरविल्याने व आरोग्य पातळीत सुधारणा घडवून आणल्यास लोकांची काम करण्याची क्षमता वाढून आर्थिक विकास साध्य करण्यास मदत होते. पण लोकांच्या खरेदी शक्तीमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी देशामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करून रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी प्राप्त करून दिल्यास लोकांची क्रयशक्ती वाढते. यातूनच त्यांचे आरोग्य व सकल आहारामध्ये समतोल निर्माण होईल. सेन यांनी आरोग्य व आहाराविषयी जसे महत्व दिले आहे तसेच महत्व शिक्षणाला देतात. सेन यांच्या मते, शिक्षणाद्वारे लोकांच्या जीवनाचा दर्जा उंचावतो. कारण शिक्षणाकडे वैचारिक क्रांती घडून येण्यास मदत होते तर विचारांचे आदान प्रदान घडून येते. म्हणूनच समाजामध्ये परिवर्तनाचे माध्यम म्हणून शिक्षणाकडे पाहता येते. तेव्हाच देशात आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यात शिक्षणाचे योगदान महत्वपूर्ण असते. म्हणून सेन म्हणतात की, शिक्षण प्रसाराच्या कार्यात सरकारने मोठ्या प्रमाणात खर्च करून शिक्षणाची सर्वांना समान संधी प्राप्त करून देण्याची महत्वाची भूमिका असते. भारतामध्ये शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या जेमतेम ३% इतका खर्च हा अल्प प्रमाणात असून त्यात मोठ्या प्रमाणावर खर्च होणे गरजेचे आहे. तेव्हाच साक्षरता वाढल्यास जन्मदर व बालमृत्यू आणि दारिद्र्याचे प्रमाणामध्ये घट होते.

थोडक्यात अमर्त्य सेन यांनी कल्याणाचा विचार करतांना दुष्काळ, सामाजिक निवड, साक्षरता, शिक्षण, आरोग्य व आहार, दारिद्र्य आणि सामाजिक क्षमता इत्यादी बाबी लक्षात घेतल्या आहे. प्रत्येक वर्षी राष्ट्रीय उत्पन्न झपाट्याने वाढूनही निरक्षरता, उपासमार, अपुऱ्या आरोग्य सोयी यासारख्या समस्या तशाच राहिल्यास देशाची आर्थिक व सामाजिक प्रगती झाली असे म्हणता येणार नाही. म्हणून सेन यांनी या समस्येकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. एखाद्या कडून आर्थिक संधीचा वापर केला गेला, तर त्यातून इतरांना आर्थिक संधी उपलब्ध होतात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्रियांना महत्व दिले पाहिजे. मानवी विकास प्रयत्नात महिला दुर्लक्षित राहता कामा नयेत असे यांनी प्रतिपादन केले म्हणून डॉ. सेन यांचे आर्थिक व सामाजिक विचार जगातील कोणत्याही देशातील अर्थव्यवस्थेला पोषक ठरणारे आहेत. अशा विचार प्रणालीवर जी अर्थव्यवस्था असेल तर समान संधी प्राप्त करून देणारी असून समतोल विकासाला स्थान देणारे असेल. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कल्याणाच्या अर्थशास्त्राला नविन दिशा देणारे एक अर्थतज्ज्ञ म्हणून ज्यांची ख्याती आजही राहणार व भविष्यातही राहणार यामध्ये कोणतेही दुमत नाही अमर्त्य सेन यांच्या विचाराचा प्रभाव अनेक देशातील अर्थव्यवस्थेमध्ये दिसत असून येणाऱ्या काळामध्ये अमर्त्य सेन यांच्या विचारावरून अर्थव्यवस्था निर्माण करण्यात व अंमलबजावणी करण्याचे काम पुढील देश नक्कीच करणार आहेत. म्हणून समतोल विकास साध्य होईल यातूनच

राजकिय हेतू न राहता आर्थिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील असतील. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये ज्या नविन संकल्पना मांडून नवीन दिशा दिल्याने त्यांना १९९८ साली नोबेल पारितोषिक व १९९९ साली भारतरत्न पुरस्कार देऊन बहुमान केला आहे. म्हणुनच असामान्य अर्थतज्ज्ञांमध्ये ज्यांचे आदराने नाव घेतले जाते अशा डॉ. अमर्त्य सेन यांना माझा नेहमी सलाम राहिल.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी, *आर्थिक विचारांचा इतिहास*, पृ. ३५१ ते ३५८.

२) डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. संजय धोंडे, डॉ. अनिल सत्रे, *आर्थिक विचारांचा इतिहास*, एज्युकेशनल पब्लिकेशर्स, औरंगाबाद पृ. १४४, १४५.

३) डॉ. अमर्त्य सेन, *पॉव्हर्टी ॲण्ड फॅमिन्स*, ऑक्सफोर्ड युनिव्हरसिटी प्रेस, नई दिल्ली, पृ. १०, २७, ३३.

४) डॉ. अमर्त्य सेन, *India Development and participation, New Delhi, Oxford University Press*, 2002, PP. 22,25,29.

५) *Internet, wikipidea & encyclopedia.*


### मराठी अर्थशास्त्र परिषद: महत्त्वाची सूचना

## मतदारांसाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळातील रिक्त होणाऱ्या पदाकरिता (कार्यकारी मंडळ सदस्य, अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह खजिनदार) मतदान घेतले जाते. या संदर्भात जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयात १९ एप्रिल २०१५ रोजी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढील महत्त्वपूर्ण निर्णय झाला आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाच्या विविध जागांसाठी यापुढे घेतल्या जाणाऱ्या मतदानाकरिता परिषदेच्या आजीव सदस्यांनी (मतदानासाठी पात्र असलेले सभासद क्रमांक) आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड(शासनाचे), पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे याची कृपया सन्माननीय आजीव सदस्यांनी नोंद घ्यावी.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे झालेल्या ३९व्या (नोव्हेंबर २०१५) अधिवेशनापासूनच ओळखपत्र सक्तीचे करण्यात आलेले आहे. चांदवड येथील श्री.नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित कर्मवीर के.ह.आबड कला, श्रीमान मो. गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान महाविद्यालयात होणाऱ्या ४०व्या राष्ट्रीय अधिवेशनात (दि.६ ते ८ नोव्हेंबर २०१६) ओळखपत्र नसल्यास मतदान करता येणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी. याकरिता आपणाकडून सहकार्य अपेक्षित आहे.

-कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# एकच कर - वस्तू व सेवा कर

**सुरेश दगडू पाटील, जळगाव,**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग, ज.जि.म.वि.प्र. समाजाचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९८६०४०३६१७
ई-मेल: sureshdagadupatil1@gmail.com

कोणत्याही शासनास आपले दायित्व निभाविण्यासाठी उत्पन्नाची आवश्यकता असते. उत्पन्न मिळविण्यासाठी कर हा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा मार्ग आहे. कर ही ऐच्छिक देणगी नसते तर सरकारी तिजोरीत जमा करावयाची ती सक्तीची वर्गणी असते, जिचा उपयोग लोककल्याणासाठी त्यांच्या योजनांसाठी केला जातो. आर्थिक समृध्दीचे जगात जे काही निकष मानले जातात म्हणजेच सोन्याचा साठा, देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी), एकूण आर्थिक उलाढाल, जनतेची क्रयशक्ती, पीकयोग्य जमीन, नैसर्गिक साधनसंपत्ती, शेअर बाजारातील व्यवहार आणि औद्योगिक उत्पादन अशा सर्व निकषात स्पर्धा करणारा आपला भारत देश सर्व संपन्न असूनही अनेक आर्थिक पेचांमध्ये अडकला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे देशातील जाचक अशी करव्यवस्था होय.

ज्या करव्यवस्थेतून सरकारला खर्चाकरिता मोठ्या प्रमाणात महसूल मिळायला हवा तो त्या पेक्षा कितीतरी कमी मिळतो. कारण देशात करचुकवेगीरी ही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. यामुळे सरकारच्या लोककल्याणकारी योजना कार्यन्वित करतांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत. संपूर्ण जगामध्ये करांद्वारे जमा होणाऱ्या महसूलाचा जी.डी.पी. मधील वाटा बघितल्यास ब्राझीलचा वाटा ३४.४ टक्के, चीनचा २२ टक्के, रशियाचा १९.५ टक्के, दक्षिण अफ्रिकेचा २६ टक्के, ऑस्ट्रेलियाचा २५.८ टक्के, जपानचा २८.३ टक्के, ब्रिटनचा ३९ टक्के, अमेरिकेचा २६.९, टक्के फ्रान्सचा ४४.६ टक्के, स्विडनचा ४५.८ टक्के आणि जर्मनीचा ४०.६ टक्के आहे तर भारताचा १७.७ टक्के एवढा कमी आहे.

कराचे वर्गीकरण केल्यास प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर असे प्रमुख दोन प्रकार पडतात. भारतात या दोन करांचे करांपासून मिळणाऱ्या महसूलात प्रत्यक्ष करापासून मिळणारा महसूल आणि अप्रत्यक्ष करापासून मिळणारा महसूल यामध्ये जास्त अंतर नाही. प्रत्यक्ष कर हा ज्याच्यावर आकारला जातो त्यांच्यावरच त्याचा भार असतो, मात्र अप्रत्यक्ष कराचा भार हा संपूर्णतः उपभोक्ता वर्गावरच असतो. भारतात २०१५-१६ या आर्थिक वर्षात एकूण करप्राप्त महसूलामध्ये प्रत्यक्ष कराचा वाटा ५५.६ टक्के असून अप्रत्यक्ष कराचा वाटा ४४.४ टक्के आहे.

**भारतातील जीएसटीचा प्रवासः**

भारतात करांपासून शासनास महसूलात वाढ होण्यासाठी तसेच कर संकलन आणि कर देणे ह्या गोष्टी सुलभ होण्यासाठी एक नवीन कर व्यवस्था निर्माण करण्याची तयारी चालू आहे आणि १ एप्रिल २०१७ पासून ती अंमलातही येईल. ती म्हणजे वस्तू व सेवा कर प्रणाली होय.

ज्या वस्तू व सेवा कर प्रणाली बाबत भारतात मोठ्या प्रमाणात विचार मंथन होत आहे ती प्रणाली आज संपूर्ण जगात १४० देशांमध्ये अस्तित्वात आहे. आपल्या शेजारील राष्ट्र पाकिस्तान मध्ये वस्तू व सेवा कर प्रणाली अंमलात आणली जात आहे. प्रायोगिक तत्त्वावर कॅनडाने १९०५ मध्ये जीएसटी आकारण्याचा प्रयत्न केला असला तरी कॅनडात १९९१ नंतर जीएसटी ची सुरवात झाली. मात्र वस्तू व कर प्रणालीचा वापर सर्वप्रथम १९५४ मध्ये जगात फ्रान्स मध्ये झाला. भारतात सुध्दा केळकर समितीने २००३ मध्ये आपल्या अहवालात याबाबत चर्चा केली होती. मात्र २००५ पासून भारतात नवीन कर प्रणाली म्हणून मूल्य वर्धीत कर प्रणाली अस्तित्वात आली होती.

देशभरात कर रचनेत सुसूत्रीकरण आणण्यासाठी १९९४ मध्ये नॅशनल इंन्स्टिट्युट ऑफ पब्लिक फायनन्स अँड पॉलिसीने डॉ. अमरीश बागची यांच्या नेतृत्वाखाली अहवाल सादर केला. त्या आधारावर डॉ. असिमदासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एम्पावर्ड कमिटी ऑफ स्टेट फायनन्स मिनिस्टर ने एक पाऊल उचलले. देशात व्हॅट प्रणाली चालू करण्याचा निर्णय घेतला व १ एप्रिल २००५ पासून देशात विक्री कराच्या जागेवर व्हॅट सुरू करण्यात आला. यात सुध्दा भविष्यात काही त्रूटी दिसून आल्या. राज्य घटनेनुसार राज्यांना कर आकारता येत नसल्याने वर्क्स कॉन्ट्रॅक्ट तसेच भाडेपट्टी करार यांच्यावरील कर आकारणीत अडचणी येवू लागल्या. त्यामुळे डॉ. बागची यांच्या अहवालात सुचविल्याप्रमाणे दुसऱ्या टप्प्याचा विचार करण्यात आला. २००६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात सर्वप्रथम अर्थमंत्र्यांनी राष्ट्रीय स्तरावरील वस्तू व सेवा कर लागू करण्या बाबत उल्लेख केला आणि ६ जुलै २००९ रोजी १ एप्रिल २०१० पासून हा लागू करण्याचे ठरविले. मात्र राज्यसरकारांद्वारे त्याला संमती न मिळाल्याने तो ताटकळत राहिला. तत्पुर्वी केळकर समितीने २००३ मध्ये कर सुधारणांचा भाग म्हणून वस्तू व सेवा कराची (जी.एस.टी.) शिफारस केली होती. तसेच २०१० ते २०१५ या काळासाठी स्थापन झालेल्या १३ व्या वित्त आयोगाच्या अहवालात वस्तू व सेवा कर लागू करण्याची शिफारस करण्यात आली होती.

२०१४ मध्ये सार्वत्रिक निवडणूका होवून नवीन सरकार अस्तित्वात आले त्यांनी जी.एस.टी.

ची गरज लक्षात घेवून ६ मे २०१५ रोजी जी.एस.टी. बील लोकसभेत मांडून ते मंजूर करून घेतले. त्यावर राज्यसभेत सखोल मंथन होवून १९८ पानी हे विधेयक १२२ व्या घटना दुरूस्तीद्वारे ३ ऑगस्ट २०१६ रोजी एकमताने पास झाले. त्यानंतर पुन्हा ८ ऑगस्ट २०१६ रोजी त्यावर मंथन होवून लोकसभेत ते मंजुर झाले व देशात नवीन कर प्रणाली लागू करण्याच्या अनेक अडचणी दूर झाल्यात. घटनेच्या ३६८ कलमानुसार घटना दुरूस्तीला देशातील निम्म्या राज्यांची मंजुरी आवश्यक आहे. त्यानुसार २९ पैकी १५ राज्यांची मंजूरी आवश्यक आहे आणि त्यापैकी २४ जुलै २०१६ पर्यंत आसाम, बिहार, झारखंड, गुजरात, छत्तिसगड, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांत हे जी.एस.टी बील पास झाल्याने १ एप्रिल २०१७ पासून ते संपूर्ण देशात लागू होईल अशी आशा आहे.

### वस्तू व सेवा कर प्रणालीचे स्वरूप:

वस्तू व सेवा कर हा अप्रत्यक्ष करातील एक कर असून अप्रत्यक्ष कर रचनेतील सुधारणांचे लक्षणीय पाऊल मानले जात आहे. सर्व प्रकारच्या करांऐवजी एकच सर्वकष कर लागू करण्याचा उद्देश या मागे आहे. भारतात लागू करण्यात येणाऱ्या या कर प्रणाली मध्ये कर आकारण्याकरिता जी.एस.टी. मंडळ स्थापन करण्यात येणार असून त्याचे अध्यक्ष केंद्रीय अर्थमंत्री असतील व सदस्य अर्थ राज्यमंत्री असतील. तसेच कुठल्याही एका राज्याचे अर्थ राज्यमंत्री हे उपाध्यक्ष असतील व इतर राज्य अर्थमंत्री सभासद असतील. मतदानात केंद्राचा वाटा हा एक तृतीअंश (१/३) व राज्यांचा दोन तृतीअंश (२/३) असेल. म्हणजेच जी.एस.टी. मंडळात १/३ सभासद हे केंद्राचे तर २/३ सभासद हे राज्यांचे असतील. कुठलाही कर आकारतांना तीन चतुर्थांश (३/४) मतांची आवश्यकता असणार. तसेच केंद्र व राज्य यांना कर आकारणीत समांतर अधिकार असतील. जी.एस.टी. संदर्भात केंद्रीय पातळीवर दोन कायदे करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

१) सेंट्रल जी.एस.टी. (सी.जी.एस.टी.)

२) इंटरस्टेट जी.एस.टी. (आय.जी.एस.टी.)

केंद्र सरकार आपला केंद्रीय वस्तू आणि सेवा कर बसवतील आणि तो गोळा करतील आणि राज्य सरकार राज्यातील सर्व व्यवहारावर राज्य वस्तू आणि सेवा कर बसवून तो गोळा करतील. केंद्रीय वस्तू आणि सेवा करांचे कर पत निविष्ट प्रत्येक स्तरावरील उत्पादनाच्या बाबतीत केंद्रीय वस्तू आणि सेवा कराची जबाबदारी मुक्त करण्यासाठी उपलब्ध असेल, तसेच निविष्टेवर प्रदान केलेली राज्य वस्तू व सेवा कराची पत ही उत्पादनावर बसविलेल्या राज्य वस्तू व सेवा कराचे प्रदान करण्यासाठी मुभा असेल. या पध्दतीत पदाचा उलटा वापर अनुज्ञेय नाही.

### करांचा समावेश :

केंद्रीय करांचा जी.एस.टी. मध्ये समावेश :

१.केंद्रीय उत्पादन शुल्क

२.अतिरिक्त उत्पादन शुल्क

३.सेवा कर

४.औषधी व सौदर्यप्रसाधनांवरील उत्पादन शुल्क

५.आयातीवरील विशिष्ट वाढीव शुल्क

६.अतिरिक्त सीमा कर

७.केंद्रीय विक्री कर

८.सीमाशुल्काचे विशेष अतिरिक्त शुल्क

राज्य करांचा जी.एस.टी. मध्ये समावेश :

१.राज्य विक्री कर

२.मनोरंजन कर
३.खरेदी कर
४.लॉटरी कर
५.चैनिच्या वस्तूवरील कर
६.सट्टे बाजारावरील कर
७.वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित राज्य अधिभार व उपकर
८.जकात आणि प्रवेश कर

उपरोक्त कर रद्द होवून त्यांच्या जागेवर वस्तू व सेवा कर लागू करण्यात येणार आहेत.

**वस्तू व सेवा कराचा दर:**

डिसेंबर २०१५ देशाच्या मुख्य आर्थिक सल्लागारांच्या अध्यक्षतेखालील समितीने १७-१८ टक्के असा जीएसटीचा सामान्य दर असेल असे प्रस्तावित केले आहे. सध्या जपानमध्ये हा दर ५ टक्के, सिंगापूर मध्ये ७ टक्के, जर्मनीमध्ये १९ टक्के, फ्रान्स मध्ये १९.६ टक्के , स्वीडन मध्ये २५ टक्के, ऑस्ट्रेलियामध्ये १० टक्के आणि आपल्या शेजारी पाकिस्तान मध्ये जीएसटीचा दर १८ टक्के आहे. वस्तू व सेवांवरील राज्य व केंद्रांचा अनेकस्तरीय भार नाहीसा करून, त्या जागी देशात सर्व एकच सामाईक कर आणि खऱ्या अर्थाने एकसंध राष्ट्रीय बाजारपेठ आकाराला आणण्याचे जीएसटीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मुख्यत: कर आकारणी ही उत्पादन केंद्रीत न राहता, ती ग्राहक केंद्रीत बनणार आहे. त्यामुळे १५ टक्के असलेला सेवा कर, सरासरी १४ टक्के असलेला अबकारी कर आणि १२ टक्के असलेला मूल्यवर्धीत कर याऐवजी नव्या कर प्रणालीत एकच जीएसटी येईल.

सर्वाधिक मागणी असलेल्या आणि जीवनावश्यक वस्तूंसाठी जीएसटीचा दर १२ टक्के, तर ऐषारामी वस्तू, तंबाखूजन्य उत्पादने यासाठी तो कमाल ४० टक्क्यापर्यंतही जावू शकतो. अर्थात अनेक ग्राहकोपयोगी उत्पादने व इलेक्टॉनिक्स वस्तूंवर केंद्र व राज्यांच्या वेगवेगळ्या करांचा एकत्रित भार सध्या किंमतीच्या २४-२५ टक्क्यावर जातो, त्याऐवजी शिफारस केल्याप्रमाणे १२ टक्क्यांचा किंवा १७-१८ टक्यांचा सामान्य दरही ग्राहकांच्या दृष्टीने स्वागतार्हच असेल. सर्वाधिक उपभोगाच्या, पेट्रोलियम उत्पादने, वीज सेवा, कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी जीएसटीच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आले आहेत. मात्र पेट्रोलियम उत्पादने यांचा काही कालावधीने समावेश करण्यात येईल असे सुचविले आहे.

**जीएसटीचे प्रभाव:**

भारतीय अर्थव्यवस्थेत अप्रत्यक्ष करांचे आजमितीचे जंजाळ सुलभ, सुकर बनविणे ही वस्तू व सेवा कराची सगळ्यात महत्त्वाची भूमिका ठरेल. कर रचना जितकी गुंतागुंतीची, कर भरणा जितका किचकट, कर व्यवस्थापन जितके जाचक व भ्रष्ट प्रवृत्तींना वाव देणारे तितकीच कर चुकविण्याची प्रवृत्ती अधिक बळकट हा व्यावहारिक अर्थकारणातील सरळ सोपा नियम आहे.

आज केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अस्तित्वात असलेले अनेक अप्रत्यक्ष कर वस्तू व सेवा करामध्ये समाविष्ट होत असल्याने अप्रत्यक्ष करांची संख्या कमी होईल. त्यामुळे उद्योजक, उत्पादक व व्यापारी यांची डोकेदुखी ठरणारा टॅक्स कम्प्लायन्स सुगम बनेल. देशात वस्तू व सेवा कर प्रणाली अस्तित्वात येण्याने देशात खऱ्या अर्थाने सामाईक बाजारपेठ

अस्तित्वात येईल. संपूर्ण देशाचे रुपांतर सामाईक बाजारपेठेत घडून आल्याने उत्पादकांना व उद्योजकांना ती विशाल बाजारपेठ डोळ्यासमोर ठेवून आपल्या उत्पादन क्षमतेची स्थापना करता येणे शक्य होईल. त्यामुळे उत्पादनाचा स्थिर खर्च मोठ्या मात्रेवरील उत्पादनावर विभागला जावून दर एकक सरासरी उत्पादन खर्चामध्ये कपात करता येणे उद्योजकांना शक्य होईल. त्यामुळे वस्तू व सेवांच्या सरासरी उत्पादन खर्चात बचत घडून येवून तो फायदा स्पर्धात्मक किंमती आकारून ग्राहकांपर्यंत पोहचविण्यास उत्पादकांना व उद्योजकांना प्रेरणा मिळेल. वस्तू व सेवांच्या किंमती स्पर्धात्मक पातळीवर उतरल्याने ग्राहकांचा प्रतिसाद उंचावेल. त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होवून उद्योजकांची आर्थिक उलाढाल वाढणार. याचा एकंदर परिणाम देशाच्या राष्ट्रीय एकूण उत्पादनाच्या वाढीचा सरासरी वार्षिक वेग वाढणार.

सरकारचा महसूल वाढला की, जनसामान्यांच्या कल्याणाची सर्वसाधारण पातळी उंचावण्यास पुरक उपकारक ठरणाऱ्या कल्याणकारी योजना राबविण्यास सरकारकडे पुरेशी वित्तीय सामग्री संचयित होत राहील.

## जीएसटीचे फायदे:

१९४७ नंतर अप्रत्यक्ष करांच्या आकारणीत प्रथमच ग्राहककेंदी दृष्टिकोन जीएसटीच्या माध्यमातून दिसून येत आहे. त्यामुळे ही कर प्रणाली लागू झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक फायदा सामान्य नागरिकांना होणे अपेक्षित आहे. त्यामुळे ह्या जीएसटीचे सार्वत्रिक फायदे पुढीलप्रमाणे.

१. जीएसटी हा एकच कर संपूर्ण भारतभर राहील.
२. अप्रत्यक्ष कर सरल होतील.
३. कर वसुलीचा खर्च कमी होईल.
४. जीएसटी लागू झाल्यानंतर भारताच्या जीडीपीमध्ये २ टक्के वाढ होणे अपेक्षित आहे. तसेच नॅशनल कॉन्सील ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक्स रिसर्च या संस्थेने मांडलेल्या अहवाला नुसार जीएसटी आकारल्यास शासनाच्या महसुलात ०.२ टक्के वाढ अपेक्षित आहे तर भारताच्या जीडीपीमध्ये ०.९ ते १.७ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. जगात जीएसटी लागू झाल्यानंतर न्युझिलंडच्या जीडीपीमध्ये २.४४ टक्के वाढ झाली तर कॅनडाच्या जीडीपीमध्ये ०.८८ टक्के, सिंगापूरच्या जीडीपीमध्ये ७.०२ टक्के आणि ऑस्टेलियाच्या जीडीपीमध्ये २.५८ टक्के वाढ झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
५. जीएसटी लागू झाल्यानंतर संपूर्ण भारतात सर्वच वस्तूंचे दर समान राहतील. याचा ग्राहकांना फायदा होईल, नागरिकांना स्वस्त वस्तू खरेदी करता येतील विशेष म्हणजे एका ठराविक राज्यांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.
६. जीएसटीमुळे कर आणि वाहतूक खर्च कमी झाल्यामुळे तयार वस्तूंच्या किंमती कमी होतील त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढीस चालना मिळेल व महसूलात वाढ होईल.
७. कालांतराने प्रचंड करसंकलन होवू लागेल.
८. भांडवली वस्तूंच्या किंमती १२ ते १४ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता असल्यामुळे भांडवली वस्तूच्या गुंतवणुकीमध्ये ६ टक्के वाढ होणे अपेक्षित आहे.

९. जीएसटी लागू झाल्यामुळे केंद्र व राज्य सरकारांना वस्तू व सेवांवर कर लावण्याचे समांतर अधिकार राहतील.

१०. जीएसटीमुळे उत्पादक कंपन्यांना फायदा होवून देशांतर्गत एकसंघ बाजारपेठ तयार होण्यास मदत होईल.

११. जीएसटीचा छोट्या उद्योगांना फायदा होणार आहे. सध्या व्हॅट प्रणालीमध्ये ज्या उद्योगाची वार्षिक उलाढाल १० लाखाहून अधिक आहे त्या उद्योजकांना करदायित्व येते. जीएसटी मध्ये सदर उलाढालीची मर्यादा २५ लाखापर्यंत वाढण्याची सरकारने तयारी दर्शविली आहे. त्यामुळे छोट्या उद्योजकांना त्याचा फायदा होईल.

१२. राज्यांना पहिली पाच वर्षे केंद्र सरकार महसुलातील तोटा भरून देईल, वस्तू व सेवांवर हा कर लावण्यात येईल. ज्या राज्यात ग्राहक वर्ग मोठा असेल त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल.

१३. किमान दोन वर्षे वस्तूंवर ०.१ % जादा कर आकारणी केली जाईल. जादाचा महसुल ज्या राज्यांत वस्तुनिर्मिती झाली त्यांना मिळेल.

१४. पहिली तीन वर्षे राज्यांना १०० टक्के भरपाई दिली जाणार आहे. चौथ्या वर्षी ७५ % तर पाचव्या वर्षी ५० टक्के भरपाई दिली जाईल.

१५. भारत सरकार मार्फत उद्योग जगतामध्ये क्रांती घडविण्यासाठी मेक इंन इंडिया, स्मार्ट सिटीज आणि स्टार्ट अप इंडिया या सारख्या योजनांना वस्तू व सेवा कर प्रणालीचा अंमल अतिशय पूरक उपकारक ठरणार आहे.

१६. जीएसटी मुळे देशातील कर प्रणालीत पारदर्शकता, शिवाय करपालनास सुलभता निर्माण होणार.

जर सर्वांकर्षाने आणि राजकारणाच्या पलिकडे जावून विचार केला तर वस्तू व सेवा कर प्रणाली भारतासारख्या देशांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. भारताच्या विकासाला नवीन दिशा प्राप्त होवून आर्थिक सुधारणांच्या स्थितीत एका नव्या पर्वाला सुरवात होण्याची आशा आहे. आजवरचा जीएसटी लागू असलेल्या देशांचा अभ्यास केल्यास लक्षात येते की, त्या देशांच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात वाढच झाली आहे आणि काळानुसार कररचनेत आणखी बदल अपेक्षित आहेत.

**संदर्भसूची:**


१. गोविलकर वि.म. (२०१५) : अर्थजिज्ञासा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ६८७ ते ६९१

२. देसले किरण (२०१५) : स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग १, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव, पृ.१६८ ते १७२

३. मालकर यमाजी (एप्रिल, मे, जून, जुलै २०१५) अर्थपूर्ण मासिक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स, पुणे

४. कुलकर्णी सई, दैनिक प्रहार, २३ ऑगस्ट २०१५

५. अभय टिळक, साप्ताहिक विवेक, ६ ऑगस्ट २०१६

६. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, ५ ऑगस्ट २०१६

७. येवलेकर राजेंद्र, दैनिक लोकसत्ता, ७ मे २०१५

8. www.udyogvishwa.com

9. www.wikipedia.com

10. Model GST Law, Empowered Committee of Ctate Fnance Ministers, June 2016

# ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर बचत गटांचा प्रभाव

**श्रीराम दे. जोशी, जळगाव,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मुळजी जेठा महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९४२११००८७७६

**स्नेहल निलेश देशमुख, मुंबई,**
मातोश्री सुमती चि. टिपणीस
महाविद्यालय, नेरळ.
भ्रमणध्वनी : ९२७१४५९६८१

भारतीय अर्थव्यस्था ही ग्रामीण व शहरी भागात विभागली गेली आहे. भारतात शहरी अर्थव्यवस्थेपेक्षा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रभाव अधिक आहे. कारण भारतात ७०% भाग हा ग्रामीण असून ग्रामीण विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या नीतिचा एक अविभाज्य भाग आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक समस्या होत्या. त्यातील ग्रामीण दारिद्र्य ही समस्या अतिशय भीषण दिसून येते. ग्रामीण दारिद्र्यामुळे शिक्षण व आरोग्य इ. ची कमतरता असून कार्यक्षमता कमी राहते. परिणामी प्रभावी मागणी कमी राहते. हाच आर्थिक विकासातील अडथळा आहे. दारिद्र्य निर्मुलनासाठी आजवर अनेक योजना शासनामार्फत राबविल्या गेल्या. समस्यारुपी वृक्षाच्या एक-एक फांद्या तोडण्यापेक्षा मुळावरच घाव घातला पाहिजे, म्हणजेच रोजगार निर्मितीतील किंवा लघुउद्योगांना चालना देणे व दारिद्र्य निर्मूलन करणे असा एक विचारप्रवाह पुढे आला. देशाच्या ग्रामीण भागातील लोकसंख्या ही आर्थिकदृष्ट्या दूर्बल असून या घटकांना त्याच्या गरजेच्या वेळी त्यांच्याच संचित बचतीतून वा वित्तीय संस्थांकडून मोठी रक्कम कर्ज रूपाने प्राप्त करता यावी व हे कर्ज त्यांना जन्म-विवाह-मृत्यू यासारख्या जीवनचक्रातील घटनांसाठी गरजेचे असेल. तसेच उत्पादन संसाधने वा संपत्ती खरेदी करण्यासाठीही असू शकेल. या पार्श्वभूमीवर ग्रामीण जनतेच्या आर्थिकच

नाही तर समग्र विकासाला आकार देण्याचे कार्य सूक्ष्म वित्तव्यवस्थेच्या माध्यमातून सुरू झाले.

उद्दिष्ट्ये: १)स्वयंसहाय्यता समूह चळवळीमुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील होणारे आर्थिक परिणाम अभ्यासणे. २)स्वयंसहायता समूह चळवळीमुळे ठाणे जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेवरील सामाजिक परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्र (ऑगस्ट २०१४ पूर्वीचा ठाणे जिल्हा) निवडला असून त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. प्राथमिक तथ्य मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने नमुना म्हणून निवडलेल्या उत्तर दात्यांकडून संकलित केलेले आहेत. स्वयं सहाय्यता समुहातील लाभार्थी वरील आर्थिक व सामाजिक पाहण्यासाठी नमुना निवडलेला आहे.

**ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था:**

भौगोलिक क्षेत्रफळाबाबत भारताचा जागतिक क्रमवारीत ७ वा क्रमांक लागतो. भारतातील घटक राज्यात महाराष्ट्र राज्याचा तिसरा क्रमांक लागतो. तर महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी ठाणे जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. तसेच भारतातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी काही मोजक्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्ह्यांपैकी ठाणे हा एक कोकण विभागातील उत्तरेकडील जिल्हा आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८१.००% लोकसंख्या साक्षर आहे. त्यापैकी ग्रामीण भागात ६४.७७% तर शहरी भागात ८६.८८% लोकसंख्या साक्षर आहे. संपूर्ण देशाप्रमाणेच ठाणे जिल्ह्यात स्वयंसहाय्यता समूह उदयाला आली आणि विकसित झाली. ग्रामीण भागातही बँकांचा सहभाग वाढीस लागला आणि वैयक्तिक तारण वा कर्जापेक्षा समुहाला तारण वा कर्ज ही संकल्पना पुढे आली. त्यातूनच १ एप्रिल १९९९ पासून स्वर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजना कार्यान्वित झाली. जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने ही चळवळ यशस्वी होण्यास मदत झाली. ग्रामीण भागात महिलांमध्ये नेतृत्व गुण वाढण्यास मदत झाली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ग्रामीण भागात अनेक व्यवसायांची भरभराट झाली. ग्रामीण भागातील कर्जफेडीचे प्रमाण १००% असल्याने बँका ही कर्जे देण्यास खुश आहेत.

आशिया खंडातील बांग्लादेशातील अर्थशास्त्र विषय शिकवणारे व जगप्रसिद्ध ग्रामीण बँकेचे प्रणेते व नोबेल पारितोषिकाचे मानकरी डॉ. मोहम्मद युनूस यांनी प्रथम स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ सुरू केली. यामागील त्यांचा उद्देश हा ग्रामीण जनतेला गरीबी व सावकारी पाशातून सुटका करणे, अर्थकारणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि रोजगार संधी प्राप्त करून देणे हाच होता. भारतात नाबार्डच्या माध्यमातून बचत उभारणीला वेग आलेला असून विविध राज्यातील जिल्हा सहकारी बँका, स्थानिक स्वराज्य संस्था, बिगर सरकारी संस्था (NGO's) यांच्यामार्फत अनेक स्वयंसहाय्यता समुहांची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्यात सुमारे दीड लाख बचत गट यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यापैकी ठाणे जिल्ह्यात सहकारी बँकेचे सुमारे ९५०० तर ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ७,१२५ बचतगट

खासदार सुप्रिया सुळे यांच्या यशस्विनी अभियान अंतर्गत व अनेक राजकीय पक्षांचे, बिगर शासकीय संस्थांच्या बचत गटांचे जाळे ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. जिल्ह्यात या योजनेला सुरूवात झाल्यापासून २०१०-११ पर्यंत १०,६०२ बचत गट स्थापन झालेले आहेत.

ग्रामीण भागात एखादी नवी योजना सुरू करणे यास गावातील व्यक्तींचा विरोध दिसून येतो. तसेच ग्रामीण भागात महिला प्रथम एखाद्या योजनेत सहभागी होण्याची तयारी दर्शवतात, परंतु २-३ वर्षातच सभासदत्व सोडून जाण्याचे प्रमाण अधिक दिसते. परंतु ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याने स्वयंसहाय्यता समूह योजनेला विरोध झालेला नाही. ग्रामीण भागात लाभार्थींना गटात आल्यावर आपले अधिकार, कर्तव्ये, आपल्यासाठी असलेल्या योजना व कायदे याचे ज्ञान प्राप्त झाले आहे. तसेच आपणही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाग घ्यावा अशा विचारसरणीत वाढ होत आहे. सूक्ष्म पुरवठा क्षेत्रात वाढ झाल्याने भविष्यकालीन अनेक योजनांच्या अंमलबजावणीचा मार्ग सुकर झालेला आहे. म्हणून असे म्हणता येईल की, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास हा प्रत्यक्षपणे मोजता येत नसला तरीही सूक्ष्म वित्त योजनेमुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात ९२% विकास झाल्यासारखे वाटते.

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सर्वेक्षण केल्यास असे आढळले की, ७२% स्वयंसहाय्यता महिला गट हे एकाच उपक्रमात सहभागी आहेत तर २८% स्वयंसहाय्यता महिलाबचत गट हे एकापेक्षा जास्त उपक्रमात सहभागी आहेत.

अध्ययनासाठी ग्रामीण भागात सर्वेक्षण केलेल्या गटांपैकी ५४% गटांची मासिक उलाढाल रु. २०००/- पर्यंत आहे. १८% बचत गटांची मासिक उलाढाल रु. २००१/- ते ५०००/- दरम्यान आहे. १४% बचत गटांची मासिक उलाढाल रु. ५००१/- ते १००००/- पर्यंत आहे. १०% बचत गटांची मासिक उलाढाल रु. १०००१/- ते १५०००/- च्या दरम्यान असून ४% बचत गटांचे मासिक उत्पन्न रु. १५००१/- ते २००००/- च्या दरम्यान आहे. तसेच ७०% बचत गट हे कायम उपक्रमात गुंतलेले असुन ३०% बचत गट हे हंगामी स्वरूपाच्या उपक्रमात कार्यशील आहेत.

ग्रामीण भागात दारिद्र्याच्या परिणाम स्वरूप असुरक्षित जीविका आणि मर्यादित पर्याय यामुळे गरीबांसाठी वित्तीय सेवांची गरज असते. या वित्तीय सेवा वैशिष्ट्यपूर्ण असणे गरजेचे असते. रूदरफोर्ड एस. यांनी म्हटल्याप्रमाणे 'अल्प जमा आणि मोठी उचल' (Small Pay-ins and large take outs) ही वित्तीय सेवांची वैशिष्ट्ये असणे आवश्यक आहे. भारतीय ग्रामीण भागात १९९० च्या दशकापूर्वी कपाटातील साडीच्या घडीतील बचत ठाऊक होती. पण बँकेतील बचतीच्या सवयी मात्र अतिशय कमी होत्या. अशा या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्रामीण घटकांना त्यांच्या गरजेच्या वेळी त्यांच्या संचित बचतीतून किंवा वित्तीय संस्थाकडून मोठी रक्कम कर्ज रूपाने प्राप्त करता यावी यासाठी स्वयंसहाय्यता समुहाचा मोठा हातभार लागलेला आहे. स्वयंसहाय्यता समूह चळवळीमुळे कपाटातील साडीच्या बचतीची रक्कम बँकेपर्यंत पोहोचलेली आहे. या त्यांच्या बचत रकमेतून त्यांना रोजगाराचे साधन प्राप्त झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण

भागाचे सर्वेक्षण केल्यास असे स्पष्ट होते की, पाहणी केलेल्या स्वयं सहाय्यता बचत गटातील लाभार्थीपैकी ६८% सदस्यांना बचत गटात येण्यापूर्वी बचत व बँकिंग सवयी होत्या, त्यात ७३.५% सदस्य घरीच बचत करत होते. तर २६.५% सदस्य हे बँकेत बचत करीत होते. उर्वरित ३२% सदस्यांना बचत व बँकिंग सवयी नव्हत्या. विशेष म्हणजे गटात सहभागी झाल्यावर बचतीची सरासरी रक्कम वाढलेली आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची पाहणी केल्यास असे आढळले की, बचत गटातील ९८% सदस्यांच्या रोजगारात वाढ झालेली असून ८०% सदस्यांचा कायम तर १८% सदस्यांचा हंगामी स्वरूपाचा रोजगार वाढलेला आहे. पण २% सदस्यांच्या रोजगारात कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. तसेच रोजगार मिळाल्यामुळे उत्पन्न वाढून खर्च व बचतीचा ताळेबंद ग्रामीण जनतेला जमू लागला आहे. ग्रामीण जीवनात अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य या मूलभूत गरजा भागून सक्षमी करणात वाढ होत आहे आणि लाभार्थीमध्ये आत्मविश्वास, वागण्या-बोलण्यातील सवयीत बदल घडत आहे.

ग्रामीण भागात एखादी नवी योजना सुरू करतांना घरातील व्यक्तींचा किंवा गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिंचा विरोध दिसून येतो, परंतु ठाणे जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने स्वयंसहाय्यता समूह योजना सुरू होऊन यशस्वी देखील होतांना दिसत आहे. आधुनिक काळात ग्रामीण भागात सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत. पण त्याचे तोटेच समोर येतात. स्वयंसहाय्यता समूह हे सध्याचे सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे लोकप्रिय साधन आहे. तसेच स्वयंसहाय्यता समुहात आल्यावर लाभार्थ्यांना आपले अधिकार, कर्तव्ये, आपल्यासाठी असणाऱ्या योजना व त्याचे फायदे याचे ज्ञान प्राप्त झाले आहे. तसेच आपण ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाग घ्यावा अशा विचारांचे प्रमाण वाढत आहे. स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांना बचत गटात सहभागी झाल्यामुळे ८८% सदस्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला असून २८% सदस्यांचा राजकारणात सहभाग वाढलेला आहे तर ९४% सदस्यांना व्यवहारासाठी बाजारात जाण्याची संधी मिळालेली आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांना रोजगार, उत्पन्न वाढ, उत्पन्न वितरण आणि ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण इ. उद्दिष्ट्ये काही प्रमाणात साध्य झालेली दिसतात. ग्रामीण भागातील लाभार्थींना आर्थिक स्वयंपूर्णता आलेली असून १००% महिलांची सामाजिक पत वाढलेली आहे असे दिसून आले.

स्वयं सहाय्यता समुहांच्या सभांचे कामकाज व घेतलेले निर्णय स्वतःला समजत नाही ते इतरांकडून समजावून घ्यावे लागतात याची जाणीव गटातील सदस्यांना झाल्यामुळे त्यांच्या शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे सर्वेक्षण केल्यास असे आढळले की, २% सदस्य प्राथमिक शिक्षण घेतलेले होते, ४८% लाभार्थी माध्यमिक शिक्षण तर २८% सदस्य १० वी उत्तीर्ण होते, तसेच २०% सदस्य १२ वी व केवळ २% सदस्यांनीच पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले होते. या सदस्यांपैकी पुढील शिक्षणाबाबत ६६% स्वतःपेक्षा आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घ्यावे अशी प्रतिक्रिया दर्शविली तर ३०% सदस्यांना आपण स्वतः पुढील शिक्षण

घ्यावे असे वाटते. उर्वरित ४% सदस्यांनी शिक्षण बाबत कोणतीच प्रतिक्रिया दर्शविली नाही.

स्वयंसहाय्यता समुहातील उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध असणे आवश्यक असते. ठाणे जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गट हे जिल्ह्यातील मॉल व बिग बाजार उत्पादनाबाबत संलग्न असल्याने उत्पादन व विपणन प्रक्रियेबाबत गटातील सदस्य समाधानी दिसून आले.

## सारांश:

स्वयंसहाय्यता समुहाची चळवळ ही ठाणे जिल्ह्यातीलच नव्हे तर देशातील ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक स्वयंपूर्णता देत आहे. या अनुषंगाने सामाजिक पत वाढत आहे. कुटुंबात व समाजात वावरतांना समुहातील सदस्यांमध्ये आत्मविश्वास आलेला दिसून आला. समुहात उत्पादित मालाला बाजारपेठ मिळाल्यास गटातील सदस्यांचा उत्साह वाढून ही चळवळ यशस्वी होण्यास मदत होईल. कारण बचत गट हे ग्रामीण भागातील मोठे मार्केटींग नेटवर्क असून त्याचा उपयोग जागतिकीकरणाच्या लाटेत यशस्वी होण्यासाठी करण्यात आला पाहिजे. ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलनाचे जे उद्दिष्ट्य होते ते या चळवळीच्या माध्यमातून साध्य होत आहे. तरीही अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. सूक्ष्म वित्त पुरवठा हे ग्रामीण गरिबांसाठी आणि देशाच्या विकासासाठी महत्वाचे शस्त्र असून त्याद्वारे आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे.

## संदर्भग्रंथ सूची:

१) जहागीरदार मुक्ता, २०११, *अर्थवेद, सुक्ष्मवित्त - अपेक्षा आणि निष्पत्ती*, पृ. १८८

२) महाराष्ट्र वार्षिकी, २००८, युनिक, पुणे

३) स्वर्ण जयंती ग्राम रोजगार योजना, *शासकीय परिपत्रके भाग १ व २*, अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्था, मुंबई

४) *नाबार्ड अहवाल* २०१०-११

५) Swaminathan Madhura, 2007, *The Micro Credit Alternetives ?* EPW, Mar. 31, P9-1172.

६) Sukhbir Singh, 2007, *Towards Inclusive Rural Financial Services, Microfinance in India, Self Employment and Porerty Alleviation*, Himalaya Publishing House Pvt. Ltd., First Edition.

७) Shriram M.S., April 23, 2005, *Cirofinance and the State Exploring Areas and Structures Collaboration*, EPW, P9-1699.

८) सामंत मेधा, २००४, *देश पातळीवर एकात्मिक धोरण हवे, मिळुन साऱ्याजणी*, दिवाळी अंक, पुणे, पृ. १५२.

९) कुलकर्णी बाळकृष्ण, जानेवारी-मार्च २००९, *लघुवित्ताचे तंत्र आणि दारिद्र्य निर्मुलनाचा मंत्र*, समाज प्रबोधन पत्रिका, पृ. ३७

# नाशिक जिल्ह्यातील साखर उद्योगाची रोजगार निर्मिती

**साधना पाटील**, नाशिक,
अर्थशास्त्र विभाग,
के.एस.के. डब्ल्यू कला, विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय, सिडको.
भ्रमणध्वनी : ९६०४५६९१३१

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८%, महाराष्ट्रात ५४.७७% व नाशिक जिल्ह्यात ५७.४७% आहे. शहरी भागात सर्व प्रकारच्या सेवा सुविधांची उपलब्धता असतांना आजही ग्रामीण भाग त्यापासून वंचीत आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी, लोकांची कमी उत्पन्नाची पातळी व राहणीमान पातळी, शेती विकासाचे प्रश्न, पायाभूत सूविधांची कमतरता यांसारखे प्रश्न सोडविण्यासाठी एकटे शेती क्षेत्र पूरेसे नाही तर त्याच्या जोडीला शेतीआधारीत उद्योग, शेती प्रक्रिया उद्योग स्थापन होणे व विकसित होणे आवश्यक आहे. हे उद्योग तुलनेने श्रमप्रधान तंत्राचा वापर करणारे असतात, शेतमालाला योग्य भाव, सातत्यपूर्ण व शाश्वत बाजारपेठ मिळवून देतात व त्याद्वारे शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष दूर करतात.

National Council of Applied Economic Research नूसार, शेती आधारित उद्योग म्हणजे असे उद्योग की जे शेतमालाचा कच्चा माल म्हणून वापर करतात व शेतीसाठी आदाने उत्पादित करतात. शेती आधारित उद्योगांमध्ये शेती प्रक्रीया उद्योग, शेतमालावर औद्योगिक प्रक्रिया करणारे उद्योग, शेती आदाने उत्पादित करणारे उद्योग व शेती सेवा केंद्रे यांचा समावेश होतो.

## नाशिक जिल्ह्यातील साखर उद्योग:

नाशिक जिल्हा साखर उद्योगासंदर्भात अतिशय विकसित आहे. २०११-१२ अखेर जिल्ह्यात पाच सहकारी व तीन खाजगी साखर कारखाने कार्यरत अकाहेत. जिल्ह्यातील १९३१ गावांपैकी १३०६ गावे साखर कारखान्यांच्या ऊस कार्यक्षेत्रात समाविष्ट आहेत, एकूण गावांच्या संख्येशी हे प्रमाण ६७.६३% आहे. १०६४७० शेतकरी सहकारी साखर कारखान्यांचे सभासद आहेत.

तक्ता क्र. १

नाशिक जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योग व प्रत्यक्ष रोजगार

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| ०१ | उद्योगांची संख्या | |
| | अ) एकही नोकर नसलेले स्वयंरोजगार कृषी आधारित उद्योग | ३७३७ |
| | ब) एकापेक्षा अधिक कामगार असलेले कृषी आधारित उद्योग | ८७३ |
| ०२ | वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या | ९११८ |
| ०३ | साखर कारखान्यातील वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या | ४१६६ |
| ०४ | शेकडा प्रमाण (एकूण कर्मचाऱ्यांसोबत साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण %) | ४५.६९ |

*(संदर्भ : नाशिक जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, २०१२)*

जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येसोबत हे प्रमाण २.०९% एवढे आहे. एवढी मोठी लोकसंख्या दुसऱ्या कोणत्याच शेती आधारीत उद्योगासमवेत जोडली गेलेली नाही. परंतु अलिकडील काळात साखर उद्योगासमोर ऊस उपलब्धता व त्यामूळे कमी होणारे कार्यात्मक दिवस वाढता उत्पादनखर्च, घसरणारा लेखा परिक्षण वर्ग, सहकारातील दोष असे प्रश्न निर्माण झालेले असले तरी या उद्योगाने जिल्ह्याच्या आर्थिक विकासात विशेषतः रोजगार निर्मितीत मोठे योगदान दिलेले दिसून येते.

### साखर उद्योगातील रोजगार निर्मिती :

नाशिक जिल्ह्यात विविध प्रकारचा शेतमाल उत्पादित होत असल्याने अनेक प्रकारचे शेती आधारित उद्योग स्थापना झालेले आहेत. या सर्व शेती आधारित उद्योगातून निर्माण झालेला रोजगार पुढील सारणीत दाखवला आहे.

वरील सारणीवरून स्पष्ट होते की जिल्ह्यातील साखर उद्योगामूळे जिल्ह्यातील शेती आधारित उद्योगापैकी ४५.६९% रोजगार संधी निर्माण झालेल्या आहेत. यावरून रोजगार निर्मितीमधील या उद्योगाचे महत्त्व स्पष्ट होते.

### साखर उद्योगातील प्रत्यक्ष रोजगार निर्मिती:

प्रत्यक्ष रोजगार म्हणजे साखर उद्योगाच्या स्थापनेमुळे त्या उद्योगात प्रत्यक्ष काम करण्याची संधी प्राप्त होणे. जिल्ह्यातील साखर उद्योग ग्रामीण भागात स्थापन झालेला असल्याने या उद्योगातील साखर उत्पादन व उपपदार्थांच्या उत्पादनामुळे मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष रोजगार निर्माण झालेला आहे. जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांमधून नियमित व हंगामी या दोन्ही प्रकारचे कामगार कार्यरत आहेत. साखर

तक्ता क्र. २

जिल्ह्यातील साखर उद्योगाद्वारे निर्माण झालेला प्रत्यक्ष रोजगार

| वर्ष | प्रत्यक्ष कारखान्यातील नियमीत | प्रत्यक्ष कारखान्यातील हंगामी | ऊसतोडणी | ऊस वाहतूक कामगार | एकूण कामगार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २००२-०३ | २८७९ | २४५८ | १८८०९ | २८१५ | २६९६१(०.००) |
| २००३-०४ | २८४२ | २४११ | १८२४२ | २७१० | २६२०५(-०.०२) |
| २००४-०५ | २७८७ | २३६० | १६२४३ | २९३२ | २४३२२(-७.१९) |
| २००५-०६ | २७४४ | २३११ | १७९६१ | ३०३५ | २६०५१(+६.००) |
| २००६-०७ | २७१२ | २१७१ | १६०७७ | ३२८२ | २४२४२(-५.९७) |
| २००७-०८ | २५९३ | २२१७ | १६७१५ | २८७७ | २४४०२(+०.६६) |
| २००८-०९ | २५१० | २१०१ | १६८८० | २६५८ | २४१४९(-१.०४) |
| २००९-१० | २४६२ | १९८३ | १६२९९ | २५९४ | २३३३८(-३.३९) |
| २०१०-११ | २४३८ | १८०६ | १५७९४ | २५०९ | २२५४७(-३.३९) |
| २०११-१२ | २४०८ | १७५८ | १६९८५ | २८९१ | २४०४२(+६.६३) |
| सरासरी | २६३८ (१०.७२) | २१५८ (८.७७) | १६९७४ (६९.००) | २८३० (११.५१) | २४५९९ (१००) |

*(संदर्भ : जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल २००१ ते २०१४ व साखर कारखान्यांची कार्यालयीन माहिती)*

कारखान्यांमुळे पुढील चार प्रकारचा प्रत्यक्ष रोजगार निर्माण झालेला आहे.

साखर कारखान्यांमध्ये २००२-०३ मध्ये सर्व प्रकारचा एकूण प्रत्यक्ष रोजगार २६९६१ व्यक्तींना उपलब्ध झालेला होता. ऊस लागवड क्षेत्रामध्ये होणारी घट, वाढता उत्पादन खर्च नियंत्रीत करण्याचे आव्हान, ऊस तोडणी कामगारांची टंचाई, सेवा निवृत्ती नंतर संबंधित कामगारांच्या जागा रिक्त ठेवल्या जात असल्याने प्रत्येक वर्षी एकूण कामगार संख्येत घट होतांना दिसून येत असली तरी प्रत्यक्ष रोजगार निर्मितीमध्ये साखर उद्योगाचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण २०११-१२ मध्ये २४०४२ व्यक्तींना विविध माध्यमातून या उद्योगाने प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. प्रत्येक वर्षी सरासरी नियमित कामगार म्हणून २६३८, हंगामी कामगार म्हणून २१५८, ऊसतोडणी कामगार १६९७४ व ऊस वाहतुकीच्या माध्यमातून २८३० व्यक्ती असा सरासरी प्रतिवर्षी २४५९९ व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झालेला आहे.

**हंगामी कामगार म्हणून रोजगार निर्मिती :**

साखर उद्योगात ऊस गाळप हंगामामध्ये

तक्ता क्र. ३

## जिल्ह्यातील साखर उद्योगातील हंगामी कामगार व एकूण श्रमदिवस

| वर्ष | साखर उद्योगातील हंगामी ऊसतोड व ऊस वाहतूक | | |
|---|---|---|---|
| | हंगामी कामगार | कार्यात्मक दिवस | एकूण श्रम दिवस |
| २००२-०३ | २४०८२ | १४४ | ३४६७८०८ |
| २००३-०४ | २३३६३ | १०७ | २४९९८४१ |
| २००४-०५ | २१५३५ | ५९ | १२७०५६५ |
| २००५-०६ | २३०३७ | ९५ | २१८८५१५ |
| २००६-०७ | २१५३० | १८५ | ३९८३०५० |
| २००७-०८ | २१८०९ | २१० | ४५७९८९० |
| २००८-०९ | २१६३९ | ९१ | १९६९१४९ |
| २००९-१० | २०८७६ | ११९ | २४८४२४४ |
| २०१०-११ | २०१०९ | १६० | ३२१७४४० |
| २०११-१२ | २१६३४ | १८४ | ३९८०६५६ |
| सरासरी | २१९६२ | | २९६५२१६ |

*(संदर्भ : नाशिक जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल व प्राप्त कार्यालयीन माहिती)*

कारखान्यातील हंगामी कामगार, ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक कामगार या प्रकारचे हंगामी रोजगार उपलब्ध होतात व हा रोजगार संबंधीत हंगामाच्या कार्यात्मक दिवसांशी निगडीत असतो. या आधारावर जिल्ह्यातील साखर उद्योगातील हंगामी कामगारांसाठी निर्माण झालेले श्रमदिवस काढण्यात आलेले आहेत.

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, जिल्ह्यातील साखर उद्योगाद्वारे प्रती वर्षी सरासरी २९६५२१६ श्रम दिवसांची निर्मिती झालेली आहे.

### साखर उद्योगामुळे निर्माण झालेला अप्रत्यक्ष रोजगार:

शेती आधारित उद्योगांच्या कार्यामुळे, उद्योगाच्या कार्यस्थळ विकासामुळे इतर व्यवसाय, आस्थापना, उद्योगांना चालना मिळते. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी निर्माण होतात. त्याचप्रमाणे शेती आधारित उद्योगांसाठी आवश्यक शेतमाल उत्पादित करण्याच्या कार्यातून जो रोजगार निर्माण होतो तो अप्रत्यक्ष रोजगाराअंतर्गत येतो. साखर उद्योगासाठी लागणाऱ्या ऊस उत्पादनातून लागवड, मशागत व त्या अनुषंगाने करावी लागणारी इतर शेतीविषयक कामे यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झालेला आहे.

अ) ऊस लागवडीमूळे निर्माण झालेला रोजगार:

ऊस लागवडीमुळे रोजगारात वाढ झाली आहे का? या संदर्भात डॉ.व्ही.व्यंकय्या यांनी आपल्या संशोधनात स्पष्ट केले आहे की, ऊस लागवडीसाठी प्रती हेक्टरी १९० श्रमदिवसांची

तक्ता क्र. ४

नाशिक जिल्ह्यातील ऊस लागवडक्षेत्रामूळे निर्माण झालेला रोजगार

(श्रमदिवसात)

| वर्ष | जिल्ह्यातील ऊस लागवड क्षेत्र (हेक्टर मध्ये) | श्रमदिवस (ऊस लागवड क्षेत्र X ८२.५ श्रमदिवस) | अतिरीक्त रोजगारातील वाढ/ घट |
|---|---|---|---|
| २००२-०३ | २९६१४.५५ | २४४३२०० | ० |
| २००३-०४ | १९८०४.७७ | १६३३८९३ | -८०९३०७ |
| २००४-०५ | १६५७४.७५ | १३६७४१७ | -२६६४७७ |
| २००५-०६ | १७४०२.२६ | १४३५६८६ | +६८२७० |
| २००६-०७ | २६१९९.३६ | २१६१४४७ | +७२५७६१ |
| २००७-०८ | २८९८८.८९ | २३९१५८३ | +२३०१३६ |
| २००८-०९ | २३८४४.७१ | १९६७१८९ | -४२४३९५ |
| २००९-१० | २३८१८.८२ | १९६५०५३ | -२१३६ |
| २०१०-११ | २६७७६.५० | २२०९०६१ | +२४४००९ |
| २०११-१२ | २२६९७.०० | १८७२५०३ | -३३६५५९ |

*(संदर्भ : नाशिक जिल्ह्यातील सरकारी साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल व खाजगी साखर कारखान्यांची कार्यालयीन माहिती)*

आवश्यकता असते. तर व्ही मल्याद्री यांनी त्यांच्या संशोधनातून निष्कर्ष काढला आहे की, प्रती हेक्टरी ऊस लागवडीमुळे तेवढ्याच क्षेत्रावर इतर शेती पिकाच्या मशागतीसाठी जेवढा रोजगार निर्माण होतो त्यापेक्षा जास्तीचा ८२.५ अतिरिक्त श्रमदिवसांचा रोजगार ऊस लागवडीतून निर्माण होतो. याच संशोधनाचा आधार घेऊन नाशिक जिल्ह्यातील ऊस लागवडीमुळे निर्माण झालेला अतिरिक्त रोजगार काढलेला आहे.

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, जिल्ह्यातील साखर उद्योगामुळे २००२-०३ मध्ये २४,४३,२०० श्रम दिवसांची निर्मिती झालेली आहे. २०११-१२ मध्ये एकूण श्रमदिवसांची निर्मिती १८७२५०३ (-२३.३५%) अशी कमी दिवस असली तरी दहा वर्षाच्या संशोधन कालखंडात चार वेळा अतिरिक्त श्रमदिवसांची निर्मिती होऊ शकलेली आहे.

ब) साखर उद्योगाच्या कार्यस्थळ परिसरात स्थापन झालेले व्यवसाय, व्यापार व विविध संस्था व आस्थापनांमुळे निर्माण झालेला अप्रत्यक्ष रोजगार:

जिल्ह्यातील साखर कारखाना कार्यस्थळावर विविध व्यवसाय स्थापन झाल्यामुळे स्वयंरोजगार निर्मिती झालेली आहे. संशोधन कालावधीत विविध प्रकारच्या १९२

व्यवसायांची (किराणा दूकाने, जनरल स्टोअर्स, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची विक्री, छोटे व्यावसायीक वगैरे) स्थापना होऊन त्याद्वारे १९२ व्यक्तींना स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे.

जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या कार्यस्थळावर विविध प्रकारच्या संस्था स्थापन झालेल्या आढळून आल्या, या संस्थांच्या माध्यमातून अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. यात साखर उद्योग संचलित शैक्षणिक संस्था, वाचनालये, दवाखाने, ग्राहक भांडारे त्याचप्रमाणे या उद्योगांच्या बँकखाती असलेल्या बँक शाखा, पतसंस्था इत्यादींची एकूण संख्या ३७ एवढी असून त्यात २३० व्यक्ती काम करतात.

जिल्ह्यातील साखर उद्योगाद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण झालेल्या आहेत. त्याबरोबरच या उद्योगाने जिल्ह्यातील शेती विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केलेले आहेत. ग्रामीण भागात भाग विकासनिधीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या पायाभूत सूविधांची निर्मिती केलेली आहे. या उद्योगामुळे जिल्ह्यातील लोकांना मिळालेली नेतृत्व विकासाची संधी, सामाजिक जबाबदारी अंतर्गत राबविले जाणारे उपक्रम यामुळे जिल्ह्याच्या विकासात या उद्योगाचे योगदान मोठे आहे.

ज्या सहकारी साखर उद्योगाने ग्रामीण महाराष्ट्रास विकासाच्या वाटेवर आणले ती सहकारी कारखानदारी आज डबघाईला जात आहे याची अनेक कारणे आहेत. नाशिक जिल्ह्यातील सहकारी कारखाने देखील याला अपवाद नाहीत. परंतु खर्चाचे योग्य नियोजन व काटकसर केल्यास कारखाने व्यवस्थित सुरू राहू शकतात. संचालक मंडळांनी खाजगी करणाच्या स्पर्धेत उतरण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्याची आवश्यकता आहे. सहकाराकडे बघण्याचा दृष्टीकोन ज्यांनी बदलला, सहकारी संस्थांच्या विकासाची जबाबदारी मनापासून उचलली ते कारखाने आजही टिकून आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वर्तमान पिढी व भावी पिढीला रोजगार व उत्पन्नाचे साधन देऊन विकासाची फळे देण्याची ताकद साखर उद्योगात आहे. सहकारी साखर कारखान्यांचे यात मोठे योगदान आहे.

संदर्भग्रंथ सूची :


१) V. Venkaiah, 1987, *Impact of Agrobased Industries on Rural Economy*, Himalaya Publishing House, Bombay, pp. 97.

२) व्ही. मल्याद्री, १९९५, *Socio Economic Impact of Sugar Co.Op. Factories*, Commerce Pamplate No. 87, Commerence Prakashan, Mumbai pp. 18.

३) *Sugar India*, Year Book 2001 to 2014.

४) साखर डायरी, २००१ ते २०१४.

५) दै. लोकसत्ता, ३ फेब्रू. २०१५ व ४ फेब्रू. २०१५.

# भारतातील गरीब कुटुंबातील बालकांच्या समस्या

जयवंत शंकरराव इंगळे, विटा,
सहयोगी प्राध्यापक व व्यावसायिक अर्थशास्त्र-
विभाग प्रमुख, बळवंत कॉलेज,
भ्रमणध्वनी - ९७६७५२०४८२

## प्रास्ताविक:

देशाच्या एकूण लोकसंख्येत बालकांचे प्रमाण मोठे आहे. सुमारे ३४ टक्के लोकसंख्या ही बालकांची आहे. या शोधनिबंधात बालकांच्या समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. भारतातील गरीब कुटुंबातील बालकांना ज्या समस्यांशी सामना करावा लागतो त्या समस्यांचा विचार या शोधनिबंधात केला आहे. ग्रामीण भागातील आणि लहान मोठ्या शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या बालकांशी संबंधित समस्या या निबंधात मांडल्या आहेत. अपुरे पोषण, बालमजुरी, बालमृत्यू, निरक्षरता, व्यसनाधीनता इत्यादी विविध समस्यांना बालकांना तोंड द्यावे लागते. या समस्या निर्माण होण्याची आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक कारणे सुद्धा या निबंधात स्पष्ट केली आहेत. पालकांचे दारिद्र्य, अंधश्रद्धा, कौटुंबिक ताणतणाव, राज्यांचा मागासलेपणा इत्यादी कारणांमुळे बालकांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांच्या निराकरणासाठी काही उपाय सुद्धा या निबंधात सुचविले आहेत.

भारतात ० ते १४ या वयोगटातील लोकसंख्येस बालकांची लोकसंख्या असे म्हणतात. मात्र संयुक्त राष्ट्रसंघाने १८ वर्षाखालील मुला-मुलींचा समावेश बालकांच्या लोकसंख्येत केला आहे. सन १९९१ च्या जनगणनेनुसार भारतातील ० ते १४ या वयोगटातील बालकांच्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ३८.८० टक्के इतके होते. तर २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ३३.६० टक्के एवढे होते. ० ते १४ या वयोगटातील बालकांना विविध प्रकारच्या समस्या भेडसावत असतात. परंतु सर्वच बालकांना सारख्याच प्रकारच्या समस्या भेडसावतात असे नाही. उदाहरणार्थ भारतातील ग्रामीण भागातील, शहरी भागातील आणि शहरातील व

महानगरातील झोपडपट्टीतील बालकांच्या काही समस्या सारख्या आहेत. तर काही समस्या या वेगळ्या आहेत. गरीब कुटुंबातील बालकांना ज्या समस्या भेडसावतात त्या समस्या सधन कुटुंबातील बालकांना भेडसावत नाहीत. सधन कुटुंबातील बालकांच्या समस्या या काहीशा वेगळ्या आहेत. या लेखात प्रस्तुत अभ्यासकाने प्रामुख्याने भारतातील ग्रामीण भागातील आणि झोपडपट्टीतील गरीब कुटुंबातील बालकांच्या समस्यांवर प्रकाश झोत टाकला आहे.

**१) अपुरे पोषण:**

अपुऱ्या पोषणाची समस्या म्हणजेच कुपोषणाची समस्या होय. ही भारतातील अत्यंत जुनाट अशी समस्या आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्व्हेक्षणानुसार अखिल भारतीय स्तरापेक्षा महाराष्ट्रात ०३ वर्षाखालील ग्रामीण भागातील कुपोषित बालकांचे प्रमाण जास्त आहे. संपूर्ण भारतात तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण २०.३० टक्के आहे. तर महाराष्ट्रात २२.५० टक्के इतके आहे. भारतात मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण ३०.०२ टक्के आहे. तर महाराष्ट्रात मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण ३२.१० टक्के एवढे मोठे आहे. कमी उष्मांकाचा आहार हे कुपोषणाचे प्रमुख कारण आहे. महाराष्ट्रात आहारातून आवश्यकतेपेक्षा कमी उष्मांक मिळणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ५७.४० टक्के कुटुंबांना आणि शहरी भागातील ५४.८० टक्के कुटुंबांना त्यांच्या आहारातून २७०० उष्मांकापेक्षा कमी उष्मांक मिळतात. त्यामुळे कुपोषणाची समस्या उद्भवते. आज संपूर्ण जगात ५० कोटी मुले कुपोषित आहेत. कुपोषित बालकांच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतातील एकूण मुलापैकी ४३ टक्के मुले कुपोषित आहेत. तर ७५ टक्के मुलांमध्ये रक्ताची कमतरता आहे. *सेव्ह द चिल्ड्रन* या धर्मादाय संस्थेने हे सर्वेक्षण भारतात १९ डिसेंबर २०११ ते ९ जानेवारी २०१२ च्या दरम्यान केले होते. त्या सर्वेक्षणातील ही धक्कादायक आकडेवारी असून त्यावरून भारतातील बहुसंख्य बालकांची कुपोषणाची समस्या किती गंभीर स्वरूपाची बनलेली आहे हे आपल्या लक्षात येते. कुपोषणामुळे शरीराची व मेंदूची वाढ व्यवस्थित होत नाही. कुपोषणामुळे बालके चिडचिडी होतात. उदासिन व निरूत्साही बनतात. निरोगी बालकांना जगण्याचा जो आनंद मिळतो तो कुपोषित बालकांना मिळत नाही. कुपोषणामुळे त्यांना शिक्षणातही प्रगती करता येत नाही. या कुपोषित बालकांच्या प्रमुख समस्या आहेत.

**२) बालकामगारांचे वाढते प्रमाण:**

विविध कारणांमुळे भारतात बालकामगारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. गरीब कुटुंबात जन्म हे बालकांच्या बालमजुरीचे प्रमुख कारण आहे. गरीबीमुळे लहान वयातच बालकांना कष्टाची कामे करावी लागतात. भारतात बालमजुरीला कायद्याने बंदी असली तरी या कायद्याचे काटेकोरपणे पालन होत नाही. त्यामुळे आपल्या देशात बालमजुरीची पद्धत अस्तित्वात असल्याचे दिसते. वाढती लोकसंख्या, वाढते दारिद्र्य, बालमजुरी प्रतिबंधक कायद्याच्या कडक अंमलबजावणीचा अभाव इत्यादी विविध कारणांमुळे भारतात बालमजुरांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

१९७१ च्या जनगणनेनुसार भारतातील

बालकामगारांची संख्या १ कोटी ७ लक्ष एवढी होती. ती वाढून २००१ मध्ये १ कोटी २६ लाख एवढी झाली. बालमजुरांची वाढती संख्या ही अत्यंत चिंतेची बाब आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १० ते १४ या वयोगटातील एकूण बालकामगारामध्ये मुलींची संख्या ३,२३,७७३ इतकी आहे. तर ग्रामीण भागात बालकामगार मुलींची संख्या २,९६,९९१ इतकी आहे. लहान वयात बालकांना मोलमजुरीची कामे करावी लागत असल्याने बालपणच हरवून जाते. त्यांना शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे पुढे मजूर म्हणूनच आयुष्यभर हलाखीत जीवन जगावे लागते.

३) बालमृत्यूची समस्या:

भारतातील गरीब कुटुंबातील बालकांशी संबंधित महत्त्वाची समस्या म्हणजे बालमृत्यूची समस्या होय. १९९९ मध्ये विकसित देशात एक वर्षाखालील बालकांचा बालमृत्यू दर प्रतिहजारी ०.६ होता. भारतात तो ७०, पाकिस्तानात ८४ आणि चीनमध्ये ३३ होता. १९७१ च्या तुलनेत १९८१, १९९१ आणि २००१ मध्ये भारतातील बालमृत्यू दरात घट झाली आहे. उदाहरणार्थ १९७१ मध्ये ग्रामीण व नागरी एकत्रित बालमृत्यू दर १२९ होता. २००१ मध्ये तो ६६ पर्यंत खाली आला.

परंतु भारतात नागरी बालमृत्यू दरापेक्षा ग्रामीण बालमृत्यू दर जास्त आहे. २००१ मध्ये भारतातील ग्रामीण बालमृत्यू दर ७२ इतका होता. तर नागरी बालमृत्यू दर ४२ इतका होता. नागरी बालमृत्यू दरापेक्षा ग्रामीण बालमृत्यू दर ३० ने जास्त असल्याचे दिसते. भारतातील बालमृत्यूस अनेक आर्थिक आणि सामाजिक घटक जबाबदार आहेत. त्यामध्ये बालकांच्या खाण्या-पिण्याकडे आणि औषधोपचाराकडे त्यांच्या पालकांकडून होणारे दुर्लक्ष, दारिद्र्य किंवा गरीबी, कुपोषित गरोदर माता इत्यादी प्रमुख घटक आहेत. भारतात बालमृत्यूचा दर अलिकडच्या काळात कमी होत असला तरी विकसित देशांच्या तसेच चीनसारख्या विकसनशील देशाच्या तुलनेत भारतातील बालमृत्यू दर जास्तच आहे.

४) उपासमार:

गरिबीमुळे उद्‌भवणारी उपासमारीची समस्या ही त्या गरीब कुटुंबातील बालकांना भेडसावणारी महत्त्वाची समस्या आहे. आजही भारतातील कित्येक लोकांना भुकेचा प्रश्न भेडसावतो. भारत आणि नायजेरिया या देशात उपासमारीचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. नायजेरियामध्ये नेहमीच उपाशी रहावे लागणाऱ्या १६ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील बालकांचे प्रमाण ७ टक्के इतके आहे. तर कधी कधी उपाशी रहावे लागणाऱ्या बालकांचे प्रमाण २० टक्के इतके आहे.

भारतात नेहमीच उपाशी रहावे लागणाऱ्या बालकांचे प्रमाण ३ टक्के आहे. तर कधी कधी उपाशी रहावे लागणाऱ्या बालकांचे प्रमाण २१ टक्के आहे. पेरू, पाकिस्तान, बांगलादेश इत्यादी देशामध्येही १६ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील बालकांना उपासमार सहन करावी लागते. हे सर्व्हेक्षण 'सेव्ह द चिल्ड्रन' या धर्मादाय संस्थेने केले आहे. या संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार भारतात १६ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील २५ टक्के मुले ही अर्धपोटी आहेत. तर २५ टक्के मुलांना अनेकदा पूर्ण दिवसाचा उपवास घडतो.

५) वेठबिगारीची समस्या:

वेठबिगारीची समस्या ही प्रामुख्याने देशातील आदिवासी बालकांना भेडसावणारी समस्या आहे. कायद्याने वेठबिगारीला बंदी असली तरी निरनिराळ्या स्वरूपात आणि वेगवेगळ्या नावाने उदाहरणार्थ *गव्हारी, लग्नगडी* इत्यादी ही अमानुष प्रथा आजही अस्तित्वात असल्याचे दिसते.

गरीब आदिवासींना मोठ्या शेतकऱ्यांकडून कर्ज काढावे लागते. त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी ते आपल्या दहा-बारा वर्षांच्या मुलांना मोठ्या शेतकऱ्यांकडे विशिष्ट कालावधीसाठी कामास ठेवतात. अशा मुलांना गव्हारी असे म्हणतात. या मुलांना दिवसभर गुरे चारायला घेऊन जाण्याचे व इतर कामे करावी लागतात. या मुलांच्या पालकांनी घेतलेले कर्ज जोपर्यंत फिटत नाही तोपर्यंत ही मुले मोठ्या शेतकऱ्यांच्या ताब्यात असतात. त्या मुलांना केवळ जेवण आणि कपडे दिली जातात. शिक्षण घेऊ दिले जात नाही.

६) निरक्षरतेची समस्या:

वय वर्षे सात पुढील ज्या व्यक्तींना त्यांच्या प्रादेशिक भाषेत लिहिता व वाचता येत नाही त्या व्यक्तींना निरक्षर व्यक्ती असे म्हणतात. ज्याप्रमाणे आपल्या देशात प्रौढ निरक्षरतेची समस्या महत्त्वाची आहे, त्याचप्रमाणे ७ ते १५ या वयोगटातील बालकांच्या निरक्षरतेची समस्या सुद्धा गंभीर स्वरूपाची आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ७ ते १५ वयोगटातील एकूण ९२,४८,७२३ मुलींपैकी ८,५८,०३९ मुली या निरक्षर किंवा अशिक्षित असून निरक्षर मुलींचे एकूण मुलींशी शेकडा प्रमाण ९.२७ इतके आहे. याचा अर्थ १०० मुलींमधील नऊ ते दहा मुली या निरक्षर आहेत. अशा निरक्षर मुलींचा भविष्यातील आर्थिक आणि सामाजिक दर्जा हा खालावलेलाच राहणार यात शंकाच नाही. थोडक्यात बालकांमधील निरक्षरता ही अनेक दृष्टीने महत्त्वाची व गंभीर स्वरूपाची समस्या आहे.

भारतातीलच नव्हे तर जगभरातील सर्वच बालकांना शिक्षण घेण्याचा हक्क किंवा अधिकार आहे. बालकांना शिक्षणापासून वंचित ठेवणे हे बेकायदेशीर आणि समाजविघातक कृत्य आहे. असे असले तरी भारतातील ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्टीतील सहा वर्षांपुढील कोट्यवधी बालके शिक्षणाच्या हक्कापासून वंचित आहेत. युनिसेफने २००५ साली प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भारतातील ३ कोटी ३० लाख मुले कधीच शाळेत जात नाहीत. तर ६ ते १४ या वयोगटातील ७ कोटी २० लाख बालकांनी शाळेचा चेहराही पाहिलेला नाही.

७) शिक्षणासाठी यातायात:

भारतात ग्रामीण आणि आदिवासी भागातील कित्येक शाळा वस्तीपासून किंवा पाड्यापासून दूर अंतरावर आहेत. काही ठिकाणी माध्यमिक शाळा तर वस्तीपासून तीन-चार किलोमीटर एवढ्या अंतरावर आहेत. अशा दूर अंतरावरच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्षातील तिन्ही ऋतूत खूप हाल होतात. चालण्याची पायपीट/त्रास कमी व्हावा यासाठी ही लहान मुले कच्च्या रस्त्याने, दाट झाडीतून जातात. त्यामुळे विंचू चावणे, साप चावणे अशा संकटांना त्यांना तोंड द्यावे लागते. भारतातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील कित्येक बालकांना या समस्यांशी सामना करावा लागतो.

कारण त्यांच्या राहत्या ठिकाणापासून शाळा दूर अंतरावर आहेत.

८) अभ्यासक्रम न पेलणे:

बालकांचे १४ वर्षापर्यंतचे वय हे खेळण्या-बागडण्याचे वय असते. अशा वयाच्या बालकांना अभ्यासक्रम सोपा, सुटसुटीत असला पाहिजे. परंतु तसे आढळत नाही. भारतात ग्रामीण, शहरी, आदिवासी आणि झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी सारखाच अभ्यासक्रम आहे. परंतु गरीब कुटुंबातील बालकांचा आहाराचा दर्जा निकृष्ट असल्याने आणि घरातील आजूबाजूचे व शाळेतील वातावरण चांगले नसल्याने शहरातील किंवा सधन कुटुंबातील बालकांना जो अभ्यासक्रम पेलतो तो ग्रामीण आणि आदिवासी बालकांना पेलत नाही. त्यामुळे ही मुले शिक्षणाच्या आनंदाला पारखी होतात. त्यांच्यात गळतीचे किंवा शाळा अर्ध्यावर सोडण्याचे प्रमाण वाढते.

९) व्यसनाधीनता:

भारतात ग्रामीण भागात आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या बालकांपैकी अनेक बालके तंबाखू सारख्या विविध व्यसनांच्या आहारी गेलेले असून देशात व्यसनाधीन बालकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागापेक्षा झोपडपट्टीतील बालकांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण खूप जास्त आहे. बालकांच्या व्यसनाधिनतेस विविध घटक जबाबदार आहेत. उदाहरणार्थ आई-वडीलच व्यसनाधिन असणे, निरक्षर पालक, अवतीभोवतीचे वाईट वातावरण, चांगल्या संस्कारांचा अभाव, वाईट मुलांची संगत, शिक्षकांचे दुर्लक्ष, मुलांसमोर शिक्षकांनी तंबाखू खाणे, समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा मुलांवर धाक नसणे, मुलांचे व्यसनांच्या दुष्परिणामाविषयीचे अज्ञान इत्यादी विविध कारणांमुळे ग्रामीण आणि झोपडपट्टीतील बालकांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत आहे.

१०) बालगुन्हेगारी:

भारतातील बालकांशी संबंधित आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे बालगुन्हेगारांचे दिवसेंदिवस वाढत जाणारे प्रमाण होय. आपल्या देशात लहान-मोठ्या शहरातील झोपडपट्ट्यांत बालगुन्हेगारांचे प्रमाण जास्त आहे. घरची गरीबी, पालकांची फूस, वाईट संगत, गुंड व्यक्तींचा दबाव इत्यादी विविध कारणांमुळे बालगुन्हेगार तयार होतात. त्याचे वाईट परिणाम संबंधित बालकांच्या आयुष्यावर होतात. एकूण बालगुन्हेगारांपैकी काही बालके सुधारतात. तर काही बालके पुढे मोठेपणी चोर, दरोडेखोर बनतात.

बालगुन्हेगारीची समस्या ही प्रामुख्याने झोपडपट्टीतील बालकांशी संबंधित आहे. झोपडपट्टीतील दादा किंवा गुंड लोक झोपडपट्टीतील लहान मुलांच्या मार्फत गुन्हेगारी कारवाया करताना दिसतात. अफू, चरस, गांजा, गावठी किंवा विदेशी शस्त्रे इत्यादींची वाहतूक त्यांच्या मार्फत करतात. अशा प्रकारच्या गुन्ह्यात अनेक निरपराध बालके सापडली असून त्यामुळे त्यांचे भविष्यच काळवंडून गेले आहे. झोपडपट्टीतील बालकांचा गुन्हेगारी कृत्यासाठी वाढता वापर ही चिंतेची बाब बनली आहे.

११) न्यूनगंड आणि भयगंड:

न्यूनगंड आणि भयगंड या प्रामुख्याने शालेय विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या समस्या आहेत. शालेय शिक्षण घेत असलेल्या दहा वर्षावरील कित्येक बालकांना न्यूनगंडाने आणि भयगंडाने ग्रासलेले दिसते. परीक्षेत, खेळात

इतरांपेक्षा कमी प्राविण्य मिळविलेल्या बालकांमध्ये आपल्यात काहीतरी कमी आहे त्यामुळे आपण पुढे काही प्रगती करू शकणार नाही असे अनेकांना वाटते. अशा न्यूनगंडाने आणि भयगंडाने पछाडलेल्या बालकांचे वेळीच समुपदेशन झाले नाही तर त्यांची खूप मोठी मानसिक हानी होते.

१२) अपंगत्वाची समस्या:

लोकसंख्येतील एकूण बालकांपैकी काही बालकांना भेडसावणारी गंभीर समस्या म्हणजे अपंगत्वाची किंवा विकलांगपणाची समस्या होय. अंध, मूकबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद किंवा मानसिकदृष्ट्या अपंग असणाऱ्या व्यक्तींची संख्या भारतात सुमारे सात कोटी तर महाराष्ट्रात सुमारे १६ लाख इतकी आहे. यामध्ये बालकांची संख्या लक्षणीय आहे. अपंग असणाऱ्या कित्येक बालकांना इच्छा असूनही शिक्षण घेता येत नाही. कित्येक शाळांमध्ये अपंग बालकांना वर्गात येण्यासाठी लागणारी वाटेची सोयही नाही. पायऱ्या चढून त्यांना वर्गात जाता येत नाही. त्यामुळे शारीरिक अपंगत्व असणाऱ्या बालकांमध्ये शाळेत न जाणाऱ्यांचे व शाळा अर्ध्यावर सोडणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे.

१३) वाढती भिक्षावृत्ती:

भीक मागण्यास कायद्याने बंदी असली तरी हा बेकायदेशीर व्यवसाय भारतात चांगलाच फोफावला आहे. या व्यवसायात देशात दररोज लाखो रूपयांची उलाढाल होते. मोठ्या व्यक्तीपेक्षा लहान मुला-मुलींना लोक सहानभूतीने पैशाची भीक घालतात. म्हणून भीक मागण्याच्या व्यवसायात प्रस्थापित झालेले गुंड प्रवृत्तीचे लोक वेगवेगळ्या ठिकाणाहून लहान मुलांना पळवून आणतात. तसेच घरातून मोठ्या शहरात पळून आलेल्या बालकांना फसवून या व्यवसायात ओढले जाते. त्यांच्या लहान लहान टोळ्या करून त्यांना शहराच्या विविध भागात भीक मागायला पाठवले जाते. अशा मुला-मुलींचे भीक मागून घेणारे लोक शारीरिक शोषण करतात तसेच मानसिक शोषणदेखिल करतात. त्यांना खायलाही पोटभर देत नाहीत. लोकांनी भीक घालावी म्हणून त्यांना जखमा करतात तसेच अर्धपोटी ठेवून अशक्त किंवा कृश करतात. भीक मागणारी बहुतेक मुले पुढे भिकारीच बनतात किंवा गुन्हेगारी जगताकडे वळतात. दिवसेंदिवस भीक मागणाऱ्या मुलांच्या संख्येत होत असलेली वाढ ही अत्यंत चिंताजनक बाब बनली असून ही माणुसकीला काळीमा फासणारीच बाब आहे.

१४) रोगग्रस्त बालकांचे वाढते प्रमाण:

अपुरे पोषण, आहाराचा निकृष्ट दर्जा, औषधोपचारासाठी पैसे नसणे इत्यादी विविध कारणांमुळे भारतात ग्रामीण भागात आणि झोपडपट्टीत रोगग्रस्त बालकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हगवण, ढाळ-वांती, मलेरिया, थंडी-ताप, न्यूमोनिया, कांजण्या इत्यादी विविध आजारांमुळे भारतातील जवळजवळ २० लाख बालके दरवर्षी मृत्यू पावतात.

१५) बालकांप्रती शिक्षकांची पक्षपाती वागणूक:

भारतातील अनेक शाळात बहुसंख्य शिक्षक बालकाची जात, बालकांच्या पालकांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय दर्जा पाहून बालकांना वागणूक देताना दिसतात. चांगल्या आर्थिक स्थितीतील कुटुंबातील बालकांना चांगली वागणूक दिली जाते. तर गरीब किंवा मजूर

कुटुंबातील बालकांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांना हिडीस-फिडीस केले जाते. त्यामुळे अशा बालकांच्या मनात शिक्षणाविषयी अनास्था निर्माण होते. ज्या मुलांकडे शिक्षकांचे दुर्लक्ष होते त्यांच्या कोवळ्या मनावर याचा खूपच खोलवर आणि वाईट परिणाम होतो. एकाच शाळेत शिकणारी गरीब आणि सधन कुटुंबातील बालके त्यामुळे एकमेकांचा द्वेष करू लागतात. त्यामुळे शैक्षणिक वातावरण दूषित होते. अशा प्रकारे काही शिक्षकांकडून गरीब कुटुंबातील बालकांना पक्षपातीपणाची वागणूक दिली जात असल्याचा आरोप केला जातो. अशा बालकांना शाळेत जावेसेच वाटत नाही.

**१६) मारहाण, खून, विनयभंग, बलात्कार:**

भारतात अलिकडच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात आणि एकूणच समाजात विकृत प्रवृत्ती खूपच बळावत चालल्या आहेत. त्याचे दुष्परिणाम मात्र निरपराध आणि कोवळ्या मनाच्या बालकांना भोगावे लागत आहेत. उदाहरणार्थ काही शाळातील शिक्षक विद्यार्थ्यांना अकारण मारझोड करतात. हात, पाय मोडेपर्यंत गुरासारखे मारतात. शिक्षकांच्या मारहाणीमुळे काही मुलांचे डोळे कायमचे गेल्याचे व इतर अवयव कायमचे अपंग झाल्याचे आपण वाचतो. विद्यार्थीनींचा विनयभंग करणे, बलात्कार करणे अशा घटना देशाच्या कानाकोपऱ्यात सर्रास घडताना दिसत आहेत. चार, सहा, बारा वर्षांच्या कोवळ्या मुलींवर बलात्कार करण्याचे आणि त्यांना अमानुष मारहाण करण्याचे व त्यांचा खून करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. भारतातील कित्येक पालकांना आपले मूल शाळेतून सुखरूप परत येईल की नाही याचीच धास्ती वाटत असते.

**१७) घरगुती छळ:**

काही कुटुंबातील बालकांचा त्यांच्या घरातील नातेवाईकांकडून शारीरिक आणि मानसिक छळ होतो. आई, वडिलांव्यतिरिक्त इतर जवळचे आणि लांबचे नातेवाईक बालकांच्या दुर्बलतेचा आणि निरागसपणाचा गैरफायदा घेतात. अर्थात घरातून होणारा छळ वाट्यास येणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी असले तरी अशा बालकांना भोगाव्या लागणाऱ्या नरकयातना पाहून मन सुन्न होऊन जाते. अलिकडे घरगुती छळग्रस्त बालकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

**१८) व्यक्तिमत्त्व विकासाची समस्या:**

भारतातील बहुसंख्य बालकांची आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे व्यक्तिमत्त्व विकासाची समस्या होय. ग्रामीण भागातील आणि झोपडपट्टीतील बालके ज्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत शिकतात त्या शाळांची गुणवत्ता फारशी चांगली नसल्याने अशा शाळांत शिकणाऱ्या बालकांचा व्यक्तिमत्त्व विकास फारसा होत नाही. त्यामुळे इतर मुलांच्या तुलनेत ही मुले मागेच राहतात.

**१९) अस्वच्छतेची समस्या:**

अस्वच्छतेची समस्या ही प्रामुख्याने झोपडपट्टीतील बालकांशी संबंधित समस्या आहे. झोपडपट्टीतील अनेक बालके दोन-दोन, तीन-तीन दिवस अंघोळ करत नाहीत. मुलांच्या अंगावरची कपडेही कित्येक दिवस धुतलेली नसतात. ही समस्या बऱ्याच वेळा पाणी टंचाईमुळे निर्माण होते. त्यामुळे त्यांना खरजेसारखे काही त्वचारोग सतत जडलेले असतात.

**२०) सुरक्षिततेची समस्या:**

भारतात बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. भारतात कित्येक ठिकाणी मुले पळवणाऱ्या टोळ्या कार्यरत असून या टोळ्या मुलांना पळवून त्यांचे अवयव काढून घेतात किंवा त्यांची विक्री करतात. मुले आणि स्त्रियांची खरेदी-विक्री या व्यवहारात जगात दरवर्षी अब्जावधी रूपयांची उलाढाल होते. यावरून बालकांच्या सुरक्षिततेची समस्या किती गंभीर बनली आहे याची कल्पना येते. भारतात दरवर्षी हजारो चिमुकली, निरागस बालके गायब होतात. त्यातील कित्येक बालकांचा शेवटपर्यंत पत्ताच लागत नाही.

**२१) मनोरंजन, खेळ व इतर साधनांची कमतरता:**

भारतातील कित्येक शाळांमध्ये मुलांना खेळण्या-बागडण्यासाठी पुरेशी मैदाने नाहीत. शाळेतील सर्व बालकांना पुरेल एवढे खेळाचे साहित्य नाही. गोष्टीची पुस्तके तसेच इतर करमणुकीची साधनेही पुरेशा प्रमाणात नाहीत. त्यामुळे बालकांचा सर्वांगिण विकास होऊ शकत नाही. काही शहरात नगरपालिकांनी व महानगरपालिकांनी बागा आणि नाट्यगृहे उभारली आहेत. परंतु गरीब कुटुंबातील बालकांना त्याचा लाभ घेता येत नाही. कारण काही ठिकाणी बागेत प्रवेश करण्यासाठी शुल्क भरावे लागते. गरीब बालकांना ते शक्य नसल्याने त्यांना क्रीडांगणे व उद्याने यांचा लाभ घेता येत नाही.

**बालकांच्या समस्या निर्माण होण्यास कारणीभूत घटक:**

भारतात एकूण लोकसंख्येत बालकांची संख्या खूप मोठी आहे. मोठ्या संख्येने असणाऱ्या या बालकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असून काही समस्या या जुनाट आहेत तर काही समस्या नव्याने निर्माण झाल्या आहेत. काही समस्या विशिष्ट आर्थिक, सामाजिक परिस्थितीतील बालकांपुरत्याच मर्यादित आहेत. तर काही समस्या सर्व परिस्थितीतील बालकांना जाणवणाऱ्या आहेत. या समस्या निर्माण होण्यास आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसशास्त्रीय घटक कारणीभूत आहेत. या समस्यांच्या कारणांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) पालकांची व्यसनाधीनता:**

भारतातील ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्टीतील बहुसंख्य व्यक्तींना दारू व तंबाखूचे व्यसन आहे. झोपडपट्टीतील काही स्त्रियासुद्धा दारू पितात. पालकांच्या या व्यसनाधिनतेचा मानसिक परिणाम त्यांच्या मुलाबाळांवर होतो. व्यसनाधीन पालक मुलांच्या आहाराकडे, शिक्षणाकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे व्यसनाधीन पालकांच्या कुटुंबातील मुले कुपोषित आणि विविध आजारांनी सतत ग्रस्त असलेली दिसतात.

**२) पालकांमधील अंधश्रद्धा:**

भारतात आजही विविध जाती-जमातीतील लोकांवर विविध अंधश्रद्धांचा पगडा आहे. परंतु त्यामुळे अंधश्रद्धाळू कुटुंबातील बालकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. पालकांच्या अंधश्रद्धाळूपणामुळे त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळत नाही. मुलांचे आरोग्यही चांगले राहत नाही. उदाहरणार्थ अंधश्रद्धाळू पालक आजारी मुलांना दवाखान्यात न नेता करणीच्या संशयाने मांत्रिकाकडे नेतात. त्यामुळे आजारी बालके अधिक आजारी पडतात. त्यातील काही

मरतात सुद्धा.

### ३) पालकांचे दारिद्र्य:

पालकांचे दारिद्र्य हा घटक सुद्धा बालकांच्या समस्या निर्माण होण्यास कारणीभूत असलेला महत्त्वाचा घटक आहे. भारतात आज सुमारे २५ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील आहे. ग्रामीण आणि शहरी भागापेक्षा आदिवासी समाजात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. दरिद्री लोक परिस्थितीने गांजलेले, पिचलेले असतात. त्यामुळे त्यांच्याकडून मुलांना चांगली वागणूक मिळत नाही. दरिद्री लोक मुलांना शिक्षण देण्यास फारसे उत्सुक नसतात. अशा प्रकारे पालकांच्या दारिद्र्यामुळे सुद्धा बालकांना समस्यांना तोंड द्यावे लागते.

### ४) अशिक्षित व कमी शिक्षित पालक:

भारतात आजही अशिक्षित आणि कमी शिक्षण झालेल्या पालकांचे प्रमाण खूप मोठे आहे. भारतात सुमारे २५ टक्के लोक अशिक्षित व २५ टक्के अल्प शिक्षित आहेत. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व फारसे ठाऊक नाही. अशिक्षितपणामुळे त्यांचे मुलांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे, संगोपनाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे अशिक्षित कुटुंबातील बालकांना अनेक समस्या भेडसावतात.

### ५) पालकांचे अनैतिक वर्तन:

पालकांच्या चारित्र्याचा सुद्धा बालकांच्या मनावर परिणाम होत असतो. आई किंवा वडील अथवा दोघांचेही वर्तन अनैतिक असेल तर अशा कुटुंबातील बालकांच्या कोवळ्या मनावर खूपच मोठा आघात होतो. अशा कुटुंबातील मुलांवर चांगले संस्कार झालेले नसतात, त्यामुळे ती बिघडतात.

### ६) पालकांचे असाध्य आजार:

बालकांच्या काही समस्यांचे आणखी एक कारण म्हणजे त्यांच्या पालकांना असणारे एड्स सारखे असाध्य आजार होय. भारतात ५० लाख तर महाराष्ट्रात सुमारे ५ लाख एड्सग्रस्त आहेत. या एड्सग्रस्त कुटुंबातील बालकांना समाजात, शाळेत चांगली वागणूक मिळत नाही. तसेच पालकांना झालेल्या एड्समुळे एड्स झालेल्या बालकांचे प्रमाण भारतात खूप मोठे असून त्यामुळे या बालकांचे बालपणच हरवून गेले आहे.

### ७) कच्ची व कोंदट घरे:

भारतातील ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्टीतील गरीबांची घरे ही कच्ची आणि कोंदट आहेत. बहुतेक घरे ही एक ते दोन खोल्यांची, मातीची, गवताने साकारलेली, कौलारू अथवा पत्र्याची आहेत. बहुतेक घरात दिवसासुद्धा पुरेसा प्रकाश किंवा उजेड येत नाही. गरीबांची घरे ही गुरांनी, कोंबड्या व कुत्र्यांनी राहण्याच्या लायकीची असतात. अशा घरात जन्मलेल्या बालकांना अनेक समस्यांशी सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांची खेळात आणि शिक्षणात प्रगती होत नाही. तसेच त्यांचे अभ्यासातदेखील लक्ष लागत नाही. कच्च्या किंवा कोंदट घरात राहणाऱ्या बालकांची मानसिक किंवा बौद्धिक वाढ चांगली होत नाही.

### ८) रोजचे कौटुंबिक ताणतणाव:

झोपडपट्टीत राहणाऱ्या कित्येक कुटुंबात रोजची भांडणे आढळून येतात. आई-वडिलांची भांडणे, त्यांच्यात चांगला संवाद नसणे या बाबींचा सुद्धा मुलांच्या बालमनावर फार मोठा परिणाम होत असतो. पालकांच्या रोजच्या भांडणामुळे काही

मुले घरातून पळून जातात, काही चिंताग्रस्तपणे वागतात, काही आत्महत्या करतात तर काहींची मानसिक वाढ खुरटते.

९) आजुबाजूचे वाईट वातावरण :

ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्टीतील बालकांच्या समस्यांचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे ही बालके ज्या वाडी-वस्तीवर किंवा परिसरात राहतात, त्यापैकी अनेक ठिकाणी दारूचे गुत्ते, जुगाराचे अड्डे असतात. तसेच गुंड लोकांची दादागिरी आणि इतर अनेक अनैतिक, बेकायदेशीर बाबी चालत असतात. अशा वाईट गोष्टींचा बालकांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. त्यामुळे नैसर्गिकपणे ही बालके लहानपणीच गुन्हेगारीकडे वळतात.

१०) झटपट पैसे मिळवण्याची प्रवृत्ती:

कोणतेही कष्ट न करता झटपट पैसे मिळवण्याच्या प्रवृत्तीत समाजात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. असे लोक खंडणीसाठी मुलांना ओलीस ठेवणे किंवा खंडणी मिळाली नाही तर खून करणे असे प्रकार करतात. अशा प्रकारे झटपट पैसे मिळवण्याच्या प्रवृत्तीत वाढ होत चालल्याने सुद्धा येथील बालकांना काही समस्यांना तोंड द्यावे लागते.

११) नैसर्गिक आपत्ती:

बालकांच्या समस्यांना केवळ मानवनिर्मित घटक कारणीभूत नसून नैसर्गिक घटक सुद्धा कारणीभूत आहेत. भूकंप, पूर, अतिवृष्टी, कोरडा दुष्काळ, चक्रीवादळ, सुनामी इत्यादी सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात लहान मुलांचे खूप हाल होतात. नैसर्गिक आपत्तीमुळे कित्येक मुले जखमी, अपंग होतात. तर कित्येक मुलांचा मृत्यू देखील ओढवतो. म्हणून नैसर्गिक आपत्ती हा घटक सुद्धा बालकांच्या समस्यांना कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक आहे.

१२) पालकांची फूस:

झोपडपट्टीत राहणारे काही लोकच आपल्या मुलांना चोऱ्या करावयास तसेच इतर गुन्हे करावयास लावतात. पैसे मिळवणे हा त्या मागचा उद्देश असला तरी त्यामुळे झोपडपट्टीतील कित्येक मुले बालपणीच गुन्हेगारीच्या विश्वात ओढली जातात. त्यामुळे त्यांचे जीवनच अंधःकारमय होऊन जाते.

१३) ढासळत चाललेली नीतिमत्ता:

समाजाची किंवा लोकांची ढासळत चाललेली नीतिमत्ता हा घटक सुद्धा बालकांच्या समस्यांना कारणीभूत ठरणारा महत्त्वाचा घटक आहे. बाप, चुलता, पुतण्या इत्यादी अत्यंत जवळच्या नातलगांकडून बालकांचे लैंगिक शोषण होत असलेले आपण नेहमी ऐकतो आणि वाचतो. त्याचे अत्यंत दूरगामी भयंकर परिणाम बालकांच्या कोवळ्या मनावर होत असतात.

१४) पालकांमधील जबाबदारीचा अभाव:

ग्रामीण, आणि आणि झोपडपट्टीतील बहुसंख्य पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयी, आरोग्याविषयी जागरूक नाहीत. कित्येक पालकांना आपली मुले शाळेत जातात की नाही हेच ठाऊक नाही. तर काही पालकांना आपली मुले शाळेत नियमितपणे जातात काय याविषयी माहिती करून घेणे गरजेचे वाटत नाही. काही पालकांना आपली मुले कोणत्या इयत्तेत व कोणत्या शाळेत शिकतात हेच ठाऊक नाही. आपल्या मुलांना कोणाची संगत आहे, कोणती व्यसने आहेत याचीही माहिती कित्येक पालकांना नसते. त्यामुळे गळती, गुन्हेगारी, व्यसनाधीनता

इत्यादी समस्या निर्माण होतात.

१५) जातीय, धार्मिक, वांशिक दंगे:

जातीय, धार्मिक दंगलीमुळे सुद्धा शहरातील झोपडपट्टीतील बालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. भारतात अधून-मधून कोठे ना कोठे जातीय व धार्मिक दंगे होत असतात. त्याचे सर्वात जास्त चटके गरिबांना आणि बालकांनाच बसतात. कारण गरीबांची घरे असुरक्षित आणि कच्ची असतात. दंगलीमुळे रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचे खूपच हाल होतात. कधी कधी मोठ्या शहरातील दंगलीचे लोण ग्रामीण भागात पसरते. त्यामुळे ग्रामीण भागातील बालकांचे हाल होतात.

१६) राज्यांचा मागासलेपणा:

बिहारसारख्या मागासलेल्या राज्यातून महाराष्ट्र, गुजरात सारख्या प्रगत राज्यात दररोज पोटापाण्यासाठी माणसांचे लोंढेच्या लोंढे येत असतात. अशा प्रकारच्या स्थलांतरामुळे बालकांचे खूपच हाल होतात. भाषेच्या प्रश्नामुळे त्यांना शिक्षण घेता येत नाही. तसेच आपल्या भागाकडे येताना पालक त्या मुलाची शैक्षणिक कागदपत्रे सोबत आणत नाही म्हणून प्रवेश घेताना अडचणी उद्भवतील या धाकाने अनेक पालक मुलांच्या शाळा प्रवेशाबाबत कंटाळा करतात. पालक कामात असल्याने त्यांचे मुला-बाळांकडे लक्ष राहत नाही. त्यामुळे परप्रांतातून आलेल्या बालकांनाही काही समस्यांना तोंड द्यावे लागते. परप्रांतातून आलेले हे लोक प्रामुख्याने ग्रामीण भागात किंवा झोपडपट्टीत वास्तव्य करतात.

१७) लोकांची बघ्याची वृत्ती:

बालकांचे शोषण होत असताना किंवा अपहरण होत असताना गुंडांच्या भीतीपोटी व इतर कारणांमुळे बरेच लोक बालकांच्या मदतीला धावून जात नाहीत. त्यामुळे बालकांचे शोषण करणाऱ्या प्रवृत्तींना चेव चढतो. त्यामुळे बालकांशी संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत जाते.

१८) इतर कारणे:

बालकांच्या समस्यांना वरील कारणांबरोबरच इतरही कारणे जबाबदार आहेत. उदाहरणार्थ बालकांशी संबंधित गुन्हे करणाऱ्यांना पोलीस यंत्रणेचा धाक नसणे, वाढत्या स्त्री-भ्रूण हत्या, चांगल्या संस्कारांची वाणवा, बालहक्क कायद्यांची अंमलबजावणी प्रभावी करण्यात येणारे अपयश इत्यादी विविध घटक सुद्धा बालकांच्या समस्यांना कारणीभूत आहेत.

## बालकांच्या समस्यांच्या निराकरणासाठी उपाय:

भारतातील गरीब कुटुंबातील बालकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे आपण वर पाहिले. बालकांच्या या समस्या अत्यंत गंभीर असून या समस्यांमुळे बालकांचे बालपण करपून जाते. त्यांचे मानसिक खच्चीकरण होते. त्यांची शारीरिक, बौद्धिक, मानसिक वाढ निकोप होत नाही.

आजची बालके ही त्यांच्या कुटुंबाची, समाजाची आणि देशाची उद्याची आधारस्तंभ आहेत. यांच्यावरच उद्याच्या देशाचा विकास अवलंबून आहे. तसेच देशाच्या लोकसंख्येत बालकांचे प्रमाण ३० टक्के एवढे आहे आणि त्यामध्ये ग्रामीण व झोपडपट्टीत राहणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. म्हणून बालकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या उज्ज्वल भवितव्याकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. म्हणून बालकांची निरोगी आणि चांगली वाढ होणे

आवश्यक आहे. त्यासाठी बालकांच्या समस्यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. बालकांच्या समस्यांच्या निराकरणासाठी आणि समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही उपाय खालीलप्रमाणे सुचविले आहेत.

१) झोपडपट्टी निर्मूलन:

लहानमोठ्या शहरातील झोपडपट्ट्यातील बालकांना नरकयातना भोगाव्या लागत असतात. म्हणून झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करून तेथील प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र हवेशीर घर बांधून द्यावे. तसेच देशात कोठेही नव्या झोपड्या उभारण्यास परवानगी देण्यात येऊ नये. देशातील सर्व झोपड्यांचे निर्मूलन झाले आणि नव्या झोपड्या उभारणीस बंदी घातली तरच बालमजुरीचे, बालगुन्हेगारीचे, बालकांमधील व्यसनाधीनतेचे, रोगराईचे प्रमाण कमी होणार आहे.

२) दारूबंदी:

सरकारने गुटखा उत्पादनास आणि खाण्यास जशी बंदी घातली तशी दारू पिण्यास आणि तयार करण्यास सुद्धा बंदी घातली पाहिजे. दारूचा एक थेंबही देशात तयार होता कामा नये. दारूबंदीशिवाय बालकांना आनंदी आणि सुखी जीवन जगता येणार नाही. कारण भारतातील ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्टीतील कोट्यावधी लोक दारू पितात. याचा परिणाम त्या परिवारातील आर्थिक-सामाजिक स्थितीवर होत असतो. यातील कित्येक दारूडे रोज दारू पिऊन बायको-मुलांना मारझोड करत असतात.

दारूबंदी केल्याशिवाय दारूड्या पालकांकडून निष्पाप बालकांचा जो छळ होतो तो छळ थांबणार नाही. म्हणून सरकारने दारूपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार न करता गुटखा बंदीप्रमाणे दारूबंदी सुद्धा देशात करावी. तसेच सरकारने भारतात तंबाखूच्या शेतीला सुद्धा बंदी घालावी. त्याशिवाय पालकांमधील, बालकांमधील व्यसनाधीनता नष्ट होणार नाही.

३) बालकल्याणावरील खर्चात वाढ आवश्यक:

सरकार दरवर्षी महिला आणि बालकल्याणासाठी खर्च करत असते. परंतु देशातील बालकांची संख्या आणि त्यांच्या समस्या विचारात घेता हा खर्च खूपच अपुरा वाटतो. म्हणून सरकारने बालकल्याणावरील खर्चात भरघोस किंवा पुरेशी वाढ केली पाहिजे. त्याशिवाय बालकांच्या कुपोषण, बालमृत्यू, रोगराई इत्यादी प्रकारच्या समस्या नष्ट होणार नाहीत.

४) कडक शिक्षा व जलद न्याय:

बालकांशी संबंधित विविध गुन्ह्यांचे प्रमाण भारतात दिवसेंदिवस वाढत चालले असून बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. म्हणून बालकांशी संबंधित खटले जलद चालवून गुन्हेगारांना तात्काळ शिक्षा करावी. त्याशिवाय बालकांशी संबंधित गुन्हे करणाऱ्यांना वचक बसणार नाही.

५) अंधश्रद्धा निर्मूलन कायदा:

भारतातील विविध जाती-जमातीतील अंधश्रद्धांचे निर्मूलन झाल्याशिवाय बालकांना जोगते किंवा देवदासी म्हणून देवाला सोडणे, धनप्राप्तीसाठी, पुत्रप्राप्तीसाठी बालकांचा बळी देणे इत्यादी अनिष्ट प्रकार थांबणार नाहीत.

६) जुगाराचे अड्डे नष्ट करणे:

भारतात ग्रामीण, आदिवासी आणि

झोपडपट्टीत जुगाराचे अड्डे आहेत. जुगार, मटक्याला पैसा खर्च होतो. हे अड्डे नष्ट केल्याशिवाय बालकांना शिक्षण घेण्यास आणि आनंदी जीवन जगण्यास लागणारे पोषक वातावरण निर्माण होणार नाही.

**७) पालकांमध्ये शिस्त आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे:**

बहुसंख्य पालकच बेशिस्त आणि जबाबदारीची जाणीव नसणारे आहेत. त्यामुळे मुले गुन्हेगारी कृत्यात सहभागी होतात. म्हणून प्रथम पालकांत जबाबदारीची जाणीव निर्माण केली पाहिजे. बालकांचे संगोपन नीट न करणाऱ्या पालकांवर कारवाई केली पाहिजे. त्याशिवाय असे बेजबाबदार पालक मुलांच्या पालनपोषणाकडे, शिक्षणाकडे लक्ष देणार नाहीत.

**८) शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी:**

शाळेतील शिक्षक, शिपाई, वरच्या वर्गातील मोठे विद्यार्थी यांच्याकडून बालकांचे शारीरिक, लैंगिक शोषण होत असते. असे प्रकार घडू नयेत यासाठी शाळेच्या व्यवस्थापकांनी काळजी घ्यावयास हवी. असे प्रकार करणाऱ्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. त्याशिवाय शिक्षण क्षेत्रात बालकांचे होणारे लैंगिक व इतर शोषण थांबणार नाही.

**९) शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक:**

शिक्षण क्षेत्रात अत्यंत चांगले मनुष्यबळ येणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुलांना शिकावे असे वाटणार नाही. तसेच त्यांचे शोषणही थांबणार नाही. शिक्षण क्षेत्रात शिक्षक, शिपाई किंवा सर्व प्रकारचे कर्मचारी नेमताना त्यांची गुणवत्ता पहावी. तसेच ते चांगल्या कुटुंबातील आणि चांगल्या वर्तणुकीचे आहेत का ते पहावे. थोडक्यात शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता किंवा लायकीचा विचार करूनच शिक्षकांच्या व इतर नेमणूका कराव्यात. जुगारी, दारूडे शिक्षक व इतर प्रकारचे व्यसन असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरकारने सेवेतून तात्काळ मुक्त करणे आवश्यक आहे.

**१०) इतर उपाय:**

वरील उपायांबरोबरच बालकांच्या समस्यांच्या निराकरणासाठी इतरही काही उपाय सुचवता येतील. उदाहरणार्थ सामाजिक कार्यकर्ते व दानशूर व्यक्ती इत्यादींनी अनाथ बालके, रस्त्यावरची भीक मागणारी बालके यांच्यासाठी स्वतंत्र निवासगृहे स्थापन करावीत. त्यामुळे त्यांचा गुन्हेगारी कृत्यासाठी वापर होणार नाही. अशा बालकांना चांगले शिक्षण मिळून त्यांच्यातून चांगले नागरिक तयार होतील. या संदर्भात सरकारची भूमिका सुद्धा अत्यंत महत्त्वाची आहे. अनाथ बालकांसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांना सरकारने भरीव मदत करावी. तसेच अशा संस्था जास्तीत जास्त स्थापन करण्यास सरकारने मदत करावी व अशा संस्था स्थापन करण्यासाठी लोकांनीही पुढे यावे. कारण बालकांसाठी काम करणाऱ्या संस्थांची संख्या सध्या तरी कमीच आहे.

**समारोप:**

बालकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे बालकांवर, बालकांच्या कुटुंबियांवर, समाजावर आणि सरकारवर परिणाम होत असतात. ज्या बालकांचे शारीरिक, मानसिक, लैंगिक शोषण होते त्या बालकांना वेळीच उपचार मिळाले नाहीत तर ती मानसिकदृष्ट्या खचतात. बलात्कार झालेली मुले आणि त्यांची कुटुंबे खूपच खचतात. अशा बालकांच्या मनातील भीती

लवकर जात नाही. न्यूनगंड आणि भयगंड असलेल्या बालकांची शैक्षणिक प्रगती होत नाही. त्यामुळे त्यांचे शाळेतील अनुपस्थितीचे आणि गळतीचे प्रमाण मोठे राहते. ज्या बालकांचे घरातून, शाळेतून, समाजातून शोषण होते ती बालके घरातून पळून जातात. काही बालके आत्महत्या करतात.

सधन मुलांच्या समक्ष गरीब मुलांना वाईट वागणूक मिळाली की अशा मुलांमध्ये द्वेषभावना वाढीस लागते. अशी द्वेषभावना डोक्यात ठेवूनच मुले मोठी होतात. बालकांशी संबंधित विविध समस्यांमुळे उद्भवणारे वरील दुष्परिणाम बालकांच्या बरोबरच संपूर्ण समाजालाही भोगावे लागतात. म्हणून बालकांच्या सर्व समस्यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) दत्त व सुंदरम, *दत्त व सुंदरम इंडियन इकॉनॉमी*, एस. चांद आणि कंपनी लिमिटेड, दिल्ली, २०११, पृ.५०

२) *राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण*, १९९८-९९

३) *ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट*, महाराष्ट्र

४) दै. *लोकमत*, दि. १६ फेब्रु.२०१२

५) *योजना*, जून २०१०, पृ. ३६

६) *अर्थसंवाद*, जुलै-सप्टें. २००२, खंड २६, अंक २

७) दै. *लोकमत*, दि. १६ फेब्रु. २०१२

८) *योजना*, जून २०१०, पृ. ३७

९) *योजना*, नोव्हेंबर २००८, पृ. ३७

१०) इंगळे जयवंत शंकरराव, *आदिवासींची आर्थिक आणि सामाजिक स्थिती*, पीएच्. डी. प्रबंध, २००८, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

११) *शिवार्थ*, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद, कोल्हापूर, २००९, पृ. १४९.

# जलयुक्त शिवार अभियान: शाश्वत सिंचन धोरण

**साहेबराव यशवंतराव माळोदे**, पिंपळगाव (ब.),
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, क.का.वाघ महाविद्यालय,
ता.निफाड, जि.नाशिक
भ्रमणध्वनी:९४२३९६२४३८

मानवाला जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, हवा यांच्याइतकीच पाणी ही महत्त्वाची गरज आहे. मानवी शरीर हे ७०% पाण्याने व्यापलेले आहे. पाण्याचा शरीरातील सर्व क्रिया पूर्ण करण्यासाठी उपयोग होतो. म्हणजेच पाण्याशिवाय मानवी जीवन शून्य आहे म्हणून पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

**भारतातील पाण्याची उपलब्धता:**

भारतात पूर्वी पर्जन्यमान आणि पाण्याची उपलब्धता याबाबत काही अपवाद वगळता फारशी अडचण येत नव्हती. परंतु सध्या पर्जन्यमानातील अनियमिततेमुळे पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. देशातील एकूण ५९३ जिल्ह्यांपैकी २०० पेक्षा अधिक जिल्ह्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी घटली आहे. जगाच्या एकूण जमिनीपैकी २.४% जमीन व जागतिक लोकसंख्येच्या १६% लोकसंख्या भारताच्या वाट्याला आलेली आहे. भारतात वर्षातील ३ महिने १० ते १२० सें.मी. पाऊस पडतो. पर्जन्यमान अनियमित असल्यामुळे काही वर्षापासून देशात दरवर्षी १०० पेक्षा अधिक जिल्ह्यात दुष्काळ पडतो. भारतात उपलब्ध पाण्यापैकी ७४% पाणी शेती उद्योगासाठी १८% पाणी धरणात साठवणूक करून वीजनिर्मितीसाठी तर ८% पाणी घरगुती वापरासाठी वापरले जाते. सध्या भारताची लोकसंख्या १३० कोटीच्या आसपास असून २०५० पर्यंत ती १७० कोटीपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. एवढ्या अफाट लोकसंख्येसाठी २०५० मध्ये १४५० ते १५०० अब्ज घनमीटर पेक्षाही अधिक पाण्याची गरज लागेल असा अंदाज आहे. घटते पर्जन्यमान पाण्याचा अपव्यय, साठवणूक, वितरण व उपयोग यांचा विचार केल्यास भविष्यकाळात पाणीटंचाईचे भीषण संकट निर्माण होणार आहे.

भारतात पावसापासून ४००० अब्ज घनमीटर पाणी मिळते त्यापैकी

जवळपास ५०% पाणी नद्यांद्वारे समुद्राला जाऊन मिळते व प्रत्यक्षात फक्त ६९० अब्ज घनफूट पाण्याचा उपयोग केला जातो. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस घटत आहे. त्यामुळे भविष्यकाळातील पाणी टंचाईच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्रातील पाण्याची स्थिती:**

महाराष्ट्रात काही तालुके वगळता पाण्याची टंचाई व पाणी वापरातील चुकांमुळे पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पिण्यासाठी लागणारे पाणी, शेती, उद्योग व इतर उपयोगासाठी लागणाऱ्या पाण्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. एकीकडे एक हंडा पाण्यासाठी वणवण भटकणारी महिला व दुसरीकडे शुध्द केलेल्या पाण्याने वाहने धुणारी माणसे असे विसंगत चित्र अनेक ठिकाणी दिसत आहे. निसर्गदत्त पाण्यावर सर्वांचाच हक्क आहे. मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वांना पाणी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाची काय जबाबदारी आहे याबाबत जागृती व जलसाक्षरता निर्माण होण्याची गरज आहे. पाणी अडवा-पाणी जिरवा, जलसंधारण, वॉटर हार्वेस्टिंग, साठवणूक, पुनर्भरण, वितरण या क्षेत्रात प्रामाणिकपणे व गांभिर्याने काम करणे आवश्यक आहे.

अपुऱ्या अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम झाला आहे. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धते अभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढउतार दिसून येतो. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी एकात्मिक पध्दतीने सर्व विभागांच्या समन्वयाने नियोजनबध्द आराखडा तयार करून जलसंधारणाचे कार्यक्रम राबविल्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे निर्माण करता येईल. गेल्या काही वर्षात राज्यात पाणी अडविण्यासाठी व जिरविण्यासाठी जलसंधारणाचे अनेक कार्यक्रम राबविल्यामुळे पाणी टंचाईवर काही प्रमाणात मात करण्यास मदत झाली आहे. या सर्व कार्यक्रमांचे यश विचारात घेऊन जलयुक्त शिवार अभियान राज्य सरकारने प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्याच्या सर्व तालुक्यात जलसंधारणाची कामे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरू करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला आहे.

राज्यातील पाणीटंचाईची परिस्थिती विचारात घेऊन पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९ या धोरणाअंतर्गत जलयुक्त शिवार अभियान राज्य सरकारने सुरु केले आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत २ मी. पेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २२३४ गावे व पाणीटंचाईग्रस्त २२ जिल्ह्यांमधील १९०५९ गावांमध्ये हे अभियान सुरुवातीला राबविण्यात येत आहे व भविष्य काळात राज्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना करण्यात येत आहे.

जमिनीतील पाण्याची पातळी वाढावी, पाणी टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करता यावी, टंचाईग्रस्त गावांना पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी सरकारने काही गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे. या नाविन्यपूर्ण योजनेनुसार जलसंधारणांतर्गत सर्वसमावेशक उपाययोजनांद्वारे एकात्मिक

पध्दतीने शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले आहे. त्यानुसार या योजनेद्वारे २०१९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र टंचाईमुक्त करण्याचा केलेला निर्धार खऱ्या अर्थाने क्रांतीकारी आहे.

### जलयुक्त शिवार अभियानाचे उद्देश:

२०१९ पर्यंत महाराष्ट्र कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना करून दुष्काळमुक्तीसाठी व जलसंवर्धनासाठी जलयुक्त शिवार ही योजना अमलात आणण्यात येत आहे. त्यानुसार दरवर्षी ५००० गावे याप्रमाणे येत्या ५ वर्षात २५००० दुष्काळी गावांना दुष्काळमुक्त करण्यासाठी या अभियानाचे पुढील उद्देश निश्चित केले आहे.

१) पावसाचे उपलब्ध होणारे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.
२) भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
३) सिंचनक्षेत्रात वाढ करून शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४) भूजल अधिनियमाची अंमलबजावणी करणे.
५) पाणी साठवणक्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.
६) निकामी झालेले बंधारे, गाव तलाव, पाझरतलाव, सिमेंट बंधारे इ. जलस्त्रोतांमधील गाळ काढून त्यामधील पाणी साठवणक्षमता वाढविणे.
७) पाण्याच्या कार्यक्षम वापराबाबत प्रभावी जनजागृती करून वृक्षलागवडीस प्राधान्य देणे.
८) विकेंद्रित पाणीसाठा निर्माण करून सर्वांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध करणे.

### जलयुक्त शिवार अभियानासाठी यंत्रणा:

जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करून त्याची यशस्वी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुढील यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

१) विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावर समन्वय समिती.
२) जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती.
३) उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती.

वरील यंत्रणेबरोबरच राज्यात जलयुक्त शिवार अभियानासाठी विविध विभागाकडील विविध योजनांच्या उपलब्ध निधीची एकत्रित सांगड घालून जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येत आहे. यामध्ये कृषी, वन, सामाजिक वनीकरण, लघुसिंचन, जलसंधारण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, स्वच्छता अशा जिल्हास्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय राखून हे अभियान राबविण्यात येत आहे.

### जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे:

जूलै २०१५ अखेर राज्यातील एकूण ३४ जिल्ह्यांमध्ये ६२०२ गावांची निवड करून प्रत्यक्षात ३९९३ गावांमध्ये लोक सहभागातून जलसंधारणाची कामे सुरु केली त्यावर रु.२५३.९३ कोटी खर्च करण्यात आला. त्यातून पुढील कामे हाती घेण्यात आली.

१) पाणलोट विकासाची कामे, सिमेंट नाला, बंधाऱ्यांचे खोलीकरण व रुंदीकरणाची कामे.
२) कोल्हापूर पध्दतीच्या साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती.
३) पाझर तलाव व लघुसिंचन तलावांची दुरुस्ती

व नुतनीकरण करून साठवणक्षमता पुन:र्स्थापित करणे.

४) पाझर तलाव, गाव तलाव, साठवण बंधारे, शिवकालीन व ब्रिटीशकालीन तलावातील माती व गाळ काढणे.

५) मोठ्या व मध्यम सिंचन प्रकल्पांच्या क्षमतेचा प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाययोजना करणे.

६) विहीर व बोअरवेलचे पुनर्भरण तसेच पाणीवापर संस्थांचे बळकटीकरण करणे.

७) छोटे ओढे व नाले जोड प्रकल्प राबविणे.

८) कालवा दुरुस्तीच्या उपाययोजनांवर भर देणे.

तसेच जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत बंडींग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर,माती नाला बांध, साखळी सिमेंट नाला बांध दुरुस्ती, के. टी. वेअर दुरुस्ती, पाझर तलाव दुरुस्ती, नाला सरळीकरण, शेततळे, रिचार्ज साफ्ट, ठिबक व तुषार सिंचन या सर्व योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे.

या नाविन्यपूर्ण योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे उपलब्ध असलेला निधी तसेच राज्य व जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेला मदत व पुनर्वसन निधी जलयुक्त शिवार अभियानासाठी प्राधान्यक्रमाने वापरण्यास सरकारने मान्यता दिली आहे. यामध्ये जेसीबीचा वापर करून नाल्यातील गाळ काढणे तसेच खोलीकरण व रुंदीकरणाची कामे हाती घेण्याचे अधिकार सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. या अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अंमलबजावणी करणे, समन्वय व नियंत्रणासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची तालुकास्तरावर व जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

## जलयुक्त शिवार कामांची निवड प्रक्रिया:

या योजनेत आपले गाव सहभागी करून घेता येईल किंवा नाही असा प्रश्न निर्माण होतो परंतु ज्या गावात पाणीटंचाई आहे ज्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा होतो. अशा गावांची यादी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तयार केली जाते. गावांच्या निवडीसाठी एक तालुकास्तरीय समिती असते. समितीमध्ये गाव पातळीवरील ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतिशील शेतकरी यांचा समावेश असतो. हे सर्व कर्मचारी शिवार फेरीचे आयोजन करून गावाच्या परिसराची पाहणी करून कामाची निश्चिती म्हणजेच कृती आराखडा तयार करतात. या कृती आराखड्यास ग्रामसभेची मान्यता आवश्यक असते. याशिवाय या योजनेंचा लाभ आपल्या गावाला मिळावा असे वाटल्यास गावातील सामान्य नागरिक सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी अर्ज करू शकतात. म्हणजेच या योजनेत कामाच्या निवड प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात लोकसहभाग आढळून येतो.

## उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार:

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत वेगवेगळ्या स्तरावर विविध कामे उत्कृष्टरित्या केलेल्यांना पुरस्कार देण्याची योजना आहे. हे पुरस्कार पुढीलप्रमाणे दिले जातात.

१) तालुका पातळीवर दोन पारितोषिके

२) जिल्हा पातळीवर दोन पारितोषिके

३) विभागीय पातळीवर दोन पारितोषिके

४) राज्य पातळीवर तीन तालुक्यांना पुरस्कार

५) प्रभावी जनजागृती व प्रसिध्दीसाठी उत्कृष्ट लेखन करणाऱ्या पत्रकारांना जिल्हा, विभाग व

राज्य पातळीवर प्रत्येकी तीन पारितोषिके देण्याची तरतुद आहे.

जलयुक्त शिवार अभियानाची प्रगती:

महाराष्ट्रातील जलसमस्येवर कायम स्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार ही महत्वाकांक्षी योजना राज्यात राबविण्यात येत आहे त्याचे अनेक चांगले परिणाम दिसून येत आहे.

१) लोकांमध्ये जागरुकता:

जलयुक्त शिवार योजनेबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी गावोगावी जलदिंड्या निघाल्या वाजत-गाजत आलेल्या या जलदिंड्यांनी गावांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. छोट्या-छोट्या गटांनी पुढाकर घेऊन गावकऱ्यांचा सहभाग मिळविला त्यामुळे प्रचंड कामे गावागावात झालेली आहेत. या अभियानातून नदी, नाले, ओढे यांचे खोलीकरण, रुंदीकरण, साखळी सिमेंट नालाबांध जुन्या लघु पाटबंधाऱ्यांची दुरुस्ती, ओढे-नाले जोड प्रकल्प, मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या क्षमतेचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने विचार, पाणी वाटप संस्थांचे बळकटीकरण अशी हजारो कामे गावकऱ्यांनी केली आहे.

२) गावागावांत बदल:

पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन झाले पाहिजे याची जाणीव आज महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात निर्माण झाली आहे. गावातल्या नद्या, नाले, ओढे, तलाव यांचे संवर्धन ही आपली जबाबदारी आहे हे त्यांना पटले आहे याचा दृष्य परिणाम गावागावांमध्ये जाणवतो. तो म्हणजे या प्रकल्पाबद्दल गावकऱ्यांमध्ये आपुलकीची भावना आहे. अनेक ठिकाणी सामाजिक दायित्व म्हणून लोकांनी या अभियानाला आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे लोकसहभागातून झालेली जलयुक्त शिवार योजनेची कामे हे गावकरी अभिमानाने दाखवितात.

३) जलयुक्त शिवार ही लोक चळवळ:

महाराष्ट्रात जलयुक्त शिवार ही लोक चळवळ झाली असून सिंचन व जलस्तर वाढविण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. स्वत:च्या गावातील पाणी स्वत:साठी वापरा यासाठी सुरु केलेली ही लोकचळवळ शाश्वत सिंचनाचा मार्ग निर्माण करणारी झाली आहे. दिवस बदलले, पावसाचे प्रमाण लहरी झाले हे लक्षात घेऊन पाणी वापरले पाहिजे याचे भान शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार योजनेमुळे आले. कृषी विभागाने एकात्मिक पाणलोट विकास क्षेत्र कार्यक्रमाशी या जलयुक्त शिवाराचा संबंध जोडला आहे. त्यामुळे ही कामे करतांना शेताची बांधबांदिस्ती करण्यात येत आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगचे कार्यकर्ते, लायन्स क्लबचे सभासद आणि स्थानिक नेते यांच्या प्रेरणेने सुरु झालेली ही कामे आज लक्षणीय ठरली आहे.

४) जलसमृध्दीतून आर्थिक समृध्दीकडे:

पावसाच्या पाण्याला पर्याय नाही हे शाश्वत सत्य आहे. परंतु पावसाच्या लहरीपणावर निश्चितपणे मात करता येते ही शक्यता जलयुक्त शिवारामुळे निर्माण झाली आहे. नाल्यांच्या खोलीकरणामुळे निघणारा गाळ काही शेतकऱ्यांनी शेतात टाकल्यामुळे त्याचा उपयोग खतासारखा झाला. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली. हिरवीगार शेती, तुडूंब भरलेली विहीर, भरलेला नाला, नाल्याच्या आजुबाजूला निर्माण झालेली वनश्री असे आल्हाददायक व निसर्गरम्य चित्र हे केवळ स्वप्न न राहता ते एक दोन वर्षात

वास्तवात सुध्दा येऊ शकते.

**कठोर उपायांची गरज:**

जलयुक्त शिवार योजना काही बाबतीत यशस्वी होत असली तरी हे यश मर्यादित आहे. पाण्याचा अति वापर आणि कमी होणारे पर्जन्यमान यामुळे पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. जेव्हा पाणी मुबलक असते तेव्हा त्याच्या वापराबाबत निष्काळजीपणा दिसून येतो त्यामुळे ही आपत्ती मानवनिर्मित आहे असेच म्हणावे लागेल. इस्त्रायलसारख्या देशाचा विचार केल्यास त्यांच्या तुलनेत आपली समस्या खूप सौम्य आहे त्यावर मात करण्यासाठी पुढील बाबींकडे लक्ष देण्याची गरज आहे.

१) पाणी साठवण, वितरण, उपयोग, दूषित पाण्याची विल्हेवाट याबाबत योग्य व न्याय्य धोरणाचा अवलंब करून त्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग घेतला पाहिजे.

२) पाणी धोरण, पर्यावरण, पाणीसंकट, पाणी गळती, अपव्यय, चोरी व प्रदूषण करणाऱ्यांविरुध्द कठोर उपाययोजना केली पाहिजे.

३) जमिनीतील पाण्याचा अति उपसा टाळण्यासाठी विहिरी, बोअरवेल यासंबंधी योग्य धोरण निश्चित करून त्याची कठोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

४) जमिनीमध्ये पाणी पुनर्भरण होण्यासाठी वॉटर हार्वेस्टिंग सारखे कार्यक्रम राबवून त्यामध्ये लोकसहभाग वाढविणे आवश्यक आहे.

५) पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन करणे, वृक्षतोड टाळणे आणि वनक्षेत्र वाढेल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

६) या योजनेमध्ये भ्रष्टाचार, चुकीचे धोरण साधन सामुग्री व पैशाचा अपव्यय टाळून पाण्याचे स्त्रोत, वितरण, साठवण व पुनर्भरण यामध्ये पाणी बचतीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

थोडक्यात, सर्वांसाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत राज्यातील पाणीटंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार हे अभियान राबविण्यात येत आहे ते यशस्वी करण्यासाठी शासन यंत्रणेबरोबरच स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभाग महत्वाचा ठरणार आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) *उद्योजक*, मे २०१५ पृ.२१

२) *लोकराज्य*, फेब्रुवारी, मार्च, ऑगस्ट-२०१५

३) *अर्थसंवाद*, ऑक्टो.-डिसेंबर २०१५.

४) दैनिक ॲग्रोवन व दैनिक सकाळचे विविध अंक.

# वस्तू आणि सेवा कराचे स्वरुप व परिणाम

**सीमा चव्हाण**, श्रीरामपूर,
अर्थशास्त्र विभाग, रा. ब. नारायणराव
बोरावके महाविद्यालय, जि. अहमदनगर,
भ्रमणध्वनी: ९९२१२०९२७०
ई-मेल: dr.seemachavan17@gmail.com

देशातून *राजकीय सहमती* हा शब्द जणू हद्दपारच झालाय की काय, असे वाटत असतानाच वस्तू आणि सेवाकराचे (जी एस टी) विधेयक मंजूर करण्याच्या बाबतीत तिचे दर्शन घडले, हा एक सुखद धक्का आहे. केंद्र सरकारने *जी एस टी* संबंधीचे विधेयक राज्यसभेत नुकतेच संमत करुन घेऊन पहिली लढाई जिंकली आहे. जी एस टी (*गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स*) किंवा मराठीत ज्याला *वस्तू आणि सेवा-कर* असे म्हटले जाते, त्याबाबत गेले अनेक महिने नव्हे; तर अनेक वर्ष चर्चा सुरु आहे. सर्वसामान्यांच्या भाषेत हिचे वर्णन करायचे झाल्यास देशातले बहुतांश अप्रत्यक्ष कर या करपध्दतीत अंतर्भूत होतील आणि जी प्रचलित अप्रत्यक्ष करांची बहुविधता आहे, ती समाप्त होऊन त्याजागी केवळ एकच कर लागू होईल. जी एस टी १ एप्रिल २०१७ पासून लागू करावे अशी मोदी सरकारची इच्छा असली तरी हे उद्दिष्ट गाठण्यासाठी जीव तोडून धावावे लागेल. राज्य सभेनं १२२ व्या घटनादुरुस्तीद्वारे जे विधेयक संमत केले; ते आधारभूत किंवा पायाभूत विधेयक आहे. म्हणजेच या विधेयकाद्वारे या करपध्दतीसाठीचा मार्ग खुला करण्यात आला. १९८ पानी विधेयकात या संभाव्य किंवा भावी करपध्दतीचा आराखडा देण्यात आला आहे. ही नवीन करप्रणाली प्रत्यक्षात अवतरुन व्यवहारात चांगल्यापैकी रुळण्याचा टप्पा अजून तसा बराच दूर असला तरी एकंदरीने भारतीय अर्थव्यवस्थेचे देशी - विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षण वाटावे अशा प्रकारचे व्यवस्थापन यथावकाश अवतरेल याची खात्री देणारे हे पाऊल ठरते, यात वादच नाही. वस्तू व सेवा कराची व्यवस्था अंमलात आल्याने भारतीय अर्थव्यवस्थेतील करविषयक दहशतवाद (टॅक्स टेररिझम) संपुष्टात गेली.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

१) *जी एस् टी* ही संकल्पना अभ्यासणे.

२) या करपध्दतीमधले ठळक मुद्दे अभ्यासणे.

३) या करपध्दतीत कोणते केंद्रीय आणि राज्यांचे कायदे विलीन होतील हे अभ्यासणे.

४) *जी एस् टी* या कराचा दर काय असावा हे अभ्यासणे.

५) केंद्रीय (सी जी एस टी) आणि राज्य (एस जी एस टी) मध्ये जे कायदे समाविष्ट केले जातील त्यांचे परिणाम अभ्यासणे.

**जी एस् टी करपध्दतीमधील ठळक मुद्दे:**

१) या करपध्दतीच्या अंमलबजावणीची संपूर्ण यंत्रणा ही ऑनलाइन असेल.

२) यासाठी विविध कर विभागात विभागलेल्या विद्यमान कर्मचारी वर्गाचे एकीकरण करणे आणि त्याला प्रशिक्षण देणे हा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

३) यामध्ये करपध्दतीसाठीची कायदेशीर चौकट आखणे, माहिती तंत्रज्ञानाची पायाभूत यंत्रणा किंवा सुविधा उभारणं, उद्योग व व्यापारक्षेत्राशी सल्लामसलत आणि वर उल्लेखित अधिकार वर्गाचं व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण देणे.

४) तब्बल ६० हजार केंद्र आणि राज्य कर्मचाऱ्यांना *जी एस् टी - प्रशिक्षित* करणे म्हणजे यासंबंधीचे कायदे, नियम, कामकाज पध्दती आदिंविषयी प्रशिक्षित करणे.

५) सध्या म्हणजे विद्यमान प्रचलित विविध करांसाठी नोंदणीकृत उद्योग किंवा व्यापार संस्थांना वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यांची माहिती व डाटा *जी एस् टी* यंत्रणेत स्थलांतरित करण्यात येईल.

६) नव्याने अर्ज करणाऱ्यांना ऑनलॉईन अर्ज करुनच स्वत:ची नोंदणी करावी लागेल. पॅन आधारित नोंदणी क्रमांक राहणार आहे.

७) कायदेशीर चौकटीमध्ये प्रामुख्याने या करपध्दतीशी संबंधित कायदे, उदा. सी. जी एस् टी , एस् जी एस् टी आदि डिसेंबर २०१६ पर्यंत मंजूर करवून घेणे. यामध्ये संसदेबरोबरच राज्य विधिमंडळाचीही जबाबदारी तसेच नियम अधिसूचित करणे.

८) माहिती तंत्रज्ञानाची पायाभूत यंत्रणा : यामध्ये *गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स नेटवर्क* ची (जी एस् टी एन) स्थापना यामध्ये केंद्र आणि राज्याप्रमाणेच काही बिगसरकारी संस्थांच्या सहभागानेही 'ना नफा, ना तोटा' संस्था स्थापन करणे.

**जी एस् टी चा दर काय असावा ?**

आता सर्वात कळीचा मुद्दा आहे, तो *जी एस् टी* चा दर काय असणार. हा दर जास्त असू नये असे सगळ्यांना वाटत आहे पण तो निश्चित करणे हे एक मोठे आव्हान असेल. अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या व पुरवठा केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवाकरांच्या जाळ्यात येण्याने अप्रत्यक्ष करव्यवस्थेचा पाया प्रचंड प्रमाणात विस्तारला जाणार आहे. कराचा दर आणि कराचा पाया यांचा गुणाकार म्हणजे सरकारच्या तिजोरीत प्रत्यक्षात जमा होणारा कर; असे साधे समीकरण असते. सरकारला जर कर महसूल वाढवायचा असेल तर तीन पर्याय सरकारला खुले आहेत. एक तर, कराचा पाया न बदलता कराचा दर वाढवायचा. दुसरे म्हणजे, कराचा दर तोच ठेवून कराचा पाया विस्तारित बनवायचा आणि तिसरे

म्हणजे कराचा दर व कराचा पाया दोन्ही वाढवत राहायचे.

तेराव्या वित्त आयोगाने सर्वप्रथम कराच्या दराबाबत सूतोवाच केलेले होते आणि त्यांनी *आदर्श दर १८ टक्के राहील असे नमुद केले होते*. अर्थमंत्री अरुण जेटली यांनीही याला सहमती दर्शविली. विशेषत: महागाई होण्याची शक्यता लक्षात घेऊन जी एस् टी चा दर कमी राखण्याचा जो आग्रह धरण्यात येत आहे, त्या संदर्भात आपण काही मुद्यांचे विवेचन केले तर असे आढळून येते की, जी एस् टी मध्ये *करावर* कर लागू न करण्याचे तत्त्व समाविष्ट आहे आणि त्यामुळेच कराचा दर कमी होईल. भारतात ग्राहक किंमत निर्देशांकाच्या कक्षेत येणाऱ्या ५४ टक्के वस्तूंना पूर्ण करसवलत आहे आणि जी एस् टी लागू झाल्यानंतर देखील ही पध्दत सुरु राहील अशी अपेक्षा आहे. याचप्रमाणे ३२ टक्के वस्तूंना तुलनेने कमी दराने कर आकारला जातो. त्यामुळे केवळ १४ ते १५ टक्के वस्तूंनाच अधिकृत दराने कर आकारला जातो. ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास आणि जी एस् टी चा २० ते २४ टक्क्यांच्या आसपास आहे, असे गृहीत धरल्यास त्यामुळे महागाईचा धोका संभावतो का, हा खरा प्रश्न आहे.

(केंद्रीय) सी जी एस् टी मध्ये खालील प्रचलित कायदे अंतर्भूत होतील:

१) केंद्रीय उत्पादन शुल्क
२) अतिरिक्त उत्पादन शुल्क
३) सेवाकर
४) अतिरिक्त सीमा शुल्क (सामान्यपणे कौंटरव्हेलिंग शुल्क)
५) कस्टम - विशेष अतिरिक्त शुल्क

(राज्य) एस् जी जी एस टी मध्ये खालील प्रचलित कायदे अंतर्भूत होतील:

१) राज्य मूल्यवर्धित कर/विक्री कर
२) मनोरंजन कर (स्थानिक संस्थांनी आकारलेल्या करापेक्षा इतर)
३) केंद्रीय विक्रीकर (केंद्राने आकारलेला आणि राज्यांनी गोळा केलेला)
४) जकात आणि प्रवेश कर
५) खरेदी कर
६) आराम (लक्झरी कर)
७) लॉटरी, जुगार आणि सट्टेबाजीकर

## जी एस् लागू झाल्यानंतर वगळण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा:

जी एस् टी लागू झाल्यानंतर देखील पाच प्रमुख वस्तू आणि सेवा अशा आहेत की ज्या कायद्याच्या बाहेर असतील. त्यांचे एकंदर महसुलातले प्रमाण लक्षात घेतल्यास ते निम्मे किंवा त्याहून जास्तच म्हणणे ६० टक्क्यांच्या आसपास जाते. पेट्रोलियम उत्पादने - पेट्रोक्रूड, हायस्पीड डिझेल, मोटारीसाठीचे पेट्रोल, नैसर्गिक वायू आणि ए टी एफ (एव्हिएशन टर्बाइन फ्युएल) म्हणजे विमानांसाठीचे इंधन, अल्कोहोल आणि तंबाखू या वस्तू *जी एस् टी* मधून वगळण्यात आल्या आहेत. सेवांमध्ये वीजक्षेत्राचा समावेश आहे. रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधितही काही भाग वगळण्यात आला आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्वसामान्यांना आवश्यक अशी जीवनावश्यक औषधी, दैनंदिन गरजेच्या खाद्यवस्तू , भाजीपाला, फळे यांचा देखील यामध्ये समावेश होतो. त्याची यादी विधेयकात समाविष्ट आहे. अर्थात, प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थ वगळण्यात आलेले नाहीत.

जी एस् टी चे परिणाम:

१)महागाई वाढेल: वस्तू व सेवाकर आल्यानंतर सौम्य ते मध्यम प्रमाणात महागाई वाढेल. काही अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार देशांतर्गत उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा ५८ टक्के आहे. उद्योग क्षेत्राचा वाटा २५ टक्के तर शेती क्षेत्राचा १७ टक्के आहे. सध्या सेवाकराचा दर १४ टक्के अधिक अधिभार असून तो जर वाढला तर महागाई वाढण्याची पूर्ण शक्यता आहे.

२)छोट्या व्यापाऱ्यांना मारक: वस्तू - सेवाकर कायदा जरी देशासाठी वरदान ठरणार असला तरी छोट्या व्यापाऱ्यांसाठी व छोट्या व्यावसायिकांसाठी थोडासा मारक ठरणार आहे. याचे कारण म्हणजे या कायद्याखाली नोंदणी करण्याची सक्ती सर्व करदात्यांना दहा लाख रुपयांपर्यंत खाली आणण्यात आली आहे.

३)करमुक्त व्यवहार: वस्तू - सेवाकर कायद्यात मोठ्या प्रमाणात करमुक्त वस्तू वा सेवा व्यवहार असू नयेत, असे अर्थतज्ज्ञांनी म्हटले आहे. त्यांच्या मते, असे केल्यास कर पध्दतीचा ढाचाच बदलू शकतो. राज्यांच्या व केंद्राच्या करमुक्त वस्तू व सेवा एकच असायला हव्यात; अन्यथा कराचा बोजा वाढू शकतो. सध्याच्या प्रस्तावात देशपातळीवर उत्पादन शुल्कातील २००, तर राज्य पातळीवर ९० वस्तू व सेवांना करातून पूर्ण सूट देण्याच्या सवलती प्रस्तावित आहेत, त्या कमी होण्याची गरज आहे.

४)आंतरराज्य व्यवहार: आंतरराज्य व्यवहारांसाठी उत्पादक राज्यांपेक्षा उपभोक्त्या राज्याला हा वस्तू - सेवा कर मिळणार असल्याने त्या उत्पादक राज्यातील जनतेवर पर्यायाने त्या राज्यातील सामान्य माणसावर अन्याय होईल, असे वाटते.

५)एक देश, एक कायदा, एक दर: विविध कायद्यांचे एकत्रीकरण ज्या वेळी वस्तू - सेवा कर कायदा अस्तित्वात येतील, त्यावेळी एक 'सी जी एस् टी', एक 'आय जी एस् टी' व एकतीस 'एस जी एस टी' (दोन केंद्रशासित प्रदेश धरुन) अंमलात येतील. असे करण्याने प्रत्येक कायद्यांसाठी वेगवेगळे पालन करण्याची आवश्यकता न राहिल्याने कामाचा बोजा कमी होईल व एकाच कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

६)कॉम्पोझिशन स्कीम: कॉम्पोझिशन स्कीम या कायद्यांतर्गत प्रस्तावित केली असून, ज्या व्यापाऱ्यांची उलाढाल रु. ५० लाखापर्यंत असेल, त्यानांच या स्कीमचा फायदा घेता येईल. उलाढालीवर १ टक्का कर भरण्याचे बंधन यावर असून कोणत्याही भरलेल्या कराची वजावट मिळणार नाही, की कोणतेही 'इनपूट क्रेडिट' जमा घेता येणार नाही.

७)विवरणपत्रातील क्लिष्टता: वस्तूसेवा करातील एक महत्त्वाची त्रुटी म्हणजे वस्तू व सेवा विभागाकडे पाठवायची विवरणपत्रे होय. प्रत्येक महिन्याचे एक वार्षिक एक, अशी एकूण सकृतदर्शनी १३ विवरणपत्रे दाखल करावी लागणार असे दिसत असले तरी प्रत्यक्षात वर्षातून एकूण ३७ विवरणपत्रे पाठवावी लागतील. विवरणपत्रातील तपशील सामान्य माणसाच्या व छोट्या व्यापाऱ्यांच्या दृष्टीने फारच क्लिष्ट आहे व त्यासाठी सनदी लेखापालांची वा कर सल्लागारांची मदत घ्यावी लागेल.

८)उद्योग व्यवहारांचे संघटन: या करप्रणालीचा आणखी एक लाभ म्हणजे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत चौफेर विस्तारलेले उद्योगव्यवहाराचे

असंघटित क्षेत्र आपोआपच संघटित व्यवहारांच्या कक्षेत या ना त्या स्वरुपात समाविष्ट होण्याची प्रक्रिया गतिमान बनावी.

**निष्कर्ष:**

थोडक्यात जसे लोकांना शिक्षित करणे महत्त्वाचे तसेच राज्यांना विश्वासात घेणेही महत्त्वाचे आहे. याचे कारण विक्रीकर, प्रवेशकर इत्यादींतून मिळणारे उत्पन्न बंद होणार असल्याने त्यांच्या महसुलाला मोठा फटका सुरवातीला बसणार आहे. केंद्र सरकारला त्यासाठी नुकसान भरपाई द्यावी लागेल. ती किती असावी आणि त्यासाठी पैसे कुठून आणायचे हा अर्थातच केंद्र सरकार पुढील मोठा प्रश्न असेल. हे सर्व पाहता केंद्र - राज्य संबंध आणि राज्याराज्यांतील संबंध हे सौहार्दाचे असणे ही मोठी गरज आहे. मुळात करांचा बोजा कमी होण्याने वस्तू व सेवांच्या बाजारभावाची पातळी स्पर्धात्मक राहून एकंदरच उत्पादन व विक्री व्यवहारांची उलाढाल उंचावल्याने त्याची परिणती देशाचे ठोकळ उत्पादन वाढण्यात घडून यावी हे अतिशय स्वाभाविक ठरते. अर्थात, जादूची कांडी फिरल्यासारखे हे सारे संभाव्य बदल एका रात्रीत घडून येणारे नसले तरी भारतीय अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता सरासरीने उंचावण्यात वस्तू व सेवा कराची प्रणाली भरगच्च हातभार लावेल याबाबत शंका घेण्याचे अजिबातच कारण नाही. या पुढच्या काळात सहकारी संघराज्य या तत्वाची कसोटी लागणार आहे... *अवघे धरु सुपंथ* ही प्रेरणा प्रबळ ठरली तर काय घडू शकते, याचा जी एस् टी च्या यशस्वी अंमलबजावणीतून प्रत्यय येईल. मात्र त्यासाठी *एकमेका साह्य करु,* ही पूर्वअट विसरता कामा नये.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) रंजन कोळंबे (२०१५) *'भारतीय अर्थव्यवस्था'* (IAS, राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षेसाठी उपयुक्त) भगीरथ प्रकाशन, पुणे

२) डॉ. आर. के. दातीर (२०१५) *आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था* निराली प्रकाशन, पुणे

३) अविनाश धर्माधिकारी, श्री अभय टिळक (सप्टेंबर २०१६) *चाणक्य मंडल परिवार स्पर्धा परिक्षा तयारी.* चाणक्य मंडल, सदाशिव पेठ, पुणे - ३०

४) अमोल लक्ष्मण घोडके (एप्रिल २०१३) *भारतातील मानव संसाधन विकास* 'द युनिक अॅकॅडमी' पुणे

५) अनंत बागाईतकर, *'जी एस् टी एकच बाजार, एकच कर...'* सकाळ वृत्तपत्र (रविवार ७ ऑगस्ट २०१६) पुणे

६) सकाळ न्यूज नेटवर्क *'जी एस् टी' साठी महाराष्ट्राचे अधिवेशन* (६ ऑगस्ट २०१६) पुणे

७) डॉ. दिलीप सातभाई *'कोणासाठी काय ?'* सकाळ Sunday स्पेशल (२८ ऑगस्ट २०१६) पुणे

# दारिद्र्य आणि सर्वसमावेशक वृद्धी

**हिरालाल वामन चव्हाण**, जळगाव,
अरुणोदय ज्ञानप्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व
गृहविज्ञान महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९४२३९१५६४६

**मुरलीधर पंडीत गायकवाड**, मुरुड जंजिरा,
वसंतराव नाईक कला व वाणिज्य
महाविद्यालय, जि. रायगड
भ्रमणध्वनी: ९४२०८३५९०४

दारिद्र्य ही सामाजिक समस्या आहे. १७ व्या शतकामध्ये गरीबांसाठी विशेष कायदा करण्याचा विचार युरोपातील शासन व्यवस्थेने केला होता. ज्या ठिकाणी मालमत्ता ही भांडवल असते. ज्याठिकाणी पिळवणूक आणि खाजगी मालमत्ता एकत्र येतात तिथे दारिद्र्याचा जन्म होतो. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी गरीबी हटाव कार्यक्रमापासून दारिद्र्य निर्मूलनासाठी सुरुवात झाली. परंतु आजही देशातील ४० टक्के जनता दारिद्र्यात अडकलेली आहे. मालमत्ता ही भांडवल असून भांडवल क्षेत्रात पिळवणूक झाल्यामुळेच दारिद्र्यात वाढ झाली आहे. दारिद्र्य निर्मूलनाची जबाबदारी शासनाची आहे. असे म्हणता येत असून दारिद्र्य हाताळणे ही सामाजिक जबाबदारी आहे. अमेरिकेतही १५% लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. दुष्काळी योजना इतर काळात वापरु नये. दारिद्र्याची व्याख्या प्रत्येक ठिकाणी वेगळी आहे. पुरेसे पाणी न मिळणे हे ही दारिद्र्याची लक्षणे आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी लोकांना काम देणे आवश्यक आहे.

बहुजन गरिबी (Mass Poverty) हा मानवाच्या पाचवीला पुजलेला जणू शापच आहे. आतापर्यंत विज्ञान आणि तंत्रज्ञान यात विलक्षण प्रगती झाली. यामुळे भूतलावर सर्वांचेच म्हणजे प्रत्येक नागरिकांचे राहणीमान उच्च स्तरावर जायला हवे होते, पण तसे झाले नाही. गुलामगिरीत गुलाम, सरंजामशाहीत भूदास आणि आजच्या भांडवलशाही युगात शेतमजूर, असंघटित कामगार,

भटक्या जमाती, आदिवासी, झोपडपट्ट्यातील रहिवासी अशा प्रकारचे आर्थिकदृष्टया कमकुवत असे अनेक वर्ग आणि नागरिक हे दरिद्रीच राहिले आहेत.

**अभ्यासाचे महत्व:**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही दारिद्र्याची समस्या आढळते. नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलशाही आर्थिक मक्तेदारी वाढत आहे. देशाचा आर्थिक विकासाचा दर वाढत असला तरी उत्पन्नातील विषमतेत वाढ होऊन गरीबांची संख्या वाढत आहे. आजही देशात ३०% पेक्षाही जास्त लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. भारताच्या जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटचालीत दारिद्र्य हा एक मोठा अडथळा ठरतो आहे. म्हणून या विषयाच्या अभ्यासास आजही महत्व आहे. अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत: १) सर्वसमावेशक वृद्धीची संकल्पना अभ्यासणे २) भारतातील दारिद्र्याची सद्यस्थितीचा आढावा घेणे आणि सर्वसमावेशक विकासाची गरज अभ्यासणे, ३) भारत सरकारने गरीबी निर्मुलनासाठी केलेले उपाय अभ्यासणे.

**संशोधन पद्धत:**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. सर्वसमावेशक वृद्धी संदर्भात तसेच दारिद्र्यांच्या समस्येसंदर्भात विविध संदर्भग्रंथ, मासिके, पाक्षिके, नियतकालिके, मानवी विकास अहवाल, भारताचा आर्थिक पाहणी अहवाल, इत्यादीपासून माहिती संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे सदरचा शोधनिबंध तयार केला असून, लेखात सर्वसमावेशक वृद्धीची गरज आणि दारिद्र्य निर्मुलन यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**समावेशक वृद्धी संकल्पनेचे विवेचन:**

अलिकडच्या काळात जगातील बहुसंख्य देशांनी सर्वसमावेशक वृद्धीचे तत्व हे अर्थ व्यवस्थेला शाश्वत विकासाचा एक भाग म्हणून धोरणात्मक दृष्टिकोनातून मान्य केले आहे. जागतिक आयोगाने Brundland Report १९८७ मध्ये तयार केला, त्यात शाश्वत विकासाची संकल्पना मांडली शाश्वत विकास म्हणजे जो सध्याच्या गरजा पूर्ण करतो व भविष्य कालीन किंवा पुढच्या पिढीच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेमध्ये पुरेशा नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करणे. संरक्षण करतो, पुढच्या पिढ्यांची काळजी करतो, योग्य नियोजनाचे वर्तमान व भविष्य काळासाठी, निसर्ग समृद्धीसाठी प्रयत्न करतो त्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात.

भारतीय अर्थव्यवस्थेत ११ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक वृद्धी या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले. या योजनेची व्यूहनीति ही त्यावर आधारलेली आहे. विकासापासून वगळल्या गेलेल्या वृद्धी प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात समावेशक म्हणजे सर्वसमावेशक वृद्धी होय. समावेशनाचा विचार उत्पादन, उत्पन्न, व उपभोग व वितरणाच्या संदर्भात करता येतो. व्यावहारिक दृष्टीने भौतिक व मानवी संपत्तीच्या अभिदानापासून वंचित, परिणामतः उत्पन्न वितरणाच्या तळाच्या पातळीमुळे वृद्धीच्या लाभापासून वंचितांना किती लाभ मिळाला. यावरुन समावेशाचे यश लक्षात येते. सर्वसमावेशक वृद्धी ही दीर्घकालीन प्रक्रिया असून, उत्पन्नाचे प्रत्यक्षात वितरण करण्यापेक्षा उत्पादक, रोजगार निर्मिती करणे, गरजेचे आहे कारण त्यामुळे

विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. श्रमशक्तीचा विकास प्रक्रियेतील सहभाग हा सर्वसमावेशक वृद्धीचा कार्यक्षम मार्ग आहे.

United Nations Development Programme 2008 - (यु.एन.डी.पी. अहवाल २००८) नुसार सर्वसमावेशक वृद्धी संकल्पना उत्पादन आणि उत्पन्न यावर अधिक भर देते. समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न काळातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास आणि वितरणातील समानता महत्वाची आहे. एका बाजूला सर्व गटातील लोकांचे संघटन तर दुसऱ्या बाजूला सर्वांसाठी त्याचे फायदे झाले तरच सर्वसमावेशक उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल.

जागतिक बँकेने २००६ मध्ये जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत असा विचार न करता मानव हा घटक विचारात घेवून आर्थिक वृद्धीची प्रादेशिक व्याप्ती वाढविणे, भावी पिढीसाठी साधन सामुग्री बाजारपेठा संधीतील समानता याचा विस्तार करणे, सर्वसमावेशक विकासासाठी आवश्यक आहे.

अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्याचा प्रत्यक्ष संबंध मनुष्यातील मुलभूत क्षमतांपासून दुरावलेल्या गरीबाशी आर्थिक जवळचा आहे. गरीबाजवळ असणारे कमी उत्पन्न ही गौण बाब आहे. गरीबांच्या सुप्त क्षमता शक्तीत आणि कौशल्यात जसजसी वाढ होईल तसतशी त्या गरीबांना दारिद्र्यापासून मुक्त होण्याची प्रेरणा मिळते. दारिद्र्यात घट होण्यासाठी सर्वसमावेशक वृद्धीची आवश्यकता आहे. यासाठी विकासाचा पाया विस्तृत असावा लागतो. विकासाचे जे सूक्ष्म व समग्र निर्देशक आहेत. त्यामध्ये सहसंबंध असला पाहिजे.

**भारतातील दारिद्र्याची सद्यस्थिती आणि सर्वसमावेशक वृद्धीची गरज:**

माहिती तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसारामुळे तळागाळातल्या वर्गाला टप्पाटप्प्याने हक्क आणि अधिकाराची जाणीव होत राहील. यातूनच सर्वदूर हातांना काम आणि पोटाला पुरेसे अन्न मिळत राहील. अगदी श्रीमंती नाही आली तरीही किमान आर्थिक स्थैर्य येऊन वैश्विक पातळीवर गरीबांचे उच्चाटन होण्यास नक्कीच प्रारंभ होईल. असा आशावाद १९९० च्या दशकात जागतिकीकरणाच्या पर्वारंभानंतर सर्वदूर जागवला गेला. मात्र, गरीबीमुक्त आणि सीमारहित जग हे अजूनही दिवास्वप्नच असल्याचे भान जागतिक बँकेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या गरीबीसंदर्भातील जागतिक पाहणी अहवालाने दिले आहे. या अहवालानुसार जगात या घटनेला भारताच्या एकूण लोकसंख्येइतकेच म्हणजेच १२० कोटी लोक पराकोटीच्या गरिबीचे जिणे जगत आहेत. गरीबी संदर्भात भारताचा विचार करता जागतिक गरीबांच्या संख्येमध्ये भारताचा वाटा २२ टक्के, तर महासत्ता पदावर वेगवान वाटचाल करत असलेल्या शेजारी चीनचा वाटा अपेक्षाप्रमाणे भारतापेक्षा ९ टक्क्यांनी कमी म्हणजे १३ टक्के इतका नोंदला गेला आहे. या अहवालानुसार अशिया आणि आफ्रिकी खंडातील देश, गरिबीरेषा विस्तारण्यास कारणीभूत असल्याचे चित्र प्रथमदर्शनी सामोरे येते असले, तरीही या खंडातील विकसनशील देशात ३० वर्षात गरिबीचा दर ५० टक्क्यांवरुन २१ टक्क्यांवर आल्याचेही निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे. याचाच अर्थ, वेगवेगळ्या माध्यमातून गरिबी निर्मुलनाचे प्रयत्न होत आहेत. मात्र

जागतिक बँकेच्या व्हिजननुसार २०३० पर्यंत जग गरिबीमुक्त होणार की नाही, हा अभ्यासकांच्या चिंतेचा विषय बनल्यास आश्चर्य वाटायला नको.

भारताने जुलै १९९१ पासून जी प्रचंड प्रमाणात प्रगती केली आहे. तिचे प्रमाण व वेग लक्षात घेतला तर भारताच्या इतिहासातील हे एक महत्वाचे पर्व म्हणावे लागेल. सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी आपला देश अत्यंत गरीब व दारिद्र्याने पिडलेला होता. अलिकडे आपण जगातील मध्यम उत्पन्न देणाऱ्या देशांच्या मालिकेत दाखल झालो आहोत. १९७३-७४ मध्ये जवळपास ५५% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती. परंतु दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमामुळे त्यात १९९३-९४ पर्यंत ३६% घट झाली तर २००२ पर्यंत २६% घट झाली. योजना आयोगाच्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६१ वी फेरीनुसार घरगुती ग्राहक खर्चानुसार दारिद्र्याचे निष्कर्ष काढण्यात आले त्यानुसार २८.३% ग्रामीण, शहरी २५.७%, लोक दारिद्र्यात आढळून आले. Mixed Recall Period नुसार ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण २१.८% व शहरी भागात २१.७% आहे. तर अखिल भारतीय पातळीवर २१.८% दारिद्र्याचे प्रमाण दिसून आले. तेंडूलकर समितीच्या अंदाजानुसार २००४-०५ मध्ये ३७.२% लोक दारिद्र्य रेषेखाली होते. ग्रामीण भागामध्ये ४१.८% तर शहरी भागामध्ये ३६.३९% एवढे दारिद्र्याचे प्रमाण होते. रंगराजन समितीच्या अंदाजानुसार २०११-१२ या वर्षी देशात ३६.३९% लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. देशाच्या एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाण २९.५% होते. यावर्षी देशात संख्येच्या दृष्टीने उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, या राज्यात सर्वाधित दारिद्र्यरेषेखालील लोक राहत होते. रंगराजन यांच्या अहवालामुळे ३६ कोटी ३० लाख जागतिक गरीब म्हणवून घेण्यास पात्र ठरतील. रंगराजन यांच्या अहवालामुळे १० कोटी इतके अधिक गरीब आपल्या देशात मोजले जाणार आहेत. म्हणजे दर १० नागरिकांतील तीन जण आपल्या देशात आता गरीब म्हणवून घेण्यास पात्र ठरतील. याचाच अर्थ आपण विकासाचा विशिष्ट टप्पा गाठला असला तरी त्या प्रमाणात दारिद्र्य कमी होत नसल्याचे दिसून येते. याचाच अर्थ दारिद्र्याचा सापेक्ष व निरपेक्ष स्थितीचा विचार करता भारतात सर्वसमावेशक वृद्धीची गरज निर्माण झाली आहे.

बहुसंख्य विकसनशील देशात सार्वजनिक दारिद्र्य ही मुलभूत समस्या आढळते. देशाच्या अर्थविकासाला चालना देण्यासाठी तसेच दारिद्र्य निर्मुलनाकरीता कृषी क्षेत्राची वाढ वेगाने होणे तसेच उद्योग क्षेत्रात मानवी कौशल्ये विकसित करुन रोजगार वाढ घडवून आणणे शक्य आहे त्यामुळे मानवी कौशल्ये विकसित होऊन दारिद्र्य अवस्थेतील लोकसंख्येचे प्रमाण व आकार कमी होण्यास मदत होईल.

भारत सरकारने गरीबी निर्मुलनासाठी केलेले उपाय भारतामध्ये विविध पंचवार्षिक योजनांची जी विविध उद्दिष्टे निश्चित करण्यात आली, त्यामध्येही सर्वसमावेशक वृद्धीच्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. गरीबी हटाओ या कार्यक्रमाची घोषणा व अंमलबजावणी सर्वसमावेशक विकासाच भाग होता. शेती विकासाला प्राधान्य, औद्योगिक विकास, स्थैर्यासहित विकास, रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मुलनासाठी आखलेल्या विविध योजनांमुळे समतेवर आधारित अर्थव्यवस्था

निर्माण करण्याचा प्रयत्न झाला परंतु प्रत्यक्षात निरपेक्ष दारिद्र्य, बेकारी, विषमता या समस्यांमध्ये वाढच होत गेली. देशातील गरिबांचे जीवन सुसह्य व्हावे. त्यांना दररोज दोन वेळ पोटभर जेवणांची भ्रांत पडू नये यासाठी सरकारने दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, आर्थिक विषमतेत घट व देशातील शहरी आणि ग्रामीण भागातील उत्पन्न पातळीतील तफावत कमी करणे इत्यादी कल्याणकारी योजना सुरु केल्या एवढेच नव्हे तर सातत्याने त्यात नवनवीन योजनांची भर घातली.

## दारिद्र्य निर्मूलनासाठी शासनाचे प्रयत्न:

### सार्वजनिक वितरण व्यवस्था:

दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वितरण प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. १९९७ मध्ये लक्ष्यदर्शी करण्यात आली त्यामुळे ही व्यवस्था केवळ गोरगरीब लोकांना स्वस्त दरात धान्याचे वितरण करण्यासाठी राबविली जाऊ लागली. सद्यस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेखालील जनतेला अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेणे आवश्यक आहे.

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:

देशात केंद्र सरकारने सप्टेंबर २००५ मध्ये आदेशापत्राद्वारे राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण रोजगार हमी कायदा पास केला. या योजनेनुसार ग्रामीण भागातील कोणत्याही व्यक्तीला ती श्रमाचे काम करण्यास तयार असल्यास तिला किमान वेतन दराने वर्षाला १०० दिवस रोजगार देण्याची हमी केंद्र सरकारने दिली आहे. स्वयंपाकाचा गॅस आणि मनरेगा मधील अनुदानाच्या थेट बँकेतील हस्तांतरणामुळे गळती कमी झाली आहे, पडून राहिलेल्या निधीत घट झाली आहे, भ्रष्टाचारात घट झाली आहे.

### अन्न सुरक्षा कायदा:

५ जूलै २०१३ रोजी अन्न सुरक्षा कायदा लागू करण्यात आला. काही राज्यात त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. या कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीला दर महिन्याला ५ किलो अन्नधान्य अथवा प्रत्येक कुटुंबात ३५ किलो अन्नधान्य अनुदानी किंमतीला उपलब्ध करुन दिले जाते. त्यामध्ये गहू २ रु. किलो, तांदुळ ३ रु. किलो व ज्वारी, मका वगैरे धान्ये १ रु. प्रति किलो दराने पुरविले जाणार आहे हे अन्नधान्य ग्रामीण भागातील ७५ टक्के लोकांना व शहरी भागातील ५० टक्के लोकांना पुरविले जाईल. या कायद्यात काही त्रुटी आहेत. त्या दूर करुन या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

### पंतप्रधान जन-धन योजना:

आर्थिक सबलीकरण, महिला सबलीकरण, दारिद्र्य निर्मूलन, गोरगरीब जनतेला अनुदान व सबसिडीद्वारे विजपुरवठा करणे, भ्रष्टाचारास आळा घालणे, अशी विविध प्रकारची उद्दिष्टे समोर ठेवून ही योजना तयार करण्यात आली आहे. प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत आर्थिक समावेशनाला गती आली असून, अटल पेन्शन योजनेद्वारे नवीन निवृत्ती योजनांची व्याप्ती वाढत आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल योजना:

दारिद्र्य रेषेखालील स्वतःची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत स्वतःची जागा खरेदी करण्यासाठी आर्थिक

सहाय्य देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना ही नवीन योजना सुरु करण्यात आली. तसेच इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, तसेच शबरी आदिवासी घरकुल योजना अंतर्गत १ लाख घरे बांधण्याचे शासनाने लक्ष्य असून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्वच्छतेसह उत्तम प्रतीची घरे बांधण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टीवासी व मध्यमवर्गिय यांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत व २०२२ पर्यंत कोणीही घराविना राहू नये असा शासनाचा प्रयत्न आहे.

**गरीबांना मोफत गॅस जोडणी:**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील गरीब कुटुंबासाठी मोफत गॅस जोडणी योजना जाहीर केली. यानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना यांचा लाभ मिळणार असून त्यासाठी केंद्र सरकारने तब्बल ८ हजार कोटी रु. ची योजना आखली आहे. पंतप्रधान उज्ज्वला योजनेतंर्गत गरीब कुटुंबातील महिलांच्या नावावरच गॅस जोडणी मिळेल या योजनेसाठी पंतप्रधानांनी केवळ १०० पैकी आठ जणांकडेच गॅस जोडणी असलेल्या उत्तर प्रदेशातील बालिया जिल्हा निवडला. गेल्या ६० वर्षात केवळ १३ कोटी कुटुंबापर्यंत गॅस पोहोचला असे सांगतच पंतप्रधानांनी या योजनेमुळे पहिल्या वर्षातच दीड कोटी व तीन वर्षात पाच कोटी कुटुंबापर्यंत गॅस पोहोचेल असा विश्वास व्यक्त केला.

२०१६-१७ च्या केंद्रिय अंदाजपत्रकात गरीबाकरीता तरतुदी करण्यात आल्या त्यात घरातील महिलेच्या नावाने एल. पी. जी. कनेक्शनची योजना गरीबांच्या फायद्यासाठी २००० कोटीची तरतूद मनरेगासाठी ३८,५०० कोटीची तरतूद, आतापर्यंत सगळ्यात जास्त प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेसाठी १९ हजार कोटीची तरतूद ४०% राज्य सरकार आणि ६०% केंद्र सरकार देणार, ३ लाख रेशनच्या दुकानात स्वयंचलीत प्रणाली असणार अशा तरतूदी केंद्रिय अंदाजपत्रकात करण्यात आल्या आहेत.

**समारोप:**

बाराव्या पंचवार्षिक योजनेत जलद आणि सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर २०१६-१७ या केंद्रिय अंदाजपत्रकात शेती आणि ग्रामीण विकास विषयक तरतुदी वगळता, जलद आणि सर्वसमावेशक विकासासाठी इतर आवश्यक तरतूदीचा अभाव असल्याचे दिसते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात एल. पी. जी. गॅस सुविधा देण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद वगळता प्रत्यक्ष दारिद्र्य निर्मुलनासाठी कोणत्याही खर्चाची आणि नवीन योजनेची तरतूद या अंदाजपत्रकात केली नाही. औद्योगिक विकास, सामाजिक विकास, दारिद्र्य, बेकारी विषमता निर्मूलन, प्रशिक्षण, आरोग्य, पाणी, निवारा सुविधा विकास आणि वाढ घडवून आणण्याचा तरतुदीचा अभाव आहे.

जागतिकीकरण आणि आर्थिक उदारवादाचा धोरणामुळे आर्थिक विकासाचे वारे भारतात वाहू लागले शहराचा काया पालट झाला, मध्यम वर्गीयांची क्रयशक्ती वाढली. मॉल्सचा झगमगाट वाढला आणि याचा अर्थ इंडिया शायनिंग असा लावण्यात आला. मात्र उत्साहाचा जोर ओसरला तसतशी वस्तुस्थिती समजू लागली. आर्थिक विकासाचा लाभ हा समाजाच्या काही थरापर्यंत पोहचला आहे. जो विकास झाला आहे

तो समावेशक नाही हे कटू सत्य उलगडू लागले. हा सर्वसमावेशक विकास साधायचा तर खाजगीकरणाचा एककल्ली मार्ग अवलंबून चालणार नाही. त्यासाठी विचार ही सर्वकष करावयास हवा सरकारी योजना आणि मोहिमा या अनास्थेच्या शिकार होत असल्याने त्याचे लाभ लाभार्थींपर्यंत पोहचत नाहीत देशाच्या व मानव विकासात जे भेडसवणारे प्रश्न आहेत त्यात दारिद्र्याचा समावेश होतो.

गेल्या ६० वर्षापासून गरीबी हटाव हा नारा ऐकत आलो आहोत. हा नारा देणाऱ्याच्या हेतूवर मला शंका घ्यायची नाही पण त्यांनी यासाठी निवडलेला मार्ग चुकीचा होता. कारण गरीबी, बेरोजगारी आणि रोगराई वाढतच गेली आहे. सरकार श्रीमंतासाठी नसते, गरीबासाठी असते. समस्येचे शास्त्रीय कारण शोधत नाही तो पर्यंत गरीबी हटणार नाही. संतुलित विकास झाला पाहीजे आणि त्यांचा प्रत्येकालाच फायदा झाला पाहीजे गरीबी दूर करण्यासाठी जनतेने केंद्र सरकारला सहकार्य करणे आवश्यक आहे असे ओडीसाचा बालासोर येथे एका रॅलीला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) Misra Puri, *Indian Economy*, Himalaya Publishing House.
२) Datt & Sundharam, *Indian Economy* S. Chand, 2011
३) Report of the Expert Group to Review the Methodology for Estimation of Poverty, GOI.
४) Southern Economist - Volume 49 Aug. 1, 2010.
५) *अर्थसंवाद* - विविध अंक
६) दै. *दिव्य मराठी* दि. २२/०४/२०१३
७) दै. *पुण्यनगरी* दि. २१/०६/२०१५
८) दै. *लोकमत* दि. २९/०३/२०१६
९) दै. *सकाळ* दि. ०१/०३/२०१६
१०) दै. *महाराष्ट्र टाईम्स* दि. ०२/०५/२०१६
११) *सुराज्य* दि. २५/०३/२०१६
१२) दै. *लोकमत* दि. ०३/०६/२०१६


---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### निवेदन

चांदवड येथे ६ ते ८ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत आयोजित केलेल्या ४०व्या वार्षिक अधिवेशनासाठी प्राप्त झालेल्या शोधनिबंधांचा गोषवारा श्री.नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित कर्मवीर के.ह.आबड कला, श्रीमान मो. गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान महाविद्यालयामार्फत प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत समाविष्ट करण्यात येईल. तसेच प्रतिनिधींकडून आलेल्या सर्व शोधनिबंधांची सीडी देण्यात येईल.

-कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची कार्यप्रणाली

**मधुकर बाबूराव अनंतकवळस**, सातारा,
अर्थशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय.
मोबाईल नंबर : ९४२०६५९०५६
ई-मेल: madhukar.anantkawlas@gmail.com

महाराष्ट्र राज्यात शेतीचे सिंचनाखालील क्षेत्र हे फक्त १६% एवढेच आहे. तर ८४% शेत जमीनचे क्षेत्र हे कोरडवाहू म्हणजेच अवर्षणप्रवण व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणाची तीव्रता कमी करण्याच्या उद्देशाने काही बागायती फळबाग लागवड व कमी सिंचन क्षमतेवर येणाऱ्या फळबाग लागवडीची संकल्पना उदयास आली. फळबाग लागवडीतून शेती विकासाचे व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने असणारे महत्त्व लक्षात आले. त्यातूनच त्यांचा विकास व्हावा यासाठी त्यावेळी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी १९९० पासून महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेतून १००% अनुदानावर फळबाग लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरु केला. या योजनेच्या प्रोत्साहनातून महाराष्ट्र राज्य फलोत्पादनातील अग्रेसर राज्य म्हणून विकसित झाले. फळबागांच्या क्षेत्र विस्ताराबरोबर राज्यात फलोत्पादन पिकांच्या दर्जेदार उत्पादन, प्रक्रिया व्यवस्था व विक्री व्यवस्था उभी करणे गरजेचे झाले. यासाठी सरकारने विविध योजना सुरु केल्या त्यापैकी अधिक यशस्वी व फळबाग लागवडीस उपयुक्त ठरणारी अशी *राष्ट्रीय फलोत्पादन अभियान* ही योजना होय.

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचा आढावा:

फळबाग लागवड शेतकऱ्यांच्या अनेक समस्या व अडचणी लक्षात घेऊन व गरजेनुसार फळबाग लागवडीस वेग येण्यासाठी सरकारने ही योजना सुरु केली. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची सुरुवात ८ जुलै २००४ रोजी झाली. परंतु याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २००५-२००६ या वर्षापासून झाली. प्रथमत: १८ राज्ये व ४ केंद्रशासीत प्रदेशात ही योजना सुरु केली. त्यातील महाराष्ट्र हे एक राज्य होय. सुरुवातीस केंद्र सरकारने १००% अनुदानावर शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरु केली. त्यानंतर २००७ पासून राज्य सरकारांना

त्यात सहभागी करण्याविषयी योजना तयार केली. त्यामध्ये ८५% केंद्रसरकारचा वाटा व १५% राज्यसरकारचा हिस्सा अशा दोघांच्या समन्वयाने ही योजना सुरु करण्यात आली. फळबाग उत्पादन व विक्री बाबतच्या विविध अडचणी काळानुसार बदलत गेल्या त्यानुसार राज्य सरकारांचा हिस्सा वाढविण्यात आला. सन २०१४-१५ पासून केंद्र सरकारचा ५०% व राज्य सरकारचा ५०% वाटा असा समसमान हिस्सा करण्यात आला व त्यांच्या सहयोगाने अनुदान वितरित करण्यात येते.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ही योजना शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्कर्षासाठी सुरु करुन खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा हरितक्रांतीची चळवळ सुरु केली आहे. उत्पादकांपासून उपभोक्त्यांपर्यंत फलोत्पादन पिकांच्या मालाची योग्य साखळी निर्माण करणे आणि त्यामध्ये उत्पादक शेतकरी, काढणीनंतरचे व्यवस्थापन करणारी यंत्रणा, प्रक्रिया उद्योजक, विक्री व्यवस्था यांच्या विकासासाठी या अभियानात विविध योजनांचा समावेश आहे.

### शोधनिबंधाच्या मर्यादा:

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ही योजना केंद्रसरकार व राज्य सरकार यांच्या संयुक्त सहकार्याने विविध घटक राज्यात फळबाग लागवडीच्या वाढीसाठी, पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी सुरु आहे. यामध्ये प्रत्यक्ष लागवडीपासून, प्रक्रिया व बाजारपेठ याशिवाय विविध घटकांसाठी १९ योजना सुरु आहेत. या विविध योजनांपैकी क्षेत्रविस्तार म्हणजेच नवीन फळबाग लागवड व जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन ही एक होय. याच योजनेचा विचार सदर संशोधन पेपरमध्ये केला आहे. अभियानातील विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी काही मर्यादा असल्याने क्षेत्रविस्तार यांचाच विचार करुन शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत क्षेत्रविस्तार या योजनेची मांडणी करण्यासाठी पुढील उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

१. फळबाग लागवड क्षेत्रविस्ताराबाबतची कार्यपद्धती जाणून घेणे.

२. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे उद्देश व मापदंड जाणून घेणे.

३. अभियानामुळे फळबाग क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यातील बदलांचा आढावा घेणे.

४. अभियानांतर्गत होणाऱ्या आर्थिक तरतुदीचा आढावा घेणे.

### शोधनिबंधाची अभ्यासपद्धती :

सदर शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारलेला आहे. सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करताना आवश्यक त्या ठिकाणी आकडेवारी दर्शविताना निश्चित प्रमाण काढण्यासाठी योग्य त्या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान कार्याचा फळबाग लागवडीवर झालेल्या परिणामांचा यात विचार केला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासनाच्या कृषि मंत्रालयाच्या वतीने प्रकाशित केलेल्या माहितीचा व आकडेवारीचा वापर, विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके, बळीराजा, ॲग्रोवन आणि इंटरनेटचा वापर केलेला आहे.

### क्षेत्रविस्तार कार्यक्रमाची पार्श्वभूमी :

ग्रामीण भागात रोजगार निर्मितीच्या विविध योजना राबविल्या जात होत्या त्यामध्ये रोजगार हमी योजनेतून फळबाग कार्यक्रम होय.

या कार्यक्रमाद्वारे फळबाग क्षेत्राच्या वाढीसाठी चालना मिळून फळबागांचे क्षेत्र वाढण्यास मदत झाली. १९९१-९२ मध्ये फळबाग लागवड क्षेत्र २ लाख ५६ हजार हेक्टर एवढे होते तेच क्षेत्र अभियानानंतर १५ लाख ६५ हजार हेक्टर एवढे झाले. तसेच उत्पादनातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. फळबाग लागवडीबरोबर अधिक गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार उत्पादनासाठी काढणी पश्चात व्यवस्थापन, पणनसुविधा याकडे लक्ष देणे गरजेचे भासू लागले. त्यातूनच राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातील क्षेत्र विस्तार ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात सुरुवात झाली. यातून अशी जाणीव झाली की, क्षेत्र वाढीसाठी निवडलेले क्षेत्र पिक समूह आधारितच घेणे गरजेचे झाले.

क्षेत्रविस्तार कार्यक्रमातंर्गत नवीन फळबागेची लागवड करणे यात फळपिके, फुलपिके, मसालापिके, सुगंधी वनस्पती, मधुमक्षिका पालन, अळिंबी उत्पादन व आदर्श शेती पद्धती यांचा यात समावेश होतो. शेती विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी बहुवार्षिक पिकपद्धती गरजेची आहे. याच उद्देशाने राज्यात द्राक्षे, पेरु, आंबा घनलागवड, केळी, पपई, डाळिंब, स्ट्रॉबेरी यासारख्या फळपिकांची लागवड वाढविण्यास सुरुवात केली. त्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातंर्गत अनुदान उपलब्ध होते. यासाठी विविध फळपिकानुसार त्यांच्या लागवडीच्या अंतरानुसार, ठिबक सिंचन सहित व विरहीत अनुदान देण्याचे मापदंड निश्चित करुन लागवडीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर अनुदान देण्यात येते.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे उद्देशः

केंद्र सरकारने अभियानातंर्गत क्षेत्रविस्तारासाठी पुढील विविध उद्देश निश्चित केले आहेत.

१. क्षेत्रविस्तार घटकांमध्ये विविध फळपिकांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या सुधारित वाणांचा वापर करुन फळउत्पादकतेत वाढ करणे.

२. फळबाग लागवडीसाठी आवश्यक असणारी रोपे व बियाणे नामांकित व शासनमान्य रोपवाटिकेमधूनच पुरवून होणारी फसवणूक दूर करणे.

३. फळबाग लागवड ही विखुरलेल्या स्वरुपात होऊ न देता समूह आधारितच लागवड करुन एकमेकांच्या अनुभवाचा योग्य वापर व नियंत्रण करणे, जेणेकरुन होणारे संभाव्य नुकसान कमी करणे.

४) फळबाग लागवड झालेल्या भागामध्ये शेतकऱ्यांचे फळपिक निहाय गट/ समूह करुन जास्तीत जास्त अंतर्गत व बर्हिगत बचतीचे लाभ मिळवून देणे.

५) फळबाग लागवड शेती समूहाच्या सर्वंकष विकासासाठी सद्यस्थिती व भविष्यातील संधी याचा विचार करुन उत्पादन ते बाजारपेठ याबाबतचे प्रकल्प आराखडे तयार करणे.

६) उपलब्ध साधनसामुग्री विचारात घेऊन समूह आधारित विकास आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

या विविध उद्देशानुसार काढणीत्तर हाताळणीसाठी पायाभूत सुविधांची उभारणी करणे आवश्यक आहे. कारण एकूण फळबाग उत्पादनांपैकी योग्य हाताळणी व पुरेशा साठवणक्षमते अभावी ३०% पेक्षा अधिक उत्पादित मालाचे नुकसान होते यावर अभियानात

उपाययोजना करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे मापदंडः

बहुवार्षिक फळपिक लागवड व काही कमी कालावधीतील फळपीक, गरजेनुसार हवामानानुसार, लागवडीच्या अंतरानुसार, लागवड खर्चानुसार अनुदान वाटपाबाबतचे काही मापदंड ठरवून दिले आहेत. तसेच एकूण खर्चाएवढे अनुदान न देता शेतकऱ्यांनाही त्यात सहभागी होण्यासाठी एकूण खर्चाच्या ४०% अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. २०१४-१५ च्या सुधारित मापदंडानुसार एकूण लागवडीच्या अंतरानुसार व संख्येनुसार तसेच ठिबक सिंचन सहित व ठिबक सिंचन विरहीत असे मापदंड ठरवून दिले आहेत ते पुढील तक्ता क्र. १ मध्ये दिसून येते.

तक्ता क्र.१ मध्ये असे दिसून येते की, वेगवेगळ्या फळपिकांना वेगवेगळे अनुदान मिळते. काही फळपिकांसाठी ३ वर्षे अनुदान वाटप केले जाते तर काही साठी २ वर्षे व काहीसाठी १ वर्षेच दिले जाते हे वाटपाचे मापदंड बहुवार्षिक व कमी कालावधीतील फळ पिके व पूर्वीच्या मापदंडातही काही दुरुस्त्या व सुधारणा गरजेनुसार केलेल्या दिसून येतात. शेतकऱ्यांनी विविध निविष्टांसाठी १००% खर्च करावयाचा असून त्यापैकी प्रोत्साहन व मदत म्हणून खर्चाच्या ४०% एवढेच अनुदान सर्व अटींची पूर्तता केल्यानंतरच दिले जाते.

तक्ता क्र. १

फळपिक निहाय खर्च व अनुदान वाटप

(रक्कम - हेक्टरी रुपयात)

| अ. क्र. | फळपिक | वर्षे | प्रमाण | एकूण खर्च (हेक्टर) | अनुदान (४०%) हेक्टरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | द्राक्षे | ३ | ६०:२०:२० | २,१६,६५० | ८६,६६० |
| २ | आंबा | २ | ७५:२५ | ९०,८७५ | ३६,३५० |
| ३ | पेरु | २ | ७५:२५ | १,३१,७३० | ५२,६९२ |
| ४ | डाळिंब | ३ | ६०:२०:२० | १,०५,५४० | ४२,२१६ |
| ५ | पपई | २ | ७५:२५ | १,२०,०५५ | ४८,०२२ |
| ६ | केळी | २ | ७५:२५ | १,६०,८६२ | ६४,३४४ |
| ७ | स्ट्रॉबेरी | १ | १०० | २,१०,००० | ८४,००० |
| ८ | चिकू | ३ | ६०:२०:२० | ३७,००० | १४,८०० |
| ९ | संत्रा | ३ | ६०:२०:२० | ३५,३४० | १४,१३६ |

*संदर्भ : एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान - २०१४-१५*

**राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत क्षेत्र विस्तार कार्यक्रमाची कार्यपद्धती :**

अभियानातंर्गत फळबाग लागवडीसाठी अनुदान वाटप करताना काही मार्गदर्शक सूचना देते. त्यांच्या सुचनेत पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यास अनुदान वाटप केले जाते ती पद्धती पुढीलप्रमाणे:

१) लाभार्थी फळबाग शेतकऱ्यांची निवड करताना ज्याचे क्षेत्र सध्या अस्तित्वात असलेल्या पीक समुहाच्या क्षेत्रामध्ये आहे अशांना प्राधान्य देण्यात यावे. नवीन लागवड करु इच्छित असल्यास एका फळ पिकांसाठी एका गावात कमीत कमी १० हेक्टर क्षेत्रावर जुनी लागवड असणे आवश्यक आहे. तसेच लागवड ही समूह करणे गरजेचे आहे तसेच कुठल्याही फळ पिकासाठी बांधावरील लागवडीस अनुदान दिले जात नाही.

२) बहुवार्षिक फळबाग लागवडीस दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी जे लाभार्थी प्रत्येकी ७५% दुसऱ्या वर्षी व ९०%, तिसऱ्या वर्षी फळझाडे जिवंत ठेवतील तेच अनुदानास पात्र असतील.

३) फळबाग लागवड क्षेत्रविस्तार कार्यक्रम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसोबत संयुक्तपणे राबविण्यात यावी जेणेकरुन खड्डे खोदणे, कुंपन इ. च्या मजुरीवरील खर्च मग्रारोहयो योजनेमधून करता येईल व इतर उत्पादित घटकांसाठी अनुदान देता येईल की जेणेकरुन अनुदान वाटपाची पुनरावृत्ती टाळता येईल.

४) फळबाग लागवडीकरिता आवश्यक कलमे रोपे मानांकित असलेल्या शासकीय फळरोप-वाटिका, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र यासारख्या खात्रीच्या मार्गातून मिळवावीत. या संबंधित घटकांकडे उपलब्ध नसल्यास कृषि अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेऊन त्यांच्या नियंत्रणाखाली तयार केलेल्या त्यांच्या शिफारशीनुसार खाजगी नर्सरीतून खरेदी करावीत.

५) फळबाग ही बहुवार्षिक फळपिक असल्याने अधिक उत्पादन देणाऱ्या आधुनिक वाणांची निवड करावी.

६) समूह पद्धतीने शेतकऱ्यांचे स्वयंसहाय्यता गट तयार करुन त्यांना प्रकल्प आधारित कार्यक्रमाचा लाभ मिळू शकेल.

सन २०१५ पासून राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचा विस्तार वाढवून तो एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या नावाने सुरु केलेला आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून शेतकऱ्यांच्या लहान लहान समुहांची निवड करुन त्यांच्या गरजेवर आधारित प्रकल्प तयार करण्याचे निश्चित केले आहे.

समूह हा प्रत्येक फलोद्यान पीकनिहाय असून त्याचे क्षेत्र सलग असावे तसेच समुहासाठी तालुका हा घटक निश्चित करण्यात यावा, यासाठी जिल्हा अभियान समितीमध्ये मंजुरी देण्यात यावी. तसेच समूह प्रकल्पास दिलेल्या मंजुरी शेतकऱ्यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती देऊन त्यांना हार्टनेट या कार्यप्रणालीमार्फत संबंधित लाभार्थीस मुख्यालय स्तरावरुन अनुदान वितरित करण्यात येते.

**लाभार्थी निवडीच्या अटी:**

फळबाग लागवड शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळवून देताना अभियानातील संबंधित कृषि अधिकाऱ्यांनी पुढील अटींचे पालन करावे.

१) अभियान राबविताना अनुसूचित जाती जमातीच्या तसेच महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने

लाभ देण्यात यावा की जेणेकरुन त्यांनाही विकासाच्या प्रवाहात आणता येणे शक्य होईल.

२) लाभार्थी शेतकऱ्यांच्या नावे स्वतःची शेतजमीन असणे आवश्यक आहे. तसेच कायमस्वरुपी ओलिताची/पाणी पुरवठ्याची सोय असणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतःच्या जमीन मालकीचा ७/१२ उतारा आवश्यक आहे असे संमतीपत्रक अर्जासोबत सादर करावे लागते.

३) अभियानातर्गत कमीत कमी ०.२० हेक्टर क्षेत्र व जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत एका लाभधारकास लाभ देण्यात येतो.

४) इच्छुक शेतकऱ्यांस योजनेचा लाभ घेण्याकरिता योजनेच्या अटी व शर्ती मान्य असून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

५) योजनेअंतर्गत शासनाने ठरवून दिलेला खर्च प्रमाणके ही लाभार्थी शेतकऱ्यास मंजूर असतील व निश्चित केलेल्या खर्चापेक्षा अधिक खर्चाची जबाबदारी लाभधारक शेतकऱ्यांनी करावी लागेल असे लेखी संमती द्यावे लागते.

६) या योजनेमधून यापुर्वी लाभ घेतला असल्यास त्याच क्षेत्रासाठी पुन्हा लाभ घेता येत नाही.

७) लाभार्थीस अनुदानाची रक्कम त्याच्या हार्टनेट कार्यप्रणालीद्वारे बँकेत जमा होणार असल्याने त्यांचे राष्ट्रीयकृत किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते आवश्यक आहे तसेच अर्जासोबत खाते क्रमांक व इतर तपशील द्यावा लागतो.

८) फळबाग लागवडीसाठी ठिबक सिंचन असणे बंधनकारक आहे.

९) फळबाग लागवडीच्या बाबतीत केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही एकाच योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात येतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असून हा अर्ज करण्यासाठी *http://hartnet.gov.in/login.mah.aspx* या संकेतस्थळाचा वापर करावा. त्यास संमती त्याच पद्धतीने दिली जाते. यामध्ये तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्या मार्फतच मंजुरीचे काम चालते व त्यांच्या शिफारशीनेच अनुदान प्राप्त होते.

**अभियानांतर्गत महाराष्ट्रास वित्तीय मदत :**

अभियानातर्गत केंद्रसरकार व राज्य सरकारचा वाटा वेगवेगळ्या वेळेत बदलण्यात आलेला आहे. त्यानुसार त्याचे वाटप त्या त्या वर्षात करुन फळबाग लागवडीस प्रोत्साहीत केलेले दिसून येते ठरवून दिलेले लक्ष व प्रत्यक्ष झालेली मदत ही पुढील तक्ता क्र. २ वरुन दिसून येते.

तक्ता क्र.२ वरुन असे दिसून येते की, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत होणाऱ्या एकूण आर्थिक घटकांमध्ये विविधता दिसून येते तसेच एकूण ठरवून दिलेल्या लक्षांकापेक्षा प्रत्यक्ष होणारी मदत यातही तफावत दिसून येते. २००५-२००६ मध्ये लक्षांकापैकी ५१.२२% प्रत्यक्ष वाटप झाल्याचे दिसून येते. २००७-०८ मध्ये प्रत्यक्ष वाटपाचे प्रमाण ८५% पर्यंत गेल्याचे दिसते. २००८ ते २०१० या कालावधी कमी झाले याला नैसर्गिक प्रतिकूलता दिसून येते. या काळात उद्दिष्ट अधिक निश्चित केले परंतु प्रत्यक्ष वाटप कमी आढळते. त्यानंतर उद्दिष्ट ही अधिक व वाटपही अधिक दिसून येते. २०१३-१४ मध्ये हे प्रमाण ९५% पर्यंत गेल्याचे आढळते तर २०१४-१५ मध्ये हे प्रमाण ७९% पर्यंत दिसून येते. यावरुन

तक्ता क्र. २

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत वित्तीय मदत

(रक्कम कोटी रुपयात)

| अ.क्र. | वर्ष | एकूण लक्षांक | प्रत्यक्ष दिलेली रक्कम | एकूण लक्षांकापैकी दिलेल्या रक्कमेचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | १६१.२८ | ८२.६० | ५१.२२ |
| २ | २००६-०७ | २४४.४५ | १४४.९३ | ५९.२९ |
| ३ | २००७-०८ | २२२.६७ | १३२.२५ | ८४.९६ |
| ४ | २००८-०९ | २४१.७८ | १३०.२२ | ५३.८६ |
| ५ | २००९-१० | १६३.४८ | ९१.२३ | ५६.११ |
| ६ | २०१०-११ | १२७.१६ | १२६.१४ | ७५.४६ |
| ७ | २०११-१२ | १२९.१० | १०७.०४ | ८२.३९ |
| ८ | २०१२-१३ | १३६.०० | १२८.१९ | ९४.२६ |
| ९ | २०१३-१४ | १४४.५० | १३७.२३ | ९४.९७ |
| १० | २०१४-१५ | १५८.९५ | १२५.०० | ७८.६४ |

*संदर्भ : All India Progress Reports of NHM-2005-06 to 2014-15*

असे स्पष्ट होते की, सरकारने या अभियानामार्फत राज्यातील फलोत्पादन क्षेत्र वाढविण्यासाठी भरीव आर्थिक तरतुद केल्याचे दिसून येते व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणारी यंत्रणाही उभारल्याचे दिसते.

## महाराष्ट्रातील फळबागेचे एकूण क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता :

महाराष्ट्र राज्याचे अनुकूल हवामान व सरकारच्या विविध योजनांमुळे राज्य फळबाग लागवडीसाठी आघाडीवर आहे. महाराष्ट्रात विविध प्रकारची फळबाग लागवड वाढत आहे. त्यातून फळबागेचे एकूण क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढते आहे त्याची स्थिती तक्ता क्र.३ वरुन दिसून येते.

तक्ता क्र.३ वरुन स्पष्ट होते की, सन १९९१-९२ पासून २०१३-१४ पर्यंत फळबागेचे एकूण क्षेत्र २.५६ लाख हेक्टर वरुन १५.६५ लाख हेक्टर पर्यंत वाढलेले दिसून येते. तसेच उत्पादनही २०१२-१३ वर्ष वगळता याच काळात ३५.१८ लाख मेट्रिक टनावरुन १३४.०० लाख मेट्रिक टनापर्यंत वाढल्याचे दिसून येते. उत्पादन काही वर्षी कमी दिसण्याचे कारण म्हणजे नैसर्गिक प्रतिकुलतेचा परिणाम होय. संगणकीय मदतीने सांख्यिकीय घटकांचे पृथ्थकरण केल्याने सरासरी ही २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीत १५५२.७५ एवढी दिसून येते. प्रमाण विचलन १२.४४ एवढा दिसून येतो. तशीच स्थिती टेबलवरुन उत्पादन व उत्पादकतेच्या संदर्भातही दिसते. यावरुन राज्यात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ

तक्ता क्र. ३

महाराष्ट्रातील फळबागेची स्थिती

(क्षेत्र '००० हेक्टर, उत्पादन - '००० मेट्रिक टन, उत्पादकता - मे टन/ हेक्टरी)

| अ.क्र. | वर्ष | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
|---|---|---|---|---|
| १ | १९९१-९२ | २५६.१ | ३५१८.४ | १३.७ |
| २ | २००१-०२ | ५८२.८ | ८८४०.६ | १५.२ |
| ३ | २०१०-११ | १५३७ | ९५१३.० | ६.२ |
| ४ | २०११-१२ | १५६० | १०५३८.४ | ६.८ |
| ५ | २०१२-१३ | १५४९ | ८४१३ | ६.३ |
| ६ | २०१३-१४ | १५६५ | १३४५७ | ८.६ |
| सरासरी | | १५५२.७५ | १०४८०.६ | ६.९७ |
| प्रमाण विचलन | | १२.४४६५ | २१६६.२६ | १.११ |
| वाढीचा दर | | ०.००६०३ | ०.१२२५८ | ०.११ |

संदर्भ : *Indian Horticulture Database- 2015*

टीप : संख्याशास्त्रीय निष्कर्ष हे २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीतील आहेत.

शेतकऱ्यांना झालेला असून त्याचे अनुकूल पडसाद फळबाग लागवड क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेवर आढळून येतात.

**निष्कर्ष:**

सदर शोधनिबंधात वरील विविध घटकांच्या स्पष्टीकरणातून महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामार्फत विविध फळपिकांचा समावेश करण्यात येऊन त्यांच्या फळप्रकारानुसार लागवड अंतरानुसार, कलमी रोपांच्या संख्येनुसार ठिंबक सिंचन सहित घटकांनुसार शेतकऱ्यास मिळणारे अनुदान एकूण खर्चाच्या ४०% एवढे अनुदान वाटप होत आहे.

२) ग्रामीण भागात शेतकऱ्यांमध्ये विचारांची, अनुभवांची देवाणघेवाण व्हावी यासाठी समूह किंवा गट शेती पद्धतीस प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातर्गत भूमिका पार पाडली जाते.

३) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामुळे शेतकऱ्यांना आधुनिक वाणांची लागवड करण्यास व उत्पादन वाढून बाजारपेठ मिळण्यास मदत झाली आहे.

४) शेतकऱ्यांना अनुदानांची रक्कम फळपिक लागवडीनुसार त्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने योग्य त्या कारणांसाठीच त्याचा वापर होतो.

५) फळपिकांचे मापदंड निश्चित केल्याने गरजू शेतकरीच यात सहभागी होऊन योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होते.

६)केंद्र व राज्य सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने कृषी विभागास लक्षांक ठरवून दिल्याने

योजना यशस्वितेसाठी आवश्यक फंड मिळून कृषि अधिकाऱ्यांच्या दक्षतेमुळे फलनिष्पत्ती पाहावयास मिळत आहे.

७) काही फळबाग लागवड डोंगर उतारावर, निसर्गावर अवलंबून व पडिक जमिनीत करता आल्याने अशा पडिक जमिनीच्या वापरातूनही शेतकऱ्यांचे उत्पन्न व पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होत आहे.

बदलत्या काळानुसार शेतीक्षेत्रासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत यातून मार्ग काढण्यासाठी शेतकरी फलोत्पादन क्षेत्राकडे वळल्याने शेतीत क्रांतीकारक बदल झाले. त्याला शासनाच्या विविध योजनांची जोड मिळाल्याने आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक वाण, काढणीपश्चात व्यवस्थापन, प्रक्रिया व विक्री व्यवस्था निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे.

## संदर्भसूची :

१) देशमुख पी. पी., *भारतातील फळबाग लागवड,* १९८१, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

२) पाटील ए. व्ही. आणि करळे ए. आर., *महाराष्ट्र फळझाडे',* द्वितीय आवृत्ती, १९९७, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

३) *एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान - मार्गदर्शन सूचना* २०१४-१५ पुणे - ५

४)Gov. of India, *Indian Horticulture Database 2014-15,* Natioanl Horiculture Board, Ministry of Agriculture.

5) *Horticultural Development Programme : EGS linked Horticultural Development Program 1992,* YASHADA, Pune.

6) *Annual Plan of Action under National Horitculture Mission* (2005-06), Govt. of Maharashtra, Mumbai.

7) Govt. of India, *National Horitculture Mission, Guidelines* 2010,2015, Dept. of Agriculture & Co-operation, New Delhi.

Website :

1) http://www.mahanhm.gov.in

2) http://www.nhm.nic.in

3)http://homet.gov.in / login.mha.aspx

4) http://nhb.gov.in

5) http://midh.gov.in

# शेतकऱ्यांची आत्महत्या: एक समस्या

**जयश्री दिलीप भंगाळे,** भुसावळ,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
दादासाहेब दे. ना. भोळे महाविद्यालय, जिल्हा जळगाव.
ई-मेल : jayshri68@rediffmail.com
भ्रमणध्वनी : ९४२३९७५७२०

सध्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय फार गंभीर बनला आहे म्हणूनच तो चिंतनीय सुध्दा ठरला आहे. एकीकडे जागतिकीकरणाचे धोरण गतिमान बनवून विदेशी गुतवणुकदारांसाठी अर्थव्यवस्था खुली करतांना व विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांमुळे सेन्सेक्स वधारत असतांना दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाणही वाढत आहे ही एक प्रकारची विसंगती आहे. आपल्या आर्थिक विकास प्रक्रीयेत ती एक शोकांतिका आहे.

मुख्यमंत्री फडणवीस सरकारपुढे या वर्षभरात सर्वात मोठे आव्हान होते व आहे ते म्हणजे निम्म्या महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ आणि नापिकी. कर्जबाजारीपणाला कंटाळून गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या. त्यासाठी विरोधी पक्षांनी संपूर्ण कर्जमाफीची मागणी केली, मात्र सरकारने कर्ज माफी न करता रिलीफ फंड जाहीर केला. रु. ३४ हजार ५०० कोटींचा आराखडा जाहीर करण्यात आला. त्यातून शेतकऱ्यांच्या हाती काही तात्काळ मदत मिळाली नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच राहिल्या आजही होत आहेतच.

१९९५ पासून नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो हे शेतकरी आत्महत्यांची नोंद ठेवते याचा अर्थ असा नाही की त्याआधी आत्महत्या होत नव्हत्या, मात्र १९९० नंतर शेतकरी आत्महत्येची वाढती संख्या आणि प्रमाण यामुळे नोंदी ठेवण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात विदर्भ हे शेतकरी आत्महत्येचे केंद्र. मात्र मागील दोन वर्षामध्ये मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या करण्यास सुरुवात केली आहे. १९९० पर्यंत असेच काहीसे हरीत क्रांतीच्या पहिल्या टप्प्यातील पंजाब, हरयाणा, पश्चिम उत्तर प्रदेशसारख्या प्रदेशांमध्ये शेतकरी आत्महत्येची नोंद होत होती. मात्र १९९० नंतर देशाच्या इतर भागातही आत्महत्येचे सत्र सुरु झाले. २०१४ पर्यंत देशभरात तब्बल ३ लाख २० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी जीवन

संपवल्याचे आकडेवारी सांगते. जम्मू-काश्मीर आणि नॉर्थ इस्ट सोडता शेतकरी आत्महत्या झाल्या नाही असा कुठलाच भाग नाही. आधी केवळ अल्पभूधारक शेतकरी आत्महत्या करीत असल्याची परिस्थिती होती मात्र आता सर्वच प्रकारचे लहान, मध्यम, मोठे शेतकरी आणि शेतमजूर देखील आत्महत्या करीत असल्याचे आकडेवारी सांगते.

जुलै २०१५ पर्यंत मान्सूनने ओढ दिल्यानंतर वर्धा जिल्ह्यातील ७ शेतकऱ्यांनी सरकारकडे आत्महत्या करण्याची रितसर परवानगी मागितली, वडसा गावातील ही घटना होती. यामध्ये तीन महिला आणि चार पुरुष यांचा समावेश होता. स्थानिक आणि जिल्हा प्रशासनाने त्यांना रितसर पोच दिली. डिसेंबर २०१५ मध्ये मुख्यमंत्र्यांनी १०,५१२ कोटीच्या पॅकेजची घोषणा केली. यामध्ये अर्थातच 'कर्जमुक्त' च्या मुद्याचा समावेश नव्हता यानंतर लगेचच विशाल पवार

तक्ता क्र. १

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या

| वर्ष | आत्महत्याग्रस्त शेतकरी |
|---|---|
| २००१ | ६२ |
| २००२ | १२२ |
| २००३ | १८० |
| २००४ | ६४० |
| २००५ | ६०१ |
| २००६ | २३७६ |
| २००७ | २०७६ |
| २००८ | १९६६ |
| २००९ | १६०५ |
| २०१० | १७४१ |
| २०११ | १५१८ |
| २०१२ | १४७३ |
| २०१३ | १२९७ |
| २०१४ | १६११ |
| २०१५ | २५३० |

या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्याने आत्महत्या केली, त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी संजय राठोड यांच्याकडे पीक हाताशी न आल्यामुळे वाढलेल्या बोजाचा उल्लेख केला व अंतिम इच्छा म्हणून 'कर्जमुक्ती' ची मागणी केली. सरकारी मिशनच्या प्रमुखपदी समितीचे प्रमुख किशोर तिवारी यांची नेमणूक करण्यात आली त्यांच्या मतातील तथ्य तक्ता क्र.१ मधील आकडेवारीवर लक्षात येते.

सन २०१५ मध्ये ऑक्टोबर २०१५ पर्यंत २,५३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. विभागनिहाय विचार केला तर नाशिक विभागात ३५० आत्महत्या झाल्या. औरंगाबाद विभागात ८९३ आत्महत्या झाल्या. तर अमरावती विभागात ९८७ आत्महत्या झाल्या.

२०१५ वर्षात उद्भवलेल्या स्थितीत १५,७४७ दुष्काळामुळे बाधीत झालेल्या खेड्यांची संख्या आहे. ५३.१९ लाख बाधीत शेतकऱ्यांची संख्या आहे. ८२ लाख पीक विमा योजनेचे लाभार्थी शेतकरी संख्या आहे. ३३,००० खणल्या जाणाऱ्या विहिरी आहेत.

या आपत्तीवर मात करण्यासाठी रु.१०,१५२ कोटीचे पॅकेज राज्य सरकारने मंजूर करुन घेतले आहे.

शेतकरी आत्महत्या ही काही भारताच्या शेती क्षेत्रातील केवळ एक घडामोड नसून ती देशातील संपूर्ण शेती क्षेत्र हेच धोक्यात आल्याचे निदर्शक आहे. महाराष्ट्र, तेलंगणासह आंध्र प्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये एकुण आत्महत्येपैकी ९०% आत्महत्या झालेल्या आहेत. एकूण आत्महत्यांपैकी ४५% म्हणजे जवळ जवळ निम्म्या आत्महत्या या एकट्या महाराष्ट्रातच झाल्याचे भीषण वास्तव आहे.

२०१४ मध्ये ६,७१० शेतमजुरांनी आत्महत्या केलेल्या एनसीआरबीचा अहवाल सांगतो. मात्र या वर्षात शेतमालकांची आत्महत्या शून्य दाखविण्यात आली आहे. स्वयंरोजगार म्हणजे शेतमजुरांच्या आत्महत्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत २४५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. त्यामुळे शेतकरी मरत नाही तर शेतमजूर आत्महत्या करीत आहेत. असे काही भासवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. १९४७-४८ मध्ये जीडीपीमध्ये शेतीचा वाटा हा ५५% होता. तर शेतीत सहभागी असणाऱ्यांची संख्या ७५% होती. ३० कोटी लोकसंख्या ७५% लोक शेतीवर अवलंबून आणि जीडीपीतील वाटा ५५% ही १९४७ ची परिस्थिती २०१५ मध्ये देशाची लोकसंख्या १३० कोटी असतांना जीडीपीमधील शेतीचा वाटा १५% शेतीवर अवलंबून लोकसंख्या ५५% आहे. आकडेवारी पाहिल्यास ७५ टक्क्यावरुन ही संख्या आता ५५ टक्के झाली असे वाटू शकते. मात्र लोकसंख्या देखील ३० कोटीवरुन १३० कोटीवर पोहोचली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे एवढे सगळे होऊन देखील भारत हा एक अत्यंत गरीब देश कसा राहतो याचे उत्तर मिळते.

एनएसएसओ आणि सोशयो इकॉनॉमीक कास्ट सेन्सस मधील देशातील एकूण घरांच्या आकडेवारीत तफावत आहे. देशातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या ठरवतांना आधी अर्बनची व्याख्या करण्यात येते. ज्या गावाची लोकसंख्या पाच हजारापेक्षा जास्त आहे, लोकसंख्येची घनता चारशे आणि पंचाहत्तर टक्के पुरुष हे शेतीबाह्य रोजगारात असणे म्हणजे अशा गावांना अर्बन

समजले जाते. देशातील ग्रामीण भागातील १७% कुटुंबापैकी ३०% लोकांनी शेती हे त्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन असल्याचे म्हटले आहे. तर ५१.४% लोकांनी शेतीशी संबंधीत अनियमित स्वरुपाच्या रोजगारावर चरितार्थ आधारित असल्याचे म्हटले आहे तर ५४ ते ५६% लोक हे भुमिहीन आहेत हे वास्तव लक्षात घेतल्यास देशभरात तातडीने जमीन सुधारणा करण्याची स्वामीनाथन समितीने केलेली शिफारस किती महत्वाची आहे हे लक्षात येते. ५६% लोकांकडे जमिनीच नाही, तर त्या लोकांकडे मिळेल ती शेतमजुरी करण्याशिवाय अन्य काय उपाय उरतो.

२००२ ते २०१२ हा दहा वर्षाचा कालावधी भारतीय शेतीसाठी सुवर्णकाळ मानला जातो. १९९१ ते १९९८ या मुक्त आर्थिक धोरणानंतरच्या सात वर्षामध्ये जीडीपी दर हा प्रतिवर्षी ५.४९% दराने वाढतो तर याच काळात शेती वृध्दी दर हा केवळ २.७३% प्रतीवर्ष असा आहे. याच दहा वर्षात शेती उत्पादनांची जागतिक पातळीवर झालेली दरवाढ हे ग्रामीण भारतासाठी चांगला काळ असण्याचे दुसरे कारण आहे. किंमत आणि मजुरी या दोन्ही गोष्टी ज्यावेळी दरवाढीपेक्षा जास्त असतात त्यावेळी गरीबी कमी होण्यास मदत होते.

देशभरात ज्याप्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्या प्रमाणात केरळ आणि तामिळनाडू या दोन राज्यामध्ये होतांना दिसत नाही त्याचे कारण म्हणजे केरळमध्ये १४ लाख कुटूंब आहेत. ज्यापैकी २७% कुटूंब ही ग्रामीण आहेत. यापैकी ३९% जनतेचा उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत हा शेती आहे. त्यापैकी ३४% रक्कम ही शेतीतून तर उर्वरित रक्कम ही शेतीशी संबंधित अन्य मार्गातून येते. महाराष्ट्रात ७० लाख घरे आहेत, त्यापैकी ५६% कुटूंब ग्रामीण आहेत. त्यापैकी ५९% उत्पन्न हे शेतीतून येते हीच आकडेवारी देशपातळीवर पाहिल्यास ९०% कुटूंब आहेत. त्यापैकी ५७% ग्रामीण आहेत, त्यापैकी ६८% जनतेचा शेती हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. याचाच अर्थ ग्रामीण भारतातील शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट होत आहे. मागील २० वर्षामध्ये एकूण नवीन सुरु झालेल्या फॅक्टरीपैकी ७०% फॅक्टरी या ग्रामीण भागात सुरु झालेल्या आहेत. ग्रामीण भागात शेतीखेरीज इतर उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची खरी गरज आहे. कृषी उत्पन्नात आता आहे त्यापेक्षा अधिक वाढ करणे कठीण आहे. शेतमालाचा भाव वाढवून दिला तरी तो ग्राहकांना त्या किंमतीत खरेदी करण शक्य नसल्यास लोक बाहेरच्या देशातून निर्यात केलेल्या मालाला प्राधान्य देतील. त्यामुळे बिगरशेती उद्योग ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वाढविण्याची गरज आहे. केवळ दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनाच्या योजना यासाठी पुरेशा नाहीत. प्रक्रीया उद्योगासाठी ग्रामीण भागाला प्राधान्य देण्याची गरज आहे.

उपाय:

१) परवानाधारक सावकारांकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज शासनातर्फे सावकाराला देऊन शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. राज्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून १ एप्रिल २०१४ ते ३० नोव्हेंबर २०१४ या कालावधीत घेतलेले रु. १५६.११ कोटीचे कर्ज आणि त्यावर ९% व्याजदाराने रु.१५.१९ कोटी असे एकुण रु. १७१.३० कोटी थकीत आहे. त्या थकीत कर्जाची

परतफेड राज्य सरकार सावकारांना करणार असल्याची घोषणा करण्यात आली.

२०१४ च्या पावसाळ्यात अत्यल्प पाऊस पडल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याचा निर्णय दिनांक १० एप्रिल २०१५ रोजी शासनाच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत घेण्यात आला. मात्र सावकार हा महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार परवानाधारक असणे आवश्यक आहे. या पध्दतीने सावकारी कर्जमुक्ती होऊ शकते. त्यानुसार कर्जमाफीसाठी उपनिबंधक व सहाय्यक निबंधकांकडे प्राप्त होणाऱ्या कर्जमाफीच्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समित्यांची नियुक्ती करण्यात आली.

या कर्जमुक्तीसाठी पात्रतेचे निकष जाहीर करण्यात आले आहेत.

१. योजनेनुसार कर्जदार सातबाराधारक शेतकरी असणे आवश्यक आहे.
२. शेतकऱ्याऐवजी त्याच्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने कर्ज घेतले असल्यास तो व्यक्ती या योजनेस पात्र ठरेल.
३. कुटूंब या शब्दांचा अर्थ पत्नी, आई-वडील, मुलगा, अविवाहीत मुलगी व सून असा करण्यात आला आहे.
४. सावकार कर्जमुक्ती योजनेकरीता कुटुंबातील एकच व्यक्ती पात्र ठरणार आहे.
५. नोंदणीकृत सावकाराने त्याच्या परवान्यात नमूद केलेल्या क्षेत्राच्या बाहेरील व्यक्तीस दिलेले कर्ज या योजनेत पात्र असणार नाही.
६. पगारदार, निवृत्तीवेतनधारक व मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम (१९४८) नुसार परवानाधारक व्यक्ती या योजनेस पात्र ठरणार नाही.
७. पगारदार निवृत्तीवेतनधारक व मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम नुसार परवानाधारक व्यक्ती या योजनेस पात्र ठरणार नाही.

सावकाराने शेतकऱ्यांना दिलेले कर्ज व व्याजाचा तपशील संबंधित सहकार अधिकाऱ्यांकडे सादर केल्यानंतर कर्जदार व्यक्तीला शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र तलाठ्याकडून द्यावे लागले. शेतकऱ्याऐवजी त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांनी कर्ज घेतले असेल तर त्याला शिधापत्रिकेची छायाप्रत सादर करावी लागेल. तालुका स्तरावरील तहसिलदार सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक आणि उपनिबंधक यांचा समावेश असलेली समिती प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन ते प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस सादर करणार आहे.

२) शुन्य आत्महत्या अभियान :

अवकाळी पाऊस शेतीला होणारा मर्यादित अर्थपुरवठा, बाजारात कृषी विषयक उत्पादनांवर मिळणारा अपुरा भाव या सर्व बाबींचा विचार करीत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्राला कलंक आहे आणि समस्याग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनाने १४ एप्रिल २०१५ रोजी शुन्य आत्महत्या अभियानाची घोषणा केली. महसूल विभागातर्फे आत्महत्याग्रस्त भागात कुटुंबनिहाय सर्वेक्षणाला लवकरच प्रारंभ होणार

असून वार्षिक उत्पन्नापेक्षा खूप जास्त प्रमाणात कर्ज घेतलेले कुटूंब, कोरडवाहू शेतीशिवाय उत्पन्नाचे अन्य कोणतेही साधन नसलेले कुटूंब, गंभीर आजारी असलेला सदस्य, अल्प शेती असलेला पण व्यसनात अडकेलेले कुटूंब अशा बाबींवर या सर्वेक्षणात भर देण्यात येणार आहे.

अभियानाचे स्वरुप :

१. आत्महत्याप्रवण गावातील प्रत्येक घरापर्यंत पोचणे.
२. कर्ज, आजारपण, मालकीची जमीन सिंचन, लग्नयोग्य मुलांची माहिती घेणे.
३. शेतीच्या जोडव्यवसायासाठी प्रोत्साहन देणे.
४. प्रत्येक कुटुंबाचे समुपदेशन करणे.
५. आर्थिक मदत देणाऱ्या पर्यायी योजना तयार करणे.
६. कर्जफेडीसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करुन देणे.
७. *कनव्हर्जन्स ऑफ ॲग्रिकल्चर इंटरव्हेन्शन इन ॲग्रिकल्चर* असे या अभियानाचे नाव असेल. आत्महत्याग्रस्त प्रत्येक गावासाठी रु. ५० लाखाची तर गावाचे गट तयार करुन त्यासाठी रु. १० कोटीची मदत निश्चित करण्यात येणार आहे.
८. रु. १ हजार कोटी खर्चाची तरतूद असलेल्या या योजनेत (अतिमानसिक ताण) डिस्ट्रेसची पातळी तीव्र वाटल्यास अधिक आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे.

आत्महत्याग्रस्त क्षेत्रातील पतपुरवठा व्यवस्थेचाही अभ्यास करण्यात आला आहे. विदर्भात जिल्हा सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे वसूली प्रमाण अत्यल्प म्हणजे केवळ ३९% असून मराठवाड्यात हे प्रमाण ४८% आहे. थकबाकीदार शेतकरी कुटुंबे ही चिंताग्रस्त परिस्थितीतून जात असून त्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या फेररचनेबाबतच जोड व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहनही दिले पाहिले, त्याच बरोबर शेतकऱ्यांचे समुपदेशन करणेही गरजेचे आहे.

थोडक्यात शून्य आत्महत्या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविधांगी मदत उपलब्ध करुन देऊन त्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करण्याच्या सरकारी उपक्रमाची पुरेशा गांभीर्याने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३) शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी निरनिराळे उपाय प्रभावीपणे योजण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सर्व प्रथम विपणन व्यवस्था भक्कम केली पाहिजे. विपणन व्यवस्थेतील शेतकऱ्यांचे स्थान मजबूत केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. बाजारातील दलाल, व्यापारी व अडते या मध्यस्थांचा बाजारात सहभाग असल्याने शेतकऱ्यांच्या मालाला अल्प भाव मिळतो. यासाठी शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

४) सिंचन सोई अपुऱ्या असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहाते. शेतकऱ्यांचे उत्पन्न मर्यादित राहून आर्थिक समस्यांना त्याला तोड द्यावे लागले. भारतातील ४०% क्षेत्र सिंचनाखाली आहे तर महाराष्ट्रभर हे प्रमाण जवळपास १६% इतके आहे म्हणजेच राज्यातील बारमाही पाणी पुरवठ्याखालील जमीन वाढविण्याची गरज आहे. जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण करण्यावर भर दिला

पाहिजे. सामान्यपणे तुषार सिंचनामुळे ३० ते ३५% पाणी वापराची बचत होते. शेतकऱ्यांना जल व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. तसेच स्वस्त अखंड व पुरेसा वीज पुरवठा उपलब्ध होण्याची गरज आहे.

५) शेतीत नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढावा म्हणून ई-चौपाल पध्दतीचा विस्तार केला पाहिजे. ई-चौपाल या प्रतिमानानुसार ई-चौपालामध्ये म्हणजे दालनामध्ये शेतकऱ्यांना सर्व उपयुक्त माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी वेबसाईट निर्माण केल्या आहेत. आतापर्यंत आय.टी.सी.या संस्थेने ५५०० ई-चौपालांची स्थापना केली आहे. या पध्दतीनुसार गावातील संचालक म्हणून ठरविल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या घरी संगणक बसवून त्याव्दारे गावातील सर्वांना ई-चौपाल सेवा पुरविली जाते.

६) शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी कंत्राटी शेतीला उत्तेजन दिले पाहिजे. शेतमालाचा उत्पादक आणि खरेदीदार यांच्यामध्ये कराराप्रमाणे उत्पादन व पुरवठा करण्याची व्यवस्था म्हणजे कंत्राटी शेती होय.

याशिवाय शेतकऱ्यांची आत्महत्या मानसिक दुर्बलतेतूनही होत असल्याचे मत अनेक तज्ज्ञांनी मांडले आहे. यासाठी प्रत्येक गावात एक समुपदेशन केंद्र चालविण्याची आवश्यकता आहे. कर्ज बाजारीपणा, दारिद्र्य, निसर्गाचा फटका इत्यादी कारणांनी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या समस्यातून मार्ग काढण्यासाठी अशी केंद्र उपयुक्त ठरु शकतील. अशी केंद्रे शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन करतील. यामुळे त्यांना मानसिक आधार मिळेल व आत्महत्येच्या विचारांना प्रतिरोध होऊ शकेल.

## संदर्भग्रंथ सूची:


१) नरेंद्र लांजेवार, *शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय*

२) ॲडमिरल विष्णू भागवत, *जागतिकीकरण नवीन गुलामगिरी*

३) डॉ. देसाई, डॉ. सौ. भालेराव, *भारतीय अर्थ व्यवस्था*

४) अर्थशास्त्र विश्वकोश

५) Economic & Political Weekly, Feb. 2014

६) योजना अंक, ऑक्टोबर २०१४

७) विजय कुजीर, द युनिक संस्थेतील 'फ्रायडे फ्रंटलाईन' मधील शब्दांकन.



हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे व उपाययोजना

**सुरेश एकनाथ घुमटकर, बीड,**
पिताजी विवेक अपार्टमेंट, ए-११, बार्शीरोड.
भ्रमणध्वनी: ९४०५४६५६१७
ईमेल: gumatkarsuresh@gmail.com.

भारतीय अर्थव्यवस्था आजही कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून संबोधली जाते. कारण आजही भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ६३ टक्के जनता उदरनिर्वाहासाठी कृषी आणि संलग्नित व्यवसायावर अवलंबून आहे. तर एकूण कार्यकारी लोकसंख्येपैकी ५४ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या कृषी व संलग्नित क्षेत्रात कार्यरत आहेत तरीही कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जो १९५१-५२ मध्ये ५० टक्क्यांच्या वर होता तो आता २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार १४ टक्केच आहे. विकासाच्या सिध्दांतानुसारही उत्पन्नाच्या वाट्यातील घट चांगली बाब असली तर यातून कृषीवर आधारित लोकांकडील उत्पन्नात वाढ न होता इतर क्षेत्रातील लोकांच्या उत्पन्नात वाढ होवून आर्थिक विषमतेत वाढ झाली.

१९४२-४३ मध्ये योजना समितीच्या एका बैठकीतील चर्चेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषी क्षेत्रासंदर्भात पुढील विचार मांडलेले आहेत. *शेती हा आजचा मुख्य व्यवसाय आहे व तो दीर्घकाळ चालू राहणार आहे. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून भांडवली गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी व शेती फायदेशीर करण्यासाठी देशातील उद्योगांचा सर्वांगिण विकास करणे महत्वाचे आहे. वाढत्या औद्यागिकीकरण मधूनच शेती व उद्योगांचा समतोल विकास होईल. शेतीकडील लोकसंख्येचा भार कमी झाल्यामुळे जमिनीचा आकार वाढेल, त्यातून दरडोई उत्पन्न वाढेल, बचत वाढेल, गुंतवणूक वाढेल व शेवटी ग्रामीण भागात दरडोई उत्पन्न वाढेल.*

भारतात मात्र स्वातंत्र्य काळात महालनोबीस प्रतिमानाचा वापर करून

भांडवलप्रधान तंत्रज्ञानाचा वापरू करून औद्योगिकीकरण झाल्यामुळे औद्योगिक क्षेत्राच्या विकासाबरोबर त्यामध्ये रोजगारनिर्मिती होवू शकली नाही आणि परिणामतः शेतीवरील अवलंबीत लोकांचे प्रमाण आवश्यक त्या प्रमाणात कमी होवू शकले नाही. शेतीकडे आवश्यक त्या प्रमाणात भारतीय सरकारने लक्ष दिले नसल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती स्वातंत्र्यपूर्व काळ आणि पेशवे काळापेक्षा फार काही सुधारली नाही. आज महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करू लागला आहे.

महात्मा फुलेंच्या मते देशाचे प्रमुख तीन आधारस्तंभ असतात ते म्हणजे देशातील शेतकरी, देशातील सैनिक आणि देशातील प्रशासक वर्ग. सैनिक आणि देशातील प्रशासक वर्गास वेतन मिळत असल्यामुळे त्यांची स्थिती चांगली असते. परंतु शेतकऱ्यांच्या उत्पादनाची अनिश्चितता आणि त्याच्या अडाणीपणामुळे त्यासोबत होणारा भ्रष्टाचार यामुळे त्याची परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे.

भारतातील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे विषद करून महात्मा जोतिबा फुले यांनी शेतकऱ्यास दारिद्र्यातून बाहेर येण्यासाठी सर्वच पातळीवरील उपाययोजना सुचविलेल्या आहेत. आजही फुलेंनी सांगितलेल्या कारणांपैकी बरीच कारणे शेतकऱ्यांच्या आजच्या दुर्दशेस कारणीभूत आहेत आणि त्यांनी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सर्वच पातळीवर करण्यात आल्या तर आज होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतात. त्यामुळे आजच्या शेतकऱ्यांच्या मराठवाड्यातील आत्महत्या या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महात्मा फुलेंच्या विचारांचा एक आढावा घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.

### मराठवाड्यातील शेतकऱ्यांची स्थिती :

मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक विभाग असून तो आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मागास समजला जातो. मराठवाड्यात २०१२-१३ ते २०१५-१६ या चार वर्षांच्या कालावधीत भीषण दुष्काळ पडलेला आहे. अगोदरच कमी पर्जन्य छायेचा प्रदेश समजल्या जाणाऱ्या या भागात सततच्या दुष्काळामुळे कृषी उत्पादन काहीही न झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केलेल्या आहेत आणि अजूनही करीत आहेत.

राष्ट्रीय गणना नोंदणी ब्युरो (NCRB) ने २०१४ ला प्रकाशित झालेला आकडेवारीमध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक २५६८ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून मृत्यूला कवटाळले असून हे प्रमाण देशातील अन्य राज्यातील शेतकरी आत्महत्येच्या तुलनेत ४५.५ टक्के आहे. म्हणजे देशात शेतकरी आत्महत्येमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सततचा दुष्काळ, नापिकी, उत्पादनात घट, वाढता कर्जाचा डोंगर अशा अनेक कारणांमुळे सन २०१४ ला १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तर १३ डिसेंबर २०१५ पर्यंत २९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या जिल्ह्यात तालुका निहाय बीड-५१, गेवराई-५१, केज-५०, अंबेजोगाई-२०, धारूर-२१, शिरूर कासार-१९, परळी-१८, आष्टी-१६, माजलगाव-१४, पाटोदा-१४, वडवणी-१२ या प्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. अशीच परिस्थिती मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांचीही आहे.

तक्ता क्र. १

ब्रिटीश राजवटीच्या भारतातील एकूण महसुलातील भूमी कर

| कालावधी | भूमी कर सरासरी वार्षिक महसुल | भूमी कराचे एकूण महसुलाशी गुणोत्तर (टक्के) |
|---|---|---|
| १८०२-०३ ते १८०६-०७ | ४५८२००० | ३१.९१ |
| १८०७-०८ ते १८११-१२ | ५०७८००० | ३१.६८ |
| १८१७-१८ ते १८२१-२२ | १३२६३००० | ६६.१७ |
| १८२२-२३ ते १८२६-२७ | १३५६७००० | ६१.८३ |
| १८२७-२८ ते १८३१-३२ | १३११२००० | ६०.९१ |
| १८३२-३३ ते १८३६-३७ | ११९४२००० | ५७.०० |
| १८३७-३८ ते १८४१-४२ | १२३८०००० | ५९.०५ |
| १८४२-४३ ते १८४६-४७ | १३४३२००० | ५५.८५ |
| १८४७-४८ ते १८५१-५२ | १४९४७००० | ५६.०६ |
| १८५२-५३ ते १८५५-५६ | १६१८३००० | ५५.४० |
| १८०२-०३ ते १८५५-५६ | ११८४८६००० | ५४.००% |

### सरकारी धोरणांचा आढावा :

ब्रिटीशपूर्व काळात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या संस्थानिकांचा महसूल कृषीवरील करावरच आधारित होता परंतु दुष्काळ, महापूर, रोगराई इत्यादी संकटकालीन परिस्थितीत शेतकऱ्यांवर शेतसाऱ्यात सवलत मिळत असे. परंतु ब्रिटीश राजवटीत शेतसाऱ्याच्या दरात वाढ केली गेली आणि आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना कुठल्याही सवलती न देता सक्तीने शेतसारा गोळा केला जायचा त्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होऊन तो कर्जबाजारी होउन दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला. ब्रिटीश सरकारच्या काळात एकूण सरकारी महसुलाच्या भूमीच्या कराचे प्रमाण या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एम.ए. पदवीसाठी सादर केलेल्या लेखात आकडेवारी दिलेली आहे.

वरील आकडेवारीवरून लक्षात येते की सर्वात जास्त आणि अर्ध्यापेक्षा जास्त सरकारचा महसूल भूमी करातूनच वसूल केला जात होता. सरासरी ५४% कर महसूल भूमी करापासून ब्रिटीश सरकार शेतकऱ्यांकडून घेत होते.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भूमी आणि कृषी उत्पादनावरील कर भारत सरकारने रद्द केला असला तरी सर्व दृष्टीकोनातून कृषीची आणि शेतकऱ्यांची झालेली हानी भरून काढण्यासाठी कृषीमध्ये ज्याप्रमाणात सुधारणा आणि सरकारी गुंतवणूक करायला पाहिजे होती तेवढी होवू शकली नाही.

### सुशिक्षितपणाचा अभाव :

ब्रिटीशपूर्व कालखंडात आणि ब्रिटीश काळातही भारतातील शेती करणाऱ्या वर्गास शिक्षणाचा अधिकार नव्हता. शिक्षण ही

ब्राम्हणांची मक्तेदारी होती. शिक्षणाची द्वारे बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची मुले इतर क्षेत्रात आणि नोकरीमध्ये जाऊ शकत नव्हती. तेंव्हा शेतकऱ्यांच्या मुलांना पदवीपर्यंत कार्यकुशलता निर्माण करणारे शिक्षण सक्तीने देण्यात यावे अशी भूमिका फुलेंनी मांडली होती. भारतात स्वातंत्र्य मिळाल्यापासून ६९ वर्षे होवून गेलीत तरीही अजून २५ टक्के पेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा कायदा आता भारत सरकारने केला असला तरी एकूण सुशिक्षितांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण ११ टक्के पर्यंतच आहे. त्यातही बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. सारख्या तोकड्या अभ्यासक्रमातूनच शेतकऱ्यांची मुले पदवी पूर्ण करून बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ करीत आहेत. बी.ए.च्या एकूण विद्यार्थी संख्येपैकी ९५ टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी शेतकरी आणि शेतमजुरांची आहेत. परंतु या पदवीस सर्व सामाजिक विषयांचा आणि गणित विषयाचा अभ्यासक्रम करण्याची सोय नसून मराठवाड्यात पूर्णवेळ प्राध्यापक त्यांना शिकविण्यासाठी नसल्या कारणाने त्यांच्या ज्ञानाची आणि गुणवत्तेची जी सुधारणा होवून रोजगार निर्मिती व्हायला पाहीजे ती होत नाही. आणि बेरोजगारीत वाढ होवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात पाल्याकडून जी वाढ व्हायला पाहीजे ती होत नसते.

### शेतकऱ्यांची अंधश्रध्दाळू प्रवृत्ती:

महाराष्ट्रातील शेतकरी धर्मभोळा आणि कमालीचा अंधश्रध्दाळू आहे. भट-ब्राम्हणांनी स्वतःच्या फायद्यासाठी तयार करून ठेवलेल्या, देवाची भीती दाखविण्यासाठी केलेल्या पोथी-पुराणाच्या मांडणीतून दिवसेंदिवस चालीरीति आणि रूढीपरंपराच्या नावाखाली शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात आणि दळणवळणाच्या सोयी-सुविधा उपलब्ध असताना भारतातील ग्रामीण भागातील शेतकरी-शेतमजूर दोन-दोन महीने पाय तुडवित पैसा आणि वित्त वाया घालवून रस्त्याने घाणीचे साम्राज्य निर्माण करत पंढरपूरची यात्रा करतो, गणपती उत्सव दूर्गा उत्सव, शारदा उत्सव, दिपावलीतील फटाक्यांची आतषबाजी इत्यादीवर व्यर्थ वेळ आणि पैसा खर्च करून स्वतःच्या नुकसानासह पर्यावरणाचाही समतोल बिघडवितो. शेतकऱ्यांनी याच दिवसांचा चांगला उपयोग करून स्वतःच्या शेतात हिवरेबाजार आणि राळेगणसिध्दी या गावांच्या धर्तीवर सुधारणा करायला पाहीजे आणि कर्मावर विश्वास ठेवून अंधश्रध्देपासून दूर झाले पाहिजे. फुले म्हणतात शेतकरी जन्माला येण्यापूर्वी पासून ते मेल्यावर सुध्दा त्याच्या आप्तेष्टांकडून आणि मुलांकडून वेगवेगळ्या विधीच्या नावाने भट-ब्राह्मण त्यांना व्यर्थ खर्च करायला लावून पैसे उपटतात. या काळात तरी शेतकऱ्यांनी वास्तवादी राहून ह्या कर्मावर विश्वास ठेवून वर्तन करायला पाहीजे आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या सत्यशोधक समाजाच्या तत्वाने वागायला पाहीजे.

### नेते मंडळीचे राजकारण आणि नोकरशहा वर्गाचा भ्रष्टाचार:

ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात ब्रिटीश सरकार हे पूर्णतः शिकलेल्या भटब्राह्मण या नोकरदार वर्गावर आणि त्यांनी केलेल्या सुचनांवर विश्वास ठेवून कार्य करीत होते. हा वर्ग मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून शेतकऱ्यांना त्यांच्या कामासाठी नाडत होता. सिंचनाच्या सुविधा योग्य प्रमाणात उपलब्ध न करता पाणी मिळत नसतांनाही

शेतकऱ्यांकडून पाणीपट्टीचे पैसे उकळले जायचे आजही भारतात सिंचीत क्षेत्राचे प्रमाण ४० टक्के पेक्षा कमी आहे. महाराष्ट्राची परिस्थिती जास्तच दयनिय आहे. महाराष्ट्रात केवळ १७ टक्केच शेती सिंचीत आहे आणि ते प्रमाण पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनामुळे एवढे आहे. वास्तवात मराठवाड्याची परिस्थिती या बाबत जास्तच दयनिय आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार २००१ ते २०११ या काळामधील महाराष्ट्रात ६८००० कोटी रुपये सिंचनासाठी खर्च केलेले आहेत मात्र सिंचीत क्षेत्रामध्ये केवळ ०.१ टक्केनेच वाढ झालेली आहे. नंतरच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये ही माहिती प्रकाशितच केलेली नाही.

ब्राम्हणेतर शेतकरी वर्गातील लोक नोकरीत गेल्यावर त्यांच्या बांधवांसोबत भ्रष्टाचार करणार नाहीत आणि त्यांना नाडणार नाहीत. अशी अपेक्षा फुलेंना होती. मात्र आजही नोकरदार वर्गाकडून पूर्वीप्रमाणेच वर्तन होत आहे. त्यामुळे ग्रामिण भागात शेतकऱ्यासाठीच्या योजनांची योग्यरित्या कार्यवाही होत नाही. आलेला पैसा नेतेमंडळी आणि नोकरदार वर्गाच्याच घशात जाऊन शेतकरी मात्र जसा आहे तसाच राहतो.

### महात्मा फुलेंनी शेती आणि शेतकरी संदर्भात केलेल्या सुचना :

सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपीयन शेतकऱ्यांसारखे विद्यादान देऊन त्यासाठी यंत्रांची उपलब्धता करून द्यावी. शेतीमध्ये शेणखत आणि सेंद्रीय खतांची उपलब्धता निर्माण करून त्यासाठी गायी-बैलांची कत्तल थांबवावी. एकंदर डोंगर पर्वतावरील गवत झाडाच्या पान फुलांचे व मेलेले किटक श्वापदाच्या, मांसहाडांचे कुजलेले सत्व, वळवाच्या पावसाने धुवून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढ्या खेड्यात वाया जाऊ नये, म्हणून आमच्या उद्योगी सरकारने सोयीसोयीने काळ्यागोऱ्या नाली वजा बंधारे अशा रितीने बांधावे की, वळवाचे पाणी एकंदर शेतातून मुरून नंतर नदीनाल्यास मिळावे. असे केल्याने शेते फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायास हवेशीर जागेत उद्योग करण्याची सवय लागण्याबरोबर त्यास रोगराईची बाधा न होता ते बळकट होतील. त्यांनी दररोज एक आणा किंमतीचे जरी इमाने इतबारे काम केले, तरी सालदरसाल पंचवीस लक्षांच्या वर सरकारी स्थावर मालमत्तेत भर पडणार आहे. सरकारने एकंदर सर्व डोंगर टेकड्यामधील दऱ्याखोऱ्यांनी तलावातली, जितकी होतील तितक्या सोयी सोयीने बांधून काढावित म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्यामोड्यांनी भर उन्हाळयात पाणी असल्यामुळे जागोजाग लहानमोठी धरणे भरून एकंदर सर्व विहीरीस पाण्याचा पुरवठा होऊन, त्यांच्यापासून सर्व ठिकाणी बागायती होऊन शेतकऱ्यांसहीत सरकारचा फायदा होणार आहे. एकंदर सर्वशेते धुवून त्यामध्ये खोगळ्या पडू नयेत, म्हणून सरकारने शेतकऱ्यांपासून पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर असलेल्या ताली दुरूस्त ठेवाव्यात.

या पध्दतीने पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश महात्मा फुलेंने दिलेले आहेत. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील मौजे राळेगणसिध्दी आणि हिवरेबाजार या दोन गावात या प्रमाणे लोकसहभागातून जल नियोजनाची कामे करून गावांचा व शेतकऱ्यांचा विकास झालेला आहे. तेथील एकाही शेतकऱ्याने अलिकडच्या काळात

आत्महत्या केली असे उदाहरण नाही.

**सारांश :**

भारतातील शेतकऱ्यांच्या दारीद्र्य पणाच्या कारणांवर महात्मा फुले यांनी सर्वांगीण चर्चा त्यांच्या प्रसिद्ध *शेतकऱ्यांचा आसूड* या ग्रंथात केलेली आहे. त्यामध्ये भ्रष्टाचार, सरकारची चुकीची धोरणे, शेतकऱ्यांचा अंधविश्वास आणि धर्मभोळेपणा, त्यांची कर्ज काढून उत्सव करण्याची चुकीची प्रवृत्ती, अशिक्षितपणा आणि शिक्षणाबद्दलची चुकीची धोरणे इत्यादी कारणांची मिमांसा करून त्यामध्ये सुधारणा केल्यास आणि जलसिंचनाच्या सोयी सुविधामध्ये वाढ करून पाण्याचे जतन व जमिनीचे जतन करण्यासाठी सुचविलेल्या उपायोजना केल्यास त्यासाठी सरकार फुकट पोसत असलेल्या सैनिकांना या कामी लावून नियोजन केले तर शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा होईल असे नमूद केलेले आहे. परंतु स्वातंत्र्य मिळाल्या नंतरही भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्र सरकारने आणि शेतकरी समाजाने महात्मा फुलेंच्या सुचनांचे पालन आणि उपायोजना न केल्याने आज मराठवाड्यातील आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :**


१) गौरवदत्त व आश्विनी महाजन (२०११) *Indian Economy,* S. Chand & Company Ltd., Ram Nagar New Delhi.

२) डॉक्टर सुखदेव थोरात (२००५) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान,* सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. पृ. ३४,३५.

३) महात्मा ज्योतीबा फुले, १८८३, पुनर्मुद्रण २०१०, *शेतकऱ्यांचा आसुड,* कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

४) *www.ncrb.nic.in,* National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs (India).

५) डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, १९१५, *इस्ट इंडिया कंपनी,* रोडगे प्रकाशन, डॉ. आंबेडकर कॉलनी, नागपुर - पृ. ७,८,१५.

६) एस.ई. घुमटकर, १२ एप्रिल २०१६, महात्मा फुलेंच्या देशातील बेरोजगारी निर्माण करणारी उच्च शिक्षण पद्धती, दै. झुंजार नेता, पृ. ०४.

७) *महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल,* २०११-१२.

८) बाळासाहेब वाघ, *ग्राम विकासाची पाऊल वाट राळेगणसिद्धी,* मिडीया सेंटर, राळेगणसिद्धी.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार

**दीपक डी. शेलार, चिंचणी,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
पी.एल.श्रॉफ कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. डहाणू जि. पालघर
भ्रमणध्वनी : ९८९०००७९०४
ई-मेल:deepakshelar@gmail.com

नामवंत अर्थतज्ज्ञ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, एक यशस्वी व कर्तृत्ववान बॅरिस्टर, कुशल व धुरंदर राजकारणी, खरे समाजसेवक व देशभक्त, देशातील गरीबांचे म्हणजेच दलितांचे कैवारी, उच्च विद्याविभुषित अशा विविध बिरुदावलींनी नटलेले परिपूर्ण आणि एकमेव भारतीय व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. भिमराव रामजी आंबेडकर होय. गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारसरणीचा पगडा आंबेडकरांवर होता. अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या प्रभावामुळेच आंबेडकरांच्या जीवनाला आणि विचारांना एक दैदीप्यमान प्रकाशदिशा प्राप्त झाली. विद्याप्रेमी आणि विद्या अभ्यासक असलेल्या आंबेडकरांनी राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, प्रशासनपद्धती इ. विषयांचा सखोल अभ्यास केला, इतकेच नव्हे तर धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान आणि नितीशास्त्राचाही त्यांनी सखोल अभ्यास केला. अशा प्रगल्भ अभ्यासातून आंबेडकरांची विचारसरणी अधिकाधिक विकसित झाली. भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता म्हणूनच त्यांना *भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार* असे आदराने संबोधले जाते. आंबेडकरांच्या एकूणच कार्याची आणि सामाजिक चळवळींची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना *भारतरत्न* या सर्वोच्च पुरस्काराने सम्मानित केले.

भारतात आर्थिक विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळा म्हणजे भारतातील जातीयता, धार्मिक विषमता आणि त्यामुळे निर्माण होणारी आर्थिक विषमता होय, असे आंबेडकरांचे ठाम मत होते. *हिंदू समाज ही जातीची सोयिस्कर*

*व्यवस्था नसून प्रत्येक जात ही युद्धाकरिता उभी ठाकलेली जातीय सेना आहे व प्रत्येक सैन्य हे आपल्या जातीच्या हिताकरिता आणि सामर्थ्याकरिता झटत आहे असे दिसून येते. जातियतेमुळे सामाजिकतेची जाणीव मरुन गेली आहे.* जातीयता म्हणजेच मानवतेला लाजवणारा या देशावरील एक कलंक आणि हा कलंक जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत देशाचा सर्वांगिण विकास होणे केवळ अशक्य आहे असे प्रखर विचार आंबेडकरांनी मांडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचे कैवारी होते, असे म्हणणे म्हणजे त्यांचा आणि त्यांच्या कार्याचा अपमान आहे. देशातील प्रत्येक शोषित व पिडीत व्यक्तीचा विकास झाला पाहिजे या विचारांनी ते झपाटलेले होते. देशामध्ये सामाजिक समता आणि आर्थिक समता प्रस्थापित करणे हा त्यांच्या चळवळीचा मूलगाभा होता. सामाजिक विषमता ही चार्तुवर्णाची निर्मिती आहे म्हणून चार्तुवर्ण नष्ट केले पाहिजेत हा आंबेडकरांचा दृष्टिकोन होता. समाजातील आर्थिक विषमता नष्ट केल्याशिवाय गरिबांचे, कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे हित साधले जाणार नाही याची आंबेडकरांना पूर्ण जाणिव होती. १९२९ च्या एप्रिल महिन्यात चिपळूण येथे रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी सवर्ण हिंदू आणि अस्पृश्य व इत्तर सर्व जातीधर्माच्या लोकांना उद्देशून सांगितले की, *तुम्ही आपली गुलामगिरी स्वतःच नष्ट केली पाहिजे. स्वाभिमान हा मनुष्याच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. स्वाभिमानाशिवाय माणसाचे जिणे शून्य आहे. माझा संगर हा समाजातील सर्व दीन दुबळयांचा आणि दडपलेल्यांच्या उद्धारासाठी आणि विकासासाठी आहे.*

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. डॉ. आंबेडकर यांच्या शेती विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. डॉ. आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता तपासणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक असामान्य, चतुरस्त्र व बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, प्रशासन अशा विविध क्षेत्रातील त्यांचे ज्ञान आणि त्यांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय असली तरी ते मुलतः अर्थतज्ज्ञ होते. अर्थशास्त्र या विषयाची त्यांना अधिक आवड होती म्हणूनच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी १९१५ साली एम.ए. आणि १९१७ साली पीएच्.डी. पदवी अर्थशास्त्र या विषयामध्ये प्राप्त केली. १९२१ साली लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेमधून डॉ.आंबेडकरांनी *डॉक्टर ऑफ सायन्स* ही सर्वोच्च पदवी अर्थशास्त्र या विषयामध्येच प्राप्त केली. अर्थशास्त्राचे उच्च शिक्षण घेत असतांना त्यांनी अर्थशास्त्रावर वेगवेगळे प्रखर विचार मांडले असून अर्थशास्त्रावरील वेगवेगळे मौलिक ग्रंथ लिहिले आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधातुन आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा व प्रामुख्याने त्यांनी आपल्या लेखनातुन शेती विषयक मांडलेल्या विविध विचारांचा आढावा घेण्यात आलेला असून आजच्या बदललेल्या काळात या विचारांची उपयुक्तता या बाबत विश्लेषण केले आहे.

**आंबेडकरांचा खोती पद्धती विरुद्धचा लढा:**

गावातील सर्वच शेतकरी वर्ग, कष्टकरी

वर्ग यांची एका विशिष्ट पद्धतीने केली जाणारी पिळवणूक म्हणजे कोकणातील *खोती पद्धती* होय. या पद्धतीनुसार सर्व भूधारकांकडून शेतसारा गोळा करून त्यातील काही भाग शासन तिजोरीत जमा करण्याचे काम *खोत* या व्यक्तिकडे असे. खोत हा भूधारकांवर सर्व प्रकारची जोरजबरदस्ती व जुलूम करीत असे. खोत पद्धतीतील *वेठबिगार* म्हणजे अक्षरश: गुलामगिरी असे. गावातील प्रत्येक रहिवाशाला खोत सांगेल त्यादिवशी खोताच्या घरी अथवा जमिनीत विनामेहनताना मजुरी करावी लागत होती. वेठबिगार मजुरी काही ठिकाणी वर्षातील आठ दिवस तर काही ठिकाणी वर्षातून साठ दिवस प्रत्येक माणसी भरावी लागत असे. ज्या कुळाला वेठीसाठी बोलवावयाचे आहे त्याच्या घरासमोर सूर्य उगवण्यापूर्वी खोताचा सोटा ठेवला जात होता. सदर वेठ नाकारल्यास दुप्पट वेठ, जमिनीतून काढून टाकणे, घर तोडणे, वाळित टाकणे अशा भयंकर शिक्षा खोताकडून दिल्या जात असे. बाबासाहेबांनी कोकणातील खोती पद्धती नष्ट करण्याच्या चळवळीचा पाया १९२९ रोजी रत्नागिरी येथे रोवला. खोती पद्धतीचा अंत करून भुधारकांच्या रक्तशोषणाला मूठमाती देण्याचा आंबेडकरांचा निर्धार होता. यासाठी आंबेडकरांनी वेगवेगळ्या चळवळी उभारल्या. १७ सप्टेंबर १९३७ रोजी आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धती नष्ट करण्याविषयी विधेयक मांडले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच या चळवळीला यश मिळाले व खोतपद्धती नष्ट झाली. आंबेडकरांचे खोती अंताचे विधेयक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील देशात करण्यात आलेल्या जमीन सुधारणाविषयी कायद्याचा प्रारंभ होय असेच म्हणता येईल.

**जमिनीचे धारणक्षेत्र आणि जमिनीची उत्पादकता:**

जमिनीचे लहानलहान तुकडे का होतात? लहानलहान तुकड्यांचा शेतीच्या उत्पन्नावर कोणता परिणाम होतो? त्याचा प्रतिबंध कसा करावा? या विषयावर आंबेडकरांनी एक प्रबंध लिहिला. 'इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' च्या जरनलमध्ये १९३८ साली हा प्रबंध प्रसिद्ध झाला. वारसाहक्क कायद्यामुळे जमीनीचे तुकडे होत आहेत, त्यामुळे ते कसवणुकीस नुकसानकारक आणि बीनकिफायतशीर बनतात. या लहानलहान तुकड्यांचे एकत्रिकरण केल्यास जमिनीची उत्पादनक्षमता वाढेल या विचारांशी आंबेडकर सहमत नव्हते.

आंबेडकर हे शेती व्यवसायाला *उद्योग* असे संबोधतात. त्यांच्या मतानुसार उद्योग दोन प्रकारचे असतात. १. प्रमुख उद्योग २. दुय्यम उद्योग. शेती व्यवसाय हा देशातील प्रमुख उद्योग असून या उद्योगाला विशेष प्राधान्याची गरज आहे. बाबासाहेबांच्या मते शेतीची उत्पादकता ही जमिनीच्या आकारमानावर अवलंबून नसून त्या जमिनीवर वापरण्यात येणाऱ्या उत्पादनांवर अवलंबून असते.

आंबेडकरांच्या मतानुसार, भारतामध्ये वारसा हक्क कायद्यामुळे जमीनीचे तुकडीकरण होत नसून जमिनीवरील लोकसंख्येचा भार वाढत असल्यामुळे जमिनीचे तुकडीकरण होत आहे. दुय्यम उद्योगात रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्यामुळे नाईलाजास्तव जमीनीचा लहानसा तुकडा आपल्याकडे असावा अशी लोकांची धारणा असते. उपजिविकेसाठी शेती केली जाते म्हणून ती किफायतशीर नाही. रोजगारासाठी दुय्यम उद्योगात संधी मिळाल्यास लोक लहानलहान

तुकडे कसण्याचे सोडून देतील. एका दिशेला देशातील दुय्यम उद्योग वाढ व दुसऱ्या दिशेला शेती क्षेत्रामध्ये गुंतवणुकित वाढ केल्यास शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊन शेतीची उत्पादकता निश्चितपणे वाढेल. आंबेडकरांच्या मते, शेतीची उत्पादकता शेतीच्या आकारमानावर अवलंबून नसते तर त्या जमिनीवर केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीवर आणि इतर आदानांवर अवलंबून असते. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीच्या धारणक्षेत्राचा विचार न करता शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. भारतातील हरितक्रांतीला मिळालेले यश हे आंबेडकरांच्या या विचारसरणीवरच आधारित होते. आहे त्या जमिनीवर सुधारीत बी-बियाण्यांचा वापर, योग्य पाणी व खतांचा वापर केल्यामुळेच देशात हरितक्रांती घडून आली.

**आंबेडकरांचे सहकारी शेती विषयक विचार:**

धारणक्षेत्राचे लहान आकारमान या मुंबई राज्यातील शेतीव्यवसायाला भेडसावणाऱ्या समस्येचे निराकरण करण्यासाठी ऑक्टोबर १९२७ मध्ये श्री. अँडरसन यांनी एक विधेयक मांडले. या विधेयकानुसार लहान आकारमानाची समस्या सोडविण्यासाठी दोन शिफारशी करण्यात आल्या. १. स्थावर मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण. २. एकसंघ धारणक्षेत्राची विक्री.

आंबेडकरांनी अँडरसनच्या या विधेयकावर कडाडून टीका केली, त्यांच्यामते या विधेयकाचा स्वीकार केल्यास वारसा हक्काचा अधिकार धोक्यात येईल. वारसा हक्क कायद्यामुळे प्रत्येक मुलाला वडिलांच्या मालमत्तेतून समान हिस्सा मिळतो आणि उपजीविकेचे इतर साधन नसल्यास मिळेल त्या जमिनीच्या लहानशा तुकड्यावर उदरनिर्वाह करता येतो. या विधेयकामुळे शेतीवर अवलंबून असणारे असंख्य लोक भूमीहीन होतील, त्यांचे दारिद्र्य अधिक वाढेल. तसेच या विधेयकानुसार एका विशिष्ट आकाराच्या धारणक्षेत्रापेक्षा कमी धारणक्षेत्र कसणाऱ्या शेतकऱ्यास शिक्षेची तरतुद होती. आंबेडकरांच्या मते या धोरणामुळे छोट्या शेतकऱ्यांना नाईलाजास्तव आपल्या जमिनी मोठ्या शेतकऱ्यांना विकाव्या लागतील. परिणामत: छोटे शेतकरी सक्तिने भूमिहीन शेतमजूर होतील. त्यामुळे समाजातील दारिद्र्य आणि बेरोजगारीचे प्रमाण वाढेल व आर्थिक विषमतेला खतपाणी मिळेल.

आंबेडकरांनी विखुरलेल्या लहान धारणक्षेत्राची समस्या सोडविण्यासाठी तसेच शेतीची उत्पादकता वाढीसाठी सहकारी शेतीचा उपाय सूचविला आहे. त्यांच्या मतानुसार, एका विशिष्ट आकाराची सहकारी शेती अस्तित्वात आल्यास वरील समस्या दूर करता येईल आणि छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवरील हक्क अबाधित राहील. परस्परांना लागून असलेल्या जमिनी जोडल्याशिवाय कसण्याची मुभा मिळणार नाही अशी तरतुद करून सहकारी शेती यशस्वी करता येईल. म्हणजेच सहकारी शेती जशी मोठ्या आकारमानाची असेल तसेच ती एकसंघही असेल.

**आंबेडकरांचे सामुदायिक शेतीविषयी विचार:**

आंबेडकर हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते, तसेच ते राजकिय लोकशाही बरोबरच आर्थिक लोकशाहीचा आग्रह करीत. आंबेडकरांच्या

मतानुसार, आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक क्षेत्रामध्ये सरकारचा हस्तक्षेप अत्यावश्यक आहे. सरकारचा हस्तक्षेप व नियंत्रण नसल्यास खाजगी उद्योजक फक्त नफ्याचा विचार करून उत्पादन करतील, ज्यामुळे साधनसंपत्तीचा अवाजवी गैरवापर होण्याबरोबरच कामगारांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होईल. आर्थिक लोकशाही आणि सरकारचा हस्तक्षेप या अनुषंगाने शेतीविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामुदायिक शेती म्हणजेच शेतीची संकल्पना मांडली.

आंबेडकरांच्या मते शेती हा *शासकीय उद्योग* असला पहिजे. मूलभूत उद्योग ज्याप्रमाणे सरकाराच्या मालकीचे आहेत, त्याचप्रमाणे जमिनीच्या मालकाला योग्य मोबदला देऊन सर्व जमीन सरकारच्या मालकीच्या झाल्यावर सरकारने विशिष्ट आकारात विभागणी करावी. या जमिनीवर सरकारने तयार केलेल्या अधिनियम आणि मार्गदर्शक तत्त्वानुसार शेतकऱ्यांना शेत कसण्यास द्यावे. या जमिनीवर कोणीही कुळ शेतमालक किंवा शेतमजूर असणार नाही. जात आणि तत्सम बाबींचा विचार न करता गावातील सर्वांना सामुदायिक शेतीमध्ये समाविष्ट करावे. शेती उत्पादनाचा काही हिस्सा शासनाचा भाग म्हणून वगळून उर्वरित सर्व शेतमालाचे गावकऱ्यांमध्ये समान वाटप करावे. सरकारच्या सामुदायिक शेती प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांवर सरकारने कठोर कारवाई करावी अशा प्रकारची शिफारस आंबेडकरांनी केली होती. आंबेडकरांनी सामुदायिक शेती या योजनेला शासकीय समाजवाद असे संबोधले होते.

**आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांची वर्तमानकालिन उपयुक्तता:**

आज शेती क्षेत्रासमोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. भांडवलाची कमतरता, कर्जबाजारीपणा आणि निसर्गाची अवकृपा या विविध संकटामुळे शेतकरी राजा हलाखीचे दिवस जगत आहे. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी ७५ वर्षापूर्वी मांडलेली सहकारी शेतीची तसेच सरकारी किंवा सामुदायिक शेतीची कल्पना किती कल्पक स्वरूपाची होती तसेच ती आजसुद्धा कशी उपयुक्त आहे याची प्रचिती येते.

आज समाजात एका दिशेला अतिश्रीमंत शेतकरी तर दुसऱ्या दिशेला गरीब शेतकरी व भूमीहीन शेतमजूर अशी प्रचंड आर्थिक विषमता दिसून येते. आंबेडकरांच्या शेती एक सरकारी उद्योग संकल्पनेमुळे समाजातील आर्थिक विषमता सहजपणे नष्ट झाली असती.

गरीब शेतकरी कर्जबाजारीपणामुळे तसेच इतर आपत्तींमुळे नैराश्यपोटी आत्महत्या करीत आहे. मागील दहा वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्रातील दररोज किमान १० शेतकरी आत्महत्या करीत आहे. सन २००४ ते २०१३ दरम्यान महाराष्ट्रातील जवळजवळ ३७००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही स्थिती महाराष्ट्रासाठी अत्यंत लज्जास्पद व लाजिरवाणी आहे. आंबेडकरांनी सूचविलेली लोकशाही समाजवाद आणि सामुदायिक शेती योजनेमुळे शेतकऱ्यांची विपन्नावस्था निश्चितपणे दूर झाली असती. जमिनीचे मालक सरकार म्हणजे सर्व समाज असल्यामुळे जमिनीमध्ये बऱ्याच सुधारणा करणे शक्य झाले असते. परिणामी शेतकरी वर्गावर आत्महत्या करण्याची नामुष्की आली

नसती.

जलद औद्योगिकीकरण हे शेती समस्येवरील एकमेव औषध आहे असे आंबेडकरांचे मत आजही खरे आहे. देशाचा आर्थिक विकास होत असला तरी विकसाचा दर अतिशय मंद आहे त्यामुळे औद्योगिकीकरणाचा दर कमी आहे, रोजगार संधी कमी, परिणामी शेतीवरील लोकसंख्येचा भार फारसा कमी झालेला नाही. सामुदायिक शेती व जलद औद्योगिकीकरण हेच शेतीच्या विकासाचे साधन आहे. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आजही पूर्णपणे उपयुक्त आहे हे निश्चित.

**संदर्भग्रंथ सूची:**


१. अधिकारी चंद्रकांत (दलितमित्र) जुलै १९९९, *खोती विरुद्धचा लढा*, मानगाव रायगड प्रकाशन.

२. जाधव नरेंद्र, मे२०१३, *लसावि माझ्या समग्र अभिव्यक्तिचा*, ग्रंथाली प्रकाशन.

३. मुणगेकर भालचंद्र, एप्रिल १९९१, *डॉ. आंबेडकर यांचे शेती विषयक विचार,* नॅशनल सेमिनार ऑन द लाइफ, मिशन, कॉंट्रीब्युशन अँड रिलेव्हन्स ऑफ डॉ. बी. आर. आंबेडकर.

४. *http/psainath.org/Maharashtra-crosses-6000-farm suicide*

५. *http/ruralindiaonline.org.*


## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## पर्यटन विशेषांक

***अर्थसंवादः जानेवारी-मार्च २०१७*** हा **पर्यटन विशेषांक** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ७ ते १० पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे **दि.१० फेब्रुवारी २०१७** पर्यंत पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे. विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत- १) पर्यटनक्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम २) भारतीय पर्यटनः आर्थिक सद्यस्थिती ३) भारतीय पर्यटनः आर्थिक भवितव्य ४) पर्यटनक्षेत्राचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम ५) पर्यटनक्षेत्र व जम्मू-काश्मिरचा आर्थिक विकास ६) पर्यटनक्षेत्रः भारतीय अर्थव्यवस्थेतील एक संधी ७) कृषी पर्यटन ८) स्वित्झर्लंडः पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्था ९) जागतिकी-करणाच्या काळात पर्यटनक्षेत्राचा विकास १०) आंतरराष्ट्रीय पर्यटन व आर्थिक उलाढाल ११) वाढते पर्यटनक्षेत्र व रोजगार संधी १२) विदेश पर्यटन, विदेशी अर्थव्यवस्था व माझे अनुभव १३)पर्यटन व विदेश चलन विनिमय १४) पर्यटनविकास व शासन १५) पर्यटनविकासासाठी सरकारचे धोरण.

शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी या अंकातील **यापुढील पृष्ठावरील** चौकट पहावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

### ऑक्टोबर-डिसेंबर २०१६ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

फक्त एवढंच् करा....

- **लेखकांनी आपला शोधनिबंध** Shree-Dev7-2336 **या फॉन्टमध्ये** PageMaker 6.5 **अथवा** PageMaker 7 **सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा.** फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी. पृष्ठसंख्या सामान्यपणे ५ ते ८ पृष्ठे असावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. **शोधनिबंधात कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा.** आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## जाहीर आवाहन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सभासदांना आवाहन करण्यात येते की, दि. १४/११/२०१५ च्या कार्यकारिणी सभेमध्ये मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयानुसार तसेच दि. ११/५/२०१६ च्या सभेमध्ये ठरल्यानुसार आपल्या भागातील समस्या व इतर प्रश्न याबाबत अभ्यास करून त्याचा अहवाल तयार करण्याचे दृष्टीने डॉ. आर. के. दातीर आणि डॉ. संजय तुपे यांनी तयार केलेली अभ्यास गटाची रचना व कर्तव्ये आपल्या माहितीकरिता प्रकाशित करीत आहोत. या संबंधी आपण अहवाल परिषदेकडे सादर करावेत. परिषद सदर अहवाल शासनाकडे सादर करण्याचा प्रयत्न करेल. या करीता आपले सहकार्य मिळाल्यास शासन परिषदेची दखल घेऊन काही मदत करू शकेल अशी अपेक्षा आहे.

**मराठी अर्थशास्त्र परिषदेने नेमावयाच्या अभ्यास गटाची रचना व कर्तव्ये :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सहभाग राज्याच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांची सोडवणूक करण्यात असला पाहिजे यास्तव अभ्यासगट नेमले पाहिजे व शासनाला अहवाल सादर करून समस्या सोडविण्यासाठी शासनाचा पाठपुरावा केला पाहिजे. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या, भौगोलिक रचना, राज्याचे अर्थकारण प्रशासन, धोरण, अंमलबजावणी इत्यादी बाबी विचारात घेता अभ्यास गटाची नितांत गरज आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेने अभ्यास गट गठीत करून शासनाला अहवाल सादर केल्यास परिषदेचे विश्वासार्हता वाढेल तसेच परिषदेने शासनाला सुप्रशासन होण्यासाठी मदत केली याचा अभिमान वाटेल.

**अभ्यास गटाची रचना, नियम व कर्तव्ये :**

१) सर्वसाधारणपणे राज्याच्या विभागान्वये अभ्यासगट नेमण्यात यावा. अर्थात राज्याच्या एका विभागात तातडीने अभ्यास करणे गरजेचे असल्यास त्याच विभागाचा प्राधान्याने विचार करावा व अभ्यास गट नेमावा.

२) अभ्यास गटाचा प्रमुख जेष्ठ प्राध्यापक (निवृत्त) किंवा कार्यरत मात्र विषयाचे आकलन, संशोधनवृत्ती, सेवाभावीवृत्ती, अहवाल लेखनाची कला अवगत असलेल्या व्यक्तीस करावे आणि इतर ०४ (चार) प्राध्यापक सदस्य असावेत अर्थात त्यांना देखील वरील निकष लागू होतील. थोडक्यात एक अभ्यासगट पाच जणांचा असेल.

३) अभ्यास गटात काम करणारे प्राध्यापक ज्या विभागासाठी अभ्यासगट नेमावयाचा आहे त्याच विभागातील असावेत म्हणजे अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे होईल.

४) कोणत्या विषयावर अथवा प्रश्नावर अभ्यासगट नेमावयाचा आहे याचा प्रस्ताव संबंधित जिल्ह्यातील किंवा विभागातील प्राध्यापक परिषदेला प्रस्ताव पाठवू शकतात अर्थात परिषद आलेल्या प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा करून निर्णय होईल व अभ्यास गटाची नावे व सदस्य

नावे, उद्दिष्टे, कार्यकाळ इत्यादी बाबींचा निर्णय परिषद घेईल व त्या बाबतचा निर्णय अंतिम राहील. परिषद कार्यकारिणी किंवा अध्यक्ष ड्रींीं पद्धतीने अभ्यासगट नेमू शकते.

५) अभ्यास गटाचा प्रवास खर्च, स्टेशनरी, टायपिंग, झेरॉक्स इत्यादी खर्च परिषद देईल. मात्र त्याची सविस्तर बिले परिषदेला सादर करावी लागतील. तसेच परिषदेची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. अभ्यास गटाच्या प्रमुखाला व सदस्यांना परिषद मानधन देऊ शकणार नाही हे काम स्वयं प्रेरणेने व निस्पृह पद्धतीने करावयाचे आहे.

६) अनेक अभ्यासगटाचे किंवा एका गटाकडून आलेले अहवाल परिषद शासनाला पाठवेल व अभ्यास गटाने केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करील.

७) अभ्यास गटाकडून आलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा होऊन निष्कर्ष व सुचना वर्तमान पत्राला परिषद देईल. मात्र ते देतांना अभ्यास गटाला योग्य ते श्रेय दिले जाईल.

८) अभ्यास गटाचे अहवाल शासनाला उपयुक्त ठरल्यास परिषद तद्नंतर अभ्यास गट शासनाला नेमावयाचे असल्यास किंवा एखाद्या प्रश्नांवर शासनास अभ्यास करून पाहिजे असल्यास परिषद शासनाकडून काम स्विकारेल मात्र त्यासाठी योग्य ती रक्कम घेणे, अभ्यास गट नेमणे, शासनाशी वाटाघाटी करणे या बाबतचा अधिकार त्या वेळेचे विद्यमान अध्यक्ष, कार्यवाह व कार्यकारिणीचा असेल.

९) अभ्यास गटाचा प्रमुखाने इतर सदस्यांना दिलेले काम वेळेत करावे व समजून-उमजून परस्पर सहचार्यातून काम करावे.

१०)अभ्यास गटाचा कालावधी ठरविण्याचा अधिकार परिषदेचा राहील. काही प्रसंगी अभ्यास गटाचा कालावधी वाढविला जाईल. अर्थात हा निर्णय परिषदेच्या कार्यकारिणीचा असेल.

११)अभ्यास गटाची कार्ये, विषय, उद्दिष्ट्ये, संशोधन पद्धती, आकडेवारी इत्यादी बाबी अभ्यास गटाचे प्रमुख व सदस्य विचार विनिमयाने ठरवू शकतात.

१२)अभ्यास गटाने परिषदेला अहवाल दिल्यास व परिषदेने स्विकारल्यानंतर अभ्यास गटाचे अस्तित्व संपुष्टात येईल.

१३)अभ्यास गटाचा अहवाल परिषद अर्थसंवाद व वर्तमान पत्रात प्रसिद्धीस देईल. अर्थात अभ्यास गटाचा यथोचित उल्लेख करूनच.

१४)नेमलेल्या अभ्यास गटाने किंवा स्विकारलेल्या अभ्यास गटाने मध्येच काम करणे थांबविल्यास काम का थांबविले याची शहानिशा परिषद कार्यकारिणी करेल व अडचणी दूर करून कामाला चालना देईल. अर्थात अगदीच असमर्थता दर्शविल्यास दुसरा नवीन अभ्यास गट नेमला जाईल.

१५)अभ्यास गटातील काही सदस्यांनी नंतरहून काम करण्याचे नाकारल्यास अशा सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक परिषद करेल.

डॉ. आर.बी. भांडवलकर
कार्यवाह-खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, चांदवड

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतिलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथे ६, ७ व ८ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. सातारा येथील डॉ. शिवाजी भोसले हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.१२५०/- आहे. जे परिषदेचे आजीव सदस्य नाहीत त्यांना साधारण शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. विद्यार्थ्यांसाठी शुल्क रु.५००/- आहे. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) प्रा.नी.वि.सोवनी यांचे आर्थिक विचार.

२) आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती.

३) महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भात शासनाची भूमिका.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेच्या मा. अध्यक्षांनी अधिवेशनापूर्वीच जाहीर केला आहे. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आयत्या वेळेचा विषय: मेक इन इंडिया.

डॉ. शिवाजी भोसले,
अध्यक्ष

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष

प्राचार्य डॉ. जी. एच. जैन,
स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार

डॉ. सुरेश पाटील,
स्थानिक कार्यवाह
भ्रमणध्वनी: ९४२३१८०८९१

डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक
अर्थसंवाद

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. शिवाजी भोसले,
अध्यक्ष
१६५/२, प्लॉट नं.१९,
मंगलाई कॉलनी, शाहू नगर,
गोडोली, सातारा-४१५००१
भ्रमणध्वनी: ९४२११२१९७४५

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

जिल्हा:.................................

विद्यापीठ क्षेत्र: ..........................

अभ्युदयाय कृतिरस्तु।

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई.

## आजीव / साधारण सभासदत्वासाठीचा अर्ज

(कृपया अर्ज मराठीतून भरावा)

फोटो

१. संपूर्ण नाव : ..........................................................................

२. महाविद्यालय/संस्थेचे नाव: ..........................................................................

३. शैक्षणिक पात्रता : ..........................................................................

..........................................................................

४. पत्रव्यवहारासाठी पत्ता : ..........................................................................

..........................................................................

५. दूरध्वनी क्र.(कोड सह) :

महाविद्यालयाचा / संस्था:.................... निवास: ..................................

भ्रमणध्वनी क्र.: ............................ ई-मेल: ..................................

६. वर्गणी:

आजीव सभासद रु.३०००+ इमारत निधी रु.२०००+ सभासद सूची रु.१००= **रु.५१००/-**

(साधारण सभासद रु.३००/-)

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री/श्रीमती........................................ यांचेकडून परिषदेची आजीव/साधारण सभासद वर्गणी रुपये:............. आज दि.................. रोजी रोख/मनी ऑर्डर / डीडी ने मिळाली.

कार्यवाह - खजिनदार

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## प्रा. डॉ. नि. वी. सोवनी स्मृती व्याख्यान

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. नि. वी. सोवनी यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक नामांकित अर्थतज्ज्ञाचे व्याख्यान २०१० मध्ये बदलापूर येथे झालेल्या ३४ व्या अधिवेशनापासून  दरवर्षी आयोजित केले जात आहे. या वर्षी सदर व्याख्यानाचे सातवे पुष्प नाशिक येथील सुप्रसिध्द सी.ए. डॉ. विनायक गोविलकर गुंफणार असून त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे: अर्थ-भारतीय आणि अभारतीय दृष्टीकोन. सदर व्याख्यान अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे रविवार दि.६ नोव्हेंबर २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता अधिवेशनाच्या मुख्य सभागृहात होईल.

## कै. प्रा. डॉ. श्री. आ. देशपांडे जीवन गौरव पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०१२ या वर्षापासून कै.प्रा.श्री.आ. देशपांडे जीवन गौरव पुरस्कार सुरू करण्यात आला. आतापर्यंत हा पुरस्कार (कै.) डॉ. व्यं. सु. पाटणकर, प्रा. डॉ. ज. फा. पाटील, प्रा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, प्रा.डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांना प्रदान करण्यात आला. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी आहेत प्रा. डॉ. यशवंत रारावीकर (नवी दिल्ली). सदर पुरस्काराचे समारंभपूर्वक वितरण अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवार दि.७ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी ४ वाजता अधिवेशनाच्या मुख्य सभागृहात करण्यात येईल.

## माजी अध्यक्षांच्या सन्मानार्थ स्मृती व्याख्यान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या स्मृती व कार्याला उजाळा देण्यासाठी यंदाच्या अधिवेशनापासून माजी अध्यक्षांच्या सन्मानार्थ स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले जाणार आहे.

प्रा. डॉ. वि. म. दांडेकर हे १९७८ मध्ये नागपूर येथे झालेल्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सभासदांना परिचय व्हावा म्हणून अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे ८ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत अधिवेशनाच्या मुख्य सभागृहात प्रा. डॉ. वि. म. दांडेकर स्मृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प परिषदेचे माजी विश्वस्त, माजी कार्याध्यक्ष व माजी अध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, कोल्हापूर हे गुंफणार आहेत.

**प्रा. चारुदत्त गोखले,**
कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरूकुल)

ESTD - 1928

SNJB

नेमिनगर, चांदवड जि. नाशिक (महाराष्ट्र)

फोन : (०२५५६) २५२१२२, २५२१५०, फॅक्स : (०२५५६) २५३१७२

Website : www.snjb.org

Email : snjb1928@rediffmail.com



संस्थापक

कर्मवीर स्व.श्री.केशवलालजी हरकचंदजी आबड (पु.काकाजी)



## संस्था संचलित शैक्षणिक विभाग

* आदर्श बालविकास मंदीर (बालवाडी)
* प्राथमिक शाळा
* माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
* एच.एस.सी.व्होकेशनल कोर्सेस (MCVC)
* इंग्लिश मिडीयम स्कूल
* पॉलिटेक्नीक
* कॉलेज ऑफ इंजिनिअरींग
* एम.बी.ए.
* एम.ई (ई अॅण्ड टी.सी.)
* डी-फार्मसी
* बी फार्मसी
* एम.फार्मसी अॅन्ड रिसर्च सेंटर
* कला, वाणिज्य आणि विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालय
* कला, वाणिज्य आणि विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय
* होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल
* एम.डी होमिओपॅथी
* अध्यापक विद्यालय (डी.एल.एड.)

## होस्टेल

* विद्यार्थी वसतिगृह - ०५
* कन्या वसतिगृह - ०२

(जाहिरात सहकार्य : डॉ. सुरेश पाटील, स्थानिक कार्यवाह, म.अ.प.)